

॥ अक्षरवेध ॥

– डॉ. गंगाधर मोरजे

अक्षरवेध

प्रा. डॉ. गंगाधर मोरजे

प्रस्तावना – प्रा. ग. ह. खरे

पद्मगंगा प्रकाशन
अहमदनगर

आवृत्ती : पहिली
शके १९०४
सन १९८२

■

■

प्रकाशक :
डॉ. गंगाधर मोरजे
" मोरजाई " सहकारी बँकेमागे
अहमदनगर – ४१४००१

■

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

■

मूल्य २० रुपये

■

एकमेव विक्रेते : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी,
४५६ रविवार पेठ, पुणे ४११००२

ज्यांच्या सुसंस्कारांनी
सागरकाठच्या पुळणीतील
शंख शिंपले वेचायची प्रेरणा लाभली,
त्या माझ्या वत्सल
'बा' (आई) व बाबांस
सादर अर्पण-

--बापू

प्रस्तावना

(१) माझे मित्र डॉ. गंगाधर मोरजे यांनी अक्षरवेध नावाचा आपला बारा लेखांचा संग्रह प्रकाशित करण्याचे योजिले आणि त्याप्रमाणे तो छापूनही तयार झाला. त्यांच्या या लेखसंग्रहात मुख्यतः त्यांनी मराठी वाङ्मयातील निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, नामदेव, माणकोजी बोधले, महाभारतकार जिवाशिवा, जोतीराम यांच्या वाङ्मयाविषयी अधिक खोलात जाऊन काही नवीन सांगता येते का, हे पाहण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या संग्रहात फक्त तीन लेख असे आहेत की, जे मराठी वाङ्मयासंबंधी नसून त्या वाङ्मयात आलेल्या षड्भुज गणेश व बार्शीची भगवंत मूर्तीयांचे वेध घेणारे दोन व तेराव्या शतकातील नेवासे व त्याचा परिसर हा क्षेत्रवेध घेणारा एक असे आहेत. सर्व लेखांची पृष्ठे सुमारे १०५ झाली आहेत.

(२) सध्याच्या सर्व प्रकारच्या महागाईत अशा प्रकारचे संशोधनात्मक लेख स्वतःची पदरमोड करून प्रसिद्ध करणे म्हणजे एक धाडसच आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये जिज्ञासा कशाची असेल तर प्रथम सिनेमातील नटनट्यांची माहिती, नंतर सिनेमा, नाटके व तमाशे यांवरील चर्चा, त्यानंतर कलात्मक वाङ्मयनिर्मिती (यांत लघुकथा, दीर्घकथा इत्यादी येतात), नंतर कविता व कादंबऱ्या, त्या खालोखाल खेळ व भविष्ये आणि शेवटी ज्ञानवर्धक लिखाण यांची. हे लोकांना आवडते. यांत ज्ञानवर्धक लिखाणाचा समावेश अगदी शेवटी आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. यावरून हेही लक्षात येईल की, या शेवटच्या क्रमांकाचे लेखन पुनः प्रकाशित करणे हे वर म्हटल्याप्रमाणे एक धाडसच आहे. सध्याच्या बहुतेक प्रकाशकांना व पुस्तक विक्रेत्यांना शेकडा २५ दलाली देऊनही पुस्तके विक्रीस ठेवणे परवडत नाही, असे ते सांगत आहेत. तथापि प्रकाशक व विक्रेते यांच्या टोलेजंग इमारती पाहिल्या आणि लेखक गरिबीतून वर येऊ शकत नाही हे लक्षात घेतले म्हणजे प्रकाशक व विक्रेते यांचे म्हणणे प्रमाण मानणे अतिशय कठीण आहे. अशा स्थितीत डॉ. गंगाधर मोरजे यांनी हे धाडस केले आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन करणेच योग्य ठरेल. डॉ. मोरजे यांनी या पुस्तकात वेध घेण्याचा जो प्रयत्न केला आहे तो सर्वस्वी समर्पक व बिनतोड आहे असे प्रत्येक वाचकास वाटेलच असे नाही. तथापि त्यांच्या या अक्षरवेधामुळे जे नवीन समजते ते आपणास प्रगतिपथावर नेणारे आहे याविषयी कोणालाही शंका घेण्याचे कारण नाही.

(३) सध्या थोर व पोर यांचा मेंदू एवढा दुर्बल झालेला दिसतो किंवा त्यांची रुची एवढी विचित्र झाली आहे की, त्यांना गंभीर विषयाचे वाचन व मनन ही पचत नाहीत. हा दोष कोणाचा हा एक यक्षप्रश्नच झाला आहे. कित्येक नियतकालिककार म्हणतात की, वाचक मागतात ते त्यांना पुरविणे हे आमचे काम आहे. मला त्यांचे हे म्हणणे मुळीच मान्य नाही. जाणत्यांनी अजाणत्यांना शहाणे करून सोडले पाहिजे, म्हणजे त्यांची रुची थिल्लर विषयांतून काढून गंभीर विषयांकडे वळविणे हे त्यांनी आपले कर्तव्य समजले पाहिजे. तरच आमचे ज्ञान वाढून आम्ही जगाच्या स्पर्धेत टिकू शकू. पण आम्हाला हे समजणार कसे व केव्हा ? सध्या तरी हे अरण्यरुदनच आहे.

(४) आता प्रथम त्या तीन लेखांतील षड्भुज गणपतीविषयी लिहितो. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे हे नेपाळात गेले असता त्यांना तेथे एक षड्भुज गणेशाची मूर्ती आढळली. ते सभापती असल्याने तिला प्रसिद्धी पुष्कळ मिळाली. तिच्याविषयी डॉ. मोरजे यांनी उल्लेख केलेला आढळत नाही. अर्थात त्यांना ती मूर्ती डॉ. मोरजे यांनी लेख लिहिल्यानंतर माहीत झाली. तेराव्या शतकातील नेवासे व त्याचा परिसर यात पुष्कळ माहिती आली आहे आणि तीत महालसा-म्हाळसा या देवतेचे मोहिनीराजामध्ये रूपांतर होण्याचा क्रम एकनाथांच्या वेळेपासून कसा झाला हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण कै. राजवाडे व मी अशा दोघांनी नेवासे येथील बडव्यांचे कागद प्रसिद्ध केले त्यांवरून ती प्रक्रिया इसवीच्या १७ व्या शतकाच्या शेवटापर्यंत पूर्ण झाली नव्हती. कारण बडव्यांच्या तत्कालीन कागदांत म्हाळसादेवी असा स्पष्ट उल्लेख आहे. राजवाडे ज्ञानेश्वरीतही नेवाश्याचे स्वतंत्र वर्णन नसले तरी. " जेथ श्री म्हाळसा " (१८।१७८२) असाच पाठ आलेला आहे. जुन्या हस्तलिखित पोथ्यांत अनेकदा स हे अक्षर काढताना स मधील र या भागाचा अधरार्ध अगदी लहान काढलेला असतो. कोणातरी व्यक्तीकडून अशा **सा** चे **या** असे एकदा वाचन केले गेले आणि ते वाचन अज्ञानामुळे इतके रूढ झाले की, महाळसा ऐवजी महालया हेच चुकीचे वाचन अधिक रूढ झाले. एवढेच नव्हे तर महालया माहात्म्य या नावाचे नेवाश्याचे एक माहात्म्यही तयार झाले. एका अज्ञानजन्य लहानशा चुकीचा अज्ञानी लोकांवर केवढा प्रभाव पडला हे या उदाहरणावरून चांगले लक्षात येते. असाच एक प्रकार कंकाल या भैरव नावाविषयी झाला आहे असे मला वाटते. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या देवळासमोर बऱ्याच अंतरावर रंकाळे नावाचा एक तलाव आहे. गद्दवळ्ळी (जुने म्हैसूर संस्थान) किंवा अभिनवकोल्लापूर येथील महालक्ष्मीचे देवळासमोर भूतनाथ (एक भैरव कंकाल भैरव ?) असल्याचे सांगितले आहे. सुमारे हजार वर्षांपूर्वीच्या कानडी लिपींत क आणि र या दोन अक्षरांत एवढे साम्य होते की, कंकाल ऐवजी रंकाल असे चुकीचे वाचन करणे अगदी शक्य आहे. त्यातून रंकाळे हे नाव रूढ झाले. कंकाल आणि रंकाल या विषयी माझा केवळ तर्क आहे. पण महालसाचे महालया कसे झाले ते अगदी स्पष्ट आहे.

(५) श्री. रा. म. आठवले यांनी अनेकदा निवृत्तिदेवी ग्रंथाचा उल्लेख केला आहे. आम्हा अनेक अभ्यासकांची अशी कल्पना झाली आहे की, तो ग्रंथ त्यांजपाशी असावा. तसा असल्यास तो त्यांजकडून प्रसिद्ध होईल तो सुदिन समजावा. डॉ. मोरजे यांचे माणकोजी बोधले यांचा निर्याणकाल, मराठी महाभारतकार जिवाशिवाचा काल-निर्णय हे दोन लेखही इतर लेखांप्रमाणे खोल व अचूक वेध घेणारे असेच आहेत. नामदेवकृत ज्ञानेश्वरचरित्र याविषयी त्यांनी जे लिहिले आहे तेही असेच वेध घेणारे आहे. मग ते परंपरावादी व धोपटमार्गी अभ्यासकांना पटो अथवा न पटो.

त्यांची लेखन-पद्धति आधारांचे परीक्षण करून लिहिण्याची आहे. तीत कल्पनाविलास नाही. ते आपल्या लेखनासाठी केवळ मुद्रित साधनांवर अवलंबून राहिले नसून आवश्यक तेथे किंवा शक्य तेथे त्यांनी हस्तलिखितांचाही मागोवा घेऊन खोल वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रयत्नामुळे अनेक वेळा रूढ समजुती चुकीच्या ठरून त्या कल्पनांहून काही निराळे व सत्याच्या जवळ नेणारे लिहावे लागते. यामुळे परंपरावाद्यांच्या समजुतींना जबरदस्त धक्का बसू शकतो आणि कधी कधी ते भावनाप्रधान विद्वान रागावतातही. तथापि सत्यशोधकाला अशांची परवा करून चालत नाही. असो. डॉ. मोरजे यांनी केलेल्या लेखनाबद्दल व त्याच्या प्रकाशनाच्या धाडसाबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. इत्यलम्.

वैशाख शुद्ध ३
अक्षय्य तृतीया
शक १९०४

प्रा. ग. ह. खरे
कार्याध्यक्ष, भारत इतिहास संशोधक मंडळ,
पुणे

वेध घेण्याआधी—

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास करीत असता, अनेक शंका व प्रश्न उपस्थित झाले. सर्वांचा पाठपुरावा करणे शक्य झाले नाही. काही प्रश्नांचा यथाशक्ति वेध घेण्याचा प्रयत्न केला, त्या निमित्ताने लिहिलेले लेख, टिप्पणे निवडून हा लेखसंग्रह सिद्ध केला आहे. या संग्रहात निवृत्तिनाथ ते राम जोशी या काळातील वाङ्मयीन विचार असलेले लेख समाविष्ट केलेले आहेत. हे लेख इ. स. १९६७ ते १९८० या काळात नियतकालिकातून वा अन्य स्वरूपात पूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत. अधूनमधून मध्ययुगीन मराठीच्या अभ्यासकांची, या लेखापैकी विशिष्ट लेख कुठे उपलब्ध होतील, यासंबंधी चौकशी करणारी पत्रे येतात. अंक कळविला तरी सहजासहजी उपलब्ध होत नाही. काही हितचिंतकानी सुचविले, या लेखांचा संग्रह प्रसिद्ध करावा. मलाही वाटले इतस्ततः विखुरलेले लेख एकत्र केले तर एक सलग चित्र पहाता येईल. संशोधनामागे असलेली आपली दृष्टीही स्पष्ट होईल. अशा प्रकारच्या वाङ्मयाचे प्रकाशन करायला प्रकाशक धजावत नाही असे दिसले. तेव्हा आपल्या बळावरच उभे राहावे असे वाटले. त्यातून हा संग्रह प्रसिद्ध होत आहे. ही माझ्या अभ्यासूवृत्तीची कमाई आहे. ह्या कमाईच्या काळात मला खूप सात्त्विक आनंद लाभला आहे. संग्रहातील लेख वाचून इतरांना तो आनंद लाभावा अशी अपेक्षा आहे.

संशोधनात अंतिम उत्तर नसते. तो एका अभ्यासकाने उपलब्ध साधनांच्या आधारे घेतलेला वेध असतो, मध्ययुगीन मराठीतील अक्षरबद्ध झालेल्या वाङ्मयाचा वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणून मी संग्रहाला ‘ अक्षरवेध ’ म्हटले आहे.

मध्ययुगीन मराठी वाङ्मय मग ते संतांचे असो वा पंतांचे किंवा शाहिरांचे असो ते श्रोतृसापेक्ष आहे. श्रोत्याला आपले विचार वा भाव पोहोचविण्याची लेखक-कवीची प्रामाणिक धडपड आहे. ज्ञानेश्वर षड्भुजगणेशाचे रूपक कल्पनेतून मांडतात, हे खरे नाही. श्रोत्यांच्या अवती भवती षड्भुजगणेश मूर्ती अस्तित्वात आहेत, हे ज्ञानेश्वर जाणतात आणि जातिवंत शिक्षकाप्रमाणे वाचकांना मूर्ताकडून अमूर्ताकडे लीलया नेतात. या दृष्टीने परांडा किल्ल्यातील “ षड्भुज गणेश मूर्ती ” ज्ञानेश्वरीच्या आकलनाला हातभार लावते असे मला वाटते. या लेखाचे मनोमन कौतुक करून माझे ज्येष्ठ संशोधक मित्र डॉ. रा. चिं. ढेरे यांनी सदैव प्रोत्साहन दिले आहे. त्यांचा मी कृतज्ञ आहे.

जाणिवेच्या पातळ्या बदलल्या की सुखाचे प्रकारही बदलतात. आपले सामर्थ्य काय हे ज्याचे त्याने ओळखून कोणत्या प्रकारचे सुख आपणाला हवे ते ठरवायचे आहे. ज्ञानेश्वरांनी मांडलेल्या विचाराचे स्पष्टीकरण केले आहे : संत फक्त "आत्मसुख" सांगतात हे सर्वस्वी खरे नाही. हे स्पष्ट व्हावे.

आजवर "ज्ञानेश्वर चरित्राचा" मुख्य आधार नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र अभंग व ज्ञानेश्वर समाधीचे अभंग मानले गेले आहेत. त्यामुळे 'ज्ञानेश्वर चरित्रात' अनेक विसंगती दिसतात. नामदेव पहिला 'संत चरित्रकार' असेही म्हटले जाते. पण ही ज्ञानेश्वर समकालीन नामदेवाने लिहिलेली 'चरित्रे' नव्हेत, तर कीर्तन या वाङ्मय प्रकाराच्या 'उत्तररंगा'साठी लिहिलेली आख्याने आहेत. आजवर या आख्यानातून चरित्रे शोधीत बसल्यामुळे संत चरित्रांत विसंगती ठाण मारून बसल्या आहेत. एखाद्या वाङ्मय प्रकाराचा घाट वाङ्मय आकलनास कसा हातभार लावतो ते दाखविण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

"भक्तराज" हा ग्रंथ ज्ञानेश्वरांचा असण्याची शक्यता सिद्ध करण्याचा साधार प्रयत्न केला आहे, तसेच निवृत्तिनाथांनी "निवृत्तिदेवी" लिहिली व ती सोपानदेवी, मुक्तेश्वरी परंपरेने पुढे ओळखली गेली. हे अनेक हस्तलिखितांच्या आधारे उलगडून दाखविले आहे.

तेराव्या शतकातील 'नेवासे' गावाचा इतिहास-भूगोल उलगडून म्हाळसाचे महालयातील रूपांतर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तावनाकार प्रा. ग. ह. खरे यांनी टाकलेला अधिक प्रकाश उपयुक्त आणि पूरक ठरला आहे.

शाहिरी वाङ्मयातील-पोवाड्याची प्रत्यक्षात उपलब्धी चवदाव्या शतकातील असल्याचे हस्तलिखितांच्या आधारे दाखवून 'पोवाडा' शब्द व त्याची संकल्पना मांडली आहे.

अस्सल साधनानिशी माणकोजी बोधले यांचा निर्याणकाळ व महाभारतकार जिवाशिवा यांचा कालनिर्णय निश्चित केलेला आहे,

पंडित कवींची जशी "आख्यान कविता" तशी संत कवीची 'दीर्घ निवेदनात्मक रचना'. संतांच्या आख्यान वा दीर्घ निवेदनात्मक रचनांच्या घाटाचा, स्वरूपाचा अभ्यास कसा करता येईल याचा शोध "बोधराजाख्यान" या जोतिरामाच्या रचनेच्या आधारे सूचित केला आहे.

ज्यावेळी लिखित पुरावे फारसे नसतात तेव्हा लोक-परंपरा आधाराला येते. बार्शीचा भगवंत ही पंढरपूरच्या विठ्ठल या लोकदेवतेच्या परंपरेतील देवता असल्याचे दाखवून दिले आहे. लोकपरंपरा आणि लोकसाहित्याच्या सहाय्याने मध्ययुगीन मराठी वाङ्मयाची उकल करण्याचा हा नवा दृष्टिकोण म्हणावा लागेल.

बहुतेक सारे वाङ्मय श्रोतृ-सापेक्ष आहे; वाङ्मयप्रकारचा घाट तपासला तर आशय उलगण्यास मदत होते; पंथीय वा वाङ्मयीन परंपरांचा अभ्यास विशिष्ट कलाकृती

आकलनास उपयुक्त ठरतो, मुद्रित वा हस्तलिखित साधनाइतकेच लोकपरंपरा आणि लोकसाहित्य वाङ्मयीन प्रश्न उलगडण्यास आधारभूत होते. लेखकाची कलाकृती समजून घेण्यास त्याच्या काळाचा आणि चरित्राचा उपयोग होतो, अशी थोडक्यात या संशोधनामागील दृष्टी आहे.

माझ्या या संशोधनामागे अनेक जाणकारांचे सक्रिय सहाय्य आहे. डॉ. स. गं. मालशे, ज्या काळात मराठी संशोधन पत्रिकेचे संपादक झाले, त्याकाळात त्यांनी खूप प्रोत्साहन देऊन लिहायला लावले. प्रा. ग. ह. खरे यांनी माझ्या संशोधनास प्रारंभापासून जोपासले आहे. भारत इतिहास संशोधक मंडळात निबंध वाचण्याच्या निमित्ताने त्यांनी खूप मार्गदर्शन व सहाय्य केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी विद्यापीठाच्या जर्नलमध्ये माझ्याकडून लिहून घेतले. डॉ. रा. चिं. ढेरे, प्रा. पां. ना. कुलकर्णी, प्रा. रमेश तेंडुलकर, श्री. गं दे. खानोलकर, डॉ. ना. ग. जोशी (बडोदे), कै. प्रा. सुरेंद्र गावस्कर, श्री. वि. त्र्यं. शेटे या सर्वांनी माझे हे लेख वाचून वेळप्रसंगी दाद दिली त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे.

श्री. ग. ह. खरे हे आज भारतातील एक मोठे इतिहासाभ्यासक. त्यांनी आपल्या अनेकविध व्यापांतून मी विनंती करताच बहुमोल आणि यथोचित प्रस्तावना लिहून दिली. माझ्याबद्दल त्यांनी जो स्नेहभाव व्यक्त केला आहे त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहणे पसंत करीन.

ज्या नियतकालिकात वा ग्रंथांत हे लेख प्रथम प्रसिद्ध झाले त्या नियतकालिकांच्या व ग्रंथाच्या संपादकांनी ते लेख पुनर्मुद्रित करायला परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या सुविद्य पत्नी सौ. पद्मा मोरजे यांनी हे लेख लिहिताना विचारविनिमयासाठी नेहमीच सक्रीय भाग घेतला व "भक्तराज"वरील टिपणाचा लेख परिशिष्टात समावेश करायला परवानगी दिली त्याबद्दल आभार. माझ्या मुलांना चि. अनघा व चि. प्रभव यांना आमच्या घरातील हे संशोधन अतिपरिचित म्हणून नेहमीच कंटाळवाणे काम, तरी त्यांनी या प्रकाशनात उत्साह दाखविला. म्हणून त्यांचे साभार कौतुक.

माझे तरुण चित्रकार मित्र प्रा. सुभाष पवार यांनी आकर्षक मुखपृष्ठ काढून पुस्तकाचे स्वरूप देखणे केले आहे त्याबद्दल मनःपूर्वक आभारी आहे.

आनंद मुद्रणालयाचे श्री. य. गो. जोशी व त्यांचे बंधू व सर्व कामगार बंधूंनी मोठ्या उत्साहाने मला सहकार्य दिले. त्या सर्वांचा सहवास वारंवार घडावा अशी अपेक्षा त्यांचा मी ऋणी आहे.


"मोरजाई"
अहमदनगर

गंगाधर मोरजे


अनुक्रमणिका

परिशिष्ट

✦ ✦ ✦



षड्भुज गणेश



षड्भुज गणेशाची (महाराष्ट्रांतील) एक मूर्ती

देखां षड्दर्शने ह्मणिपति । तेचि भुजांची आकृति ।
म्हणूनि विसंवादे धरिति । आयुधांते ॥ १० ॥
तरि तर्कु तो चि परशु । नीतिभेदु अंकुशु ।
वेदांत महारसु । मोदकु मिरवे ॥ ११ ॥
एका हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।
तो बौधमत संकेतु । वार्तिकांचा ॥ १२ ॥
मग साह्यजे सत्तर्कवादु । तो पद्मकरुवरदु ।
धर्म प्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ॥ १३ ॥

ज्ञानेश्वरी [सरकारी आवृत्ती १९६०] अध्याय १ ला :

'ज्ञानेश्वरांनी वर्णिलेल्या गणेशमूर्तीशी जुळणारी गणेशमूर्ति हिमालयाच्या पहिल्या चढावाच्या प्रदेशातील कांगडा जिल्ह्यात वैजनाथ गावी वैजनाथ (वैद्यनाथ) शिवाचे प्राचीन देवालयात आहे. या वैजनाथाच्या ११ व्या शतकाच्या देवळातील गणपती सहा हातांचा असून, त्यात हीच आयुधे सांगितलेली आहेत. मागील दोहींकडच्या दोन हातांत खरी आयुधे म्हणजे परशु आणि अंकुश आहेत. नंतर डावीकडील दोन हातांपैकी खाली केलेल्यात तुटलेला दात आणि मांडीवर ठेवलेल्या सोंडेच्या जवळ नेलेल्या हातात मोदक. जणू काय वेदान्त मोदकाचा रस गजानन शुंडाग्राने चाचपून पाहात आहे. उजवीकडच्या दोन हातांपैकी खाली केलेल्या हातात कमल आहे.'‡ अशी माहिती वैद्य देतात. पण ती मूर्ती नृत्यगणेशाची आहे का वगैरे माहिती ते देत नाहीत. 'आगगाड्यांच्याही काळात जे शक्य वाटत नाही, तसे दळणवळण पंडितांत, धर्मज्ञान्यांत त्यावेळी होते.'† असे सांगून ज्ञानेश्वरांना वरील गणेशमूर्तीची माहिती असावी असे ते सूचित करतात. ज्ञानेश्वरांनी केवळ गणेशाचे 'रूपक' योजले आहे, या समजुतीचा अधिक विचार करावयाला ही सूचना महत्त्वाची ठरली असो.

‡ चिं. वि. वैद्य, सहा हातांचा गणपती, भा. इ. सं. मंडळ, पुणे त्रैमासिक वर्ष ६ अंक १।२।३।४ इ. स. १९२५–२६, पृ. २.

† तत्रैव पृ. २.

अशाच षड्भुज गणेशाच्या मूर्तीची माहिती श्री. रा. म. आठवले यांनी प्रा. ग. ह. खरे यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ' ज्ञानप्रकाश ', जून १९३४ च्या अंकात दिली आहे. ती पुढीलप्रमाणे :

(१) शंकरगड येथील षड्भुज गणेशमूर्ती

शंकरगड हे नागोडा संस्थानातील एक लहानसे खेडे, तेथील एका लहानशा निमुळत्या टेकडीकरिता ते प्रसिद्ध आहे. तिथे एका देवळात १'×७" आकाराच्या दगडावर शिव, पार्वती, गणेश यांची मध्ययुगीन कालांतील एक अत्यंत सुंदरशी मूर्ती आहे. या गणपतीला सहा हात असून, त्यांपैकी डावीकडील दोन हातात एक विळखा घातलेला सर्प व उरलेल्या हातात परशु आहे. आणि उजवीकडील एका हातात मोदक असून, दुसरे दोन हात भंगलेले आहेत. ही मूर्ती नृत्यमान गणेशाची आहे.

(२) सोहागपूरची षड्भुज गणेशमूर्ती

सोहागपूर हे रेवा संस्थानात असून एका खोऱ्याच्या उंच धारेवर वसलेले आहे. सोहागपूर म्हणजे चेदिराजांच्या बिल्हारी येथील शिलालेखात उल्लेखिलेले सौख्यपूर बहुधा होय. येथील मंदिराच्या सभामंडपाच्या उजवीकडील शेवटच्या खांबाच्या खालच्या भागावर एक सहा हाताच्या नृत्यमान गणेशाची मूर्ती कोरलेली आहे. ह्या मूर्तीच्या सहा हातांपैकी डावीकडील तीन हातांत (१) शर, (२) परशु, (३) पुस्तक या तीन वस्तू असून, उजवीकडील तीन हातात (१) कट्यार, (२) मोदक, (३) पाश या तीन वस्तू आहेत.

(३) नेमावरची षड्भुज गणेशमूर्ती

नेमावर हे इंदूर संस्थानात आहे. हरदा स्थानकापासून ते सहा कोसांवर आहे. तेथील देवळाच्या पश्चिम–द्वार–मंडपाच्या दक्षिणेकडील अंगाला नृत्यगणेशाची मूर्ती आहे.

या तीनहि मूर्ती नृत्यमान गणपतीच्या आहेत. सहा हाताच्या आहेत. पण नेमावरच्या गणपतीच्या हातात काय आहे हे सांगितले नाही.* शंकरगडच्या मूर्तीचे दोन हात भंगलेले आहेत. त्यातील दोन हातांत सर्प असल्यामुळे ती मूर्ती ज्ञानेश्वरांच्या गणेश-वर्णनांशी जुळणारी नाही.

(४) राजशाही वरेंद्र संशोधन मंडळाच्या संग्रहालयातील पुराणवस्तूंत एक

* i) Progress report of the archeological Survey of India Western Circle for the year ending 31 st March 1920.

(ii) Progress report of the archeological Survey of India. Western Circle for the year ending 31st March 1921

षड्भुज गणेशमूर्ती उपलब्ध आहे. ती भव्य पाषाणमूर्ती असून, उंदीरवाहन, आसनाच्या उजव्या अंगाला असलेली आहे.

(५) पुरुषार्थ मासिकाच्या शके १८५८ च्या गणेश विशेषांकाच्या आधारे, 'ज्ञानेश्वरांचा हा षड्भुज गणेश, प्रत्यक्ष मूर्तिरूपाने ओंकारअमलेश्वराच्या दक्षिणेला असलेल्या नाथपंथीय आखाड्यावरील आहे' अशी माहिती गणेशकोशकार देतात.‡

वरील सर्व गणेशमूर्ती लक्षात घेऊन मी एका षड्भुज गणेशाच्या मूर्तीकडे जाणकारांचे लक्ष वेधू इच्छितो. लेखाच्या आरंभी त्या मूर्तीचे एक रेखाचित्र दिले आहे. त्यावरून मूर्तीची कल्पना येईल.

सदरची मूर्ती महाराष्ट्रातील एक मूर्ती आहे. इतिहासप्रसिद्ध परिंडा – परांडा किल्ल्याच्या तळघरात सांप्रत ही मूर्ती आहे. बार्शी शहरापासून १४–१५ मैलांवर परिंडा गाव आहे (उस्मानाबाद जिल्हा). तळघरात ही मूर्ती सुरुवातीपासून नसावी. नंतर तिथे कुणीतरी आणून ठेवलेली असावी. ती दोन भागांत तुटलेली आहे. तरी एकावर एक भाग रचून ती पूर्णाकृती करून ठेवलेली आहे. मूर्तीच्या उजवीकडील भाग तुटलेला आहे. तीन हात चांगल्या अवस्थेत असून तीन हात तुटलेले आहेत. मूर्तीची उंची १ मीटर २५ सेंटिमीटर, तर रुंदी ९० सेंटिमीटर आहे. डावीकडील वरच्या हातात कमळ आहे; व डावीकडील खालच्या मांडीला टेकलेल्या हातात मोदक आहेत. उजवीकडील मांडीला टेकलेल्या हातात काय असावे हे निश्चित सांगता येत नाही. (तुटका दात असेल काय?)

या मूर्तीचे अस्तित्व लक्षात घेता ज्ञानेश्वरांनी 'रूपक' योजिले असावे हे म्हणणे तितकेसे खरे मानता येणार नाही, ज्ञानेश्वरांनी प्रत्यक्षात कुठली तरी 'षड्भुजगणेश मूर्ति' अवलोकन केलेली असली पाहिजे. महाराष्ट्रात उपलब्ध असलेली ही मूर्ती त्या दृष्टीने विचारात घेता येईल का? ती मूर्ती मूर्तिविज्ञानात अधिक काही भर घालू शकेल का? या दृष्टीने विचार व्हावा म्हणून हा प्रपंच करीत आहे.§

ज्ञानेश्वरांनी तत्कालीन समाजाला माहीत असलेली षड्भुज गणेशमूर्ती षड्दर्शने उलगडून दाखविण्यासाठी उपयोगात आणली. मूर्तीकडून अमूर्ताकडे जाण्याच्या शिक्षणशास्त्रातील पद्धतीचा ज्ञानेश्वर उपयोग करतात. ते केवळ रूपक नव्हे. ज्ञानेश्वरकाळात महाराष्ट्रात व इतरत्र षड्भुज गणेशाची उपासना असली पाहिजे. या दृष्टीने अलिकडे उपलब्ध झालेल्या षड्भुज गणेशाच्या अनेक मूर्ती भर घालीत आहे. षड्भुजगणेश शाक्तांचा आहे किंवा नाही हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. ज्ञानेश्वरीच्या प्रथम

‡ श्रीगणेशकोश संपा. अमरेंद्र गाडगीळ; वोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २, इ. स. १९६८, पृ. ५८

§ [ज्ञानेश्वरांनी वर्णिलेल्या षड्भुज गणेशमूर्तीसंबंधाने विवेचन करणारे, किंवा तत्संबंधी अधिक माहिती देणारे पुढील लेख अभ्यासकांना उपयुक्त ठरतील.

[टीप पुढील पानावर चालू]

अध्यायातील ' गणेशवर्णन ' उकलण्याच्या दृष्टीने ही माहिती उपयोगी पडेल असा भरवंसा आहे.

✦ ✦ ✦

[टीप मागील पानावरून पुढे चालू]

' श्रीज्ञानदेवी ' [संपादक भगवंत यशवंत पेंडसे व रामचंद्र महादेव आठवले] या मासिकातील पुढील लेख—

(१) ज्ञानेश्वरीतील षड्भुज गजानन, भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक, १९२५–२६, अं. १–४ मधील चिं. वि. वैद्यांचा लेख पुनर्मुद्रित. व १ अं. १, चैत्र श. १८५२.

(२) ज्ञानेश्वरीतील षड्भुज गजानन (' संशोधन आणि चिकित्सा ' या सदरात) व. १ अं. १, चैत्र श. १८५२.

(३) त्रेतायुगांतील गणेशध्यानच ज्ञानेश्वरांनी का ध्यायिले ? (' संशोधन आणि चिकित्सा ' या सदरांत) व. १ अं. २, वैशाख श. १८५२.

' पुरुषार्थ ' – गणेशांकांत (सप्टें. १९३५) ' श्रीज्ञानदेवी 'तील उपरिनिर्दिष्ट लेख पुनर्मुद्रित झाले आहेत. (विद्यात्रंतांचा पूर्वज ' श्री गणेश–श्री. रा. म. आठवले, पृ. २४९–२५२).

याशिवाय या अंकात–

सहा व आठ हातांचे गणपती – रा. म. आठवले, पृ. २०९–२१३ (प्रस्तुत लेखांतील निर्दिष्ट ' ज्ञानप्रकाशां 'तील लेख यात अंतर्भूत आहे.)

सह्याद्री, ऑगस्ट १९४१ च्या अंकांत ' श्रीमंत नानाराव पेशवे यांच्या जीवन-स्मृतीचे धागे ' या. रा. म. आठवले यांच्या लेखांत पृ. ६३४, ब्रह्मावर्तास असणाऱ्यावर पेशव्यांच्या नित्यपूजेतील दशभुज गणेशाची माहिती आलेली आहे.

ज्ञानेश्वरांची सुखकल्पना

संतांनी आपले जीवनसर्वस्व आपले स्वतःचे आणि इतरांची जीवनसमृद्धी साधण्यासाठी वेचले. पण बऱ्याच वेळा संतांनी लौकिक वा इहवादी जीवनाचा तिटकारा केला. वेळ प्रसंगी अधिक्षेप केला असेही जाणकार सांगताना दिसतात. आजच्या भौतिकवादी जीवनपद्धतींत संतांची विचारसरणी कित्येकांस पोरकट, किंवा भाबडी वाटते. सहजासहजी माणसाला प्राप्त न होऊ शकणाऱ्या सुखामागे माणसाने लागावे असे संत सांगतात असेही संतांबद्दल सांगण्यात येते. ज्ञानेश्वरांना, सातशे वर्षे होऊन गेली, त्यांच्या हाती कोणतीही राजकीय सत्ता नव्हती तरी लोक त्यांच्या विचारसरणीने भारावतात तेव्हा हे सर्व लोक अंधश्रद्धाळू, भाबडे तरी आहेत असे म्हणावे लागते किंवा त्यांची (ज्ञानेश्वरांची) विचारधाराच इतकी प्रभावी आहे की आजही त्यांचे विचार स्वीकार्य ठरतात असे म्हणावे लागेल.

ज्ञानेश्वर आपला काव्यविषयक विचार मांडत असता काव्यातील ' परतत्त्वस्पर्शाला ' श्रेष्ठत्व देतात, तसेच सुखविषयक विचार करीत असता " आत्मसुख " महत्त्वाचे मानतात. याचा अर्थ ते इतर सुखांचा विचार करीत नाहीत असे नाही. ज्ञानेश्वरांना सुख म्हणजे काय, ते कसे प्राप्त होते याविषयी काय अभिप्रेत होते ते आपणास बघावयाचे आहे.

तरि अवधान एकले देइजे । मग सर्वसुखासि पत्र घेईजे ।
हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आइका ।। ९–१

असे जेव्हा ज्ञानेश्वर म्हणतात तेव्हा केवळ आत्मसुख हे एकमेव सुख आहे असे त्यांना अभिप्रेत नाही. सर्व सुखात आत्मसुख एक आहे. या जीवनात अनेक प्रकारची सुखे आहेत. ती सर्व सुखे अनुभवण्याची पात्रता सुप्तपणे तुमच्यात स्वभावतःच आहे–मी काय सांगतो त्याच्याकडे एकाग्रतेने लक्ष दिल्यास ती सुखे मिळाल्याचे प्रात्यक्षिक मी तुम्हाला दाखवीन अशी ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा आहे. थोडेसे विषयांतर करून आणखी एक गोष्ट स्पष्ट करावी लागेल. " सर्वसुखासि पात्र होईजे " असा पाठ काही ज्ञानेश्वरीच्या प्रतींत आहे – मला हा पाठ योग्य वाटत नाही. ज्ञानेश्वरांच्या चिद्विलास वा एकंदर आध्यात्मिक विचारसरणीचा विचार करता हे विश्व आनंदस्वरूप आहे. त्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी ज्ञानेश्वर वा अन्य कुणी कुणाला पात्र करणे विश्वाच्या आनंदस्वरूपाशी विरोधी आहे–

पण तो आनंद अनुभवाला आणून देणे शक्य आहे – ज्ञानेश्वर सुप्त शक्ती आपल्या वाणीने जागृत करू अशा आत्मविश्वासाने बोलतात एवढेच. त्या संदर्भात श्रोत्यांचे अवधानही तितकेच महत्त्वाचे आहे. श्रोते व ज्ञानेश्वर या दोघांचाही त्या पातळीवर मिलाफ झाला तरच ज्ञानेश्वरांच्या प्रतिज्ञेला अर्थ आहे. थोडक्यात ती दोनही हातांनी वाजणारी टाळी आहे –

ज्ञानेश्वरीच्या अखेरीस

किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजीजो आदी पुरुषी । अखंडीत ।। १८·१७४८

असे जेव्हा ते म्हणतात तेव्हाही त्यांना सर्व सुखे अभिप्रेत आहेत. पण त्यांत त्यांना " आदि पुरुषाला अखंड भजणे " श्रेष्ठ सुख असल्याचे अभिप्रेत असलेले दिसते. ते सर्वांनी अनुभवावे असे त्यांना वाटते.

ज्ञानेश्वर केवळ 'आत्मसुख' 'आत्मानंद' असे न म्हणता 'सर्वसुखांसि सर्वसुखी' असा सुखांचा अनेकवचनी उल्लेख करतात त्या अर्थी एका सुखाहून अनेक सुखे असतात हे त्यांना मान्य आहे याबद्दल शंका राहात नाही. या सुखांच्या निरनिराळ्या पातळ्या त्या सुखांच्या स्वरूपावरून ते ठरवितात. कसे ते पुढे पाहू.

सुख म्हणजे तरी नेमके काय असते ? एखादा कोणी आपणास सुख झाले असे म्हणतो तेव्हा त्याला काय अभिप्रेत असते ? खरे म्हणजे जो तो हे आपल्या अनुभवाने जाणीत असतो. तसे पाहिले तर आपणास सुख झाले असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपली कोणतीच वासना अस्तित्वात नसते. सुख म्हणजे वासनेचा अभाव. पुढे आपणास असेही दिसून येते की आपणास वासना झाली म्हणजे आपले सुख नाहीसे होते. त्या वासनातृप्तीसाठी आपली धडपड सुरू होते. थोडक्यात वासनेचा अभाव म्हणजे सुख. हा वासनेचा अभाव कधी वासनापूर्ती झाल्यामुळे होतो, कधी वासनेचा त्याग केल्यामुळे होतो, कधी वासनाच उत्पन्न न झाल्यामुळे होतो, कधी चित्ताची एकाग्रता झाल्यामुळे वासनाच लुप्त होते, त्यामुळे सुखप्राप्ती होते, तर कधी चित्ताचा लोप झाल्यामुळे वासनेचा अभाव होतो. नवव्या अध्यायात पहिल्या ओवीत ज्ञानेश्वर सांगत असलेले 'सर्वसुख' श्रोत्याच्या चित्ताची एकाग्रता झाल्यामुळे, वासना लुप्त होण्याने लाभणारे सुख आहे हे जाणकारांच्या लक्षात येईल; असो.

प्राणिमात्राला हा वासनेचा अभाव दोन स्थितींत जाणवतो. एक जागृती स्थितीतील वासना अभाव व दुसरा निद्रा स्थितीतील वासना अभाव. यातही जागृती स्थितीतील वासना अभाव अधिक महत्त्वाचा, कारण या अवस्थेत सुख घेणारास आपण सुख घेतो याचे भान असते. निद्रावस्थेत आपणास वासना अभावाचे सुख लाभते हे खरे, पण अनुभव घेणारास आपण अनुभव घेतो याचे भान नसते म्हणून या अवस्थेतील सुखाल महत्त्व कमी. यावर असा आक्षेप येणे शक्य आहे की हे सर्व सुख अभावात्मक आहे. पण तेही म्हणणे खरे नाही, कारण जागृत अवस्थेत वासनेचा अभाव उत्पन्न होतो त्याचा

वेळी भावात्मक असे काही तरी निर्माण होते. उदा० श्रीखंडाचा आस्वाद म्हणजे चक्का, साखर, वेलदोडयाचा आस्वाद नसून अधिक काही असते. (मुलांच्या खेळातील अनुभव.)

जागृती अवस्थेतील वासनेचा अभाव म्हणजे उच्च प्रकारचे सुख होय. माणसाला हे सुख तीन प्रकारांनी प्राप्त करून घेता येते, पुढीलप्रमाणे ते स्पष्ट करता येईल.

(१) इंद्रियांना हवे ते विषय प्राप्त झाले म्हणजे होणारे सुख. उदा० स्वादिष्ट वस्तू खाल्ल्यामुळे रसना सुखावते, कर्णमधुर गाणे ऐकल्याने कान सुखावतात किंवा स्त्रीसंगाने रतिसुख मिळते. अर्थात या सुखाचे स्वरूप काही काळ म्हणजेच क्षणिक असते. यास आपण शरीरसुख म्हणू.

(२) मनातील इच्छा, कामना पूर्ण झाल्यामुळे मिळणारे सुख; परीक्षेत सुयश मिळाल्यामुळे होणारे सुख; पुत्रप्राप्तीमुळे होणारे सुख – अशा प्रकारचे सुख होण्यापूर्वी त्यासंबंधीच्या कोणत्या तरी वासना असाव्या लागतात. शत्रू मेल्याबद्दल आपणाला आनंद होणे व त्याच्या हितचिंतकास दुःख होणे.

(३) वासनेचा जाणीवपूर्वक त्याग केल्याने होणारे सुख. यालाच आत्मसुख, नित्यसुख, सात्त्विक सुख, आनंद या अनेक नावांनी ओळखले जाते.

वरील तीन सुखांपैकी दोन सुखे विषयजनित सुखे आहेत. ती अनित्य आणि क्षणिक आहेत. जोपर्यंत विषयांशी इंद्रियांचा संयोग असतो तोपर्यंत ती सुखे टिकतात. सातत्याने इंद्रियांशी संयोग ठेवला तर तो सुखकारक न ठरता त्रासदायक किंवा दुःखकारक ठरतो. आणखी एक महत्त्वाची बाब अशी की या प्रकारची सुखे कुणावर तरी अवलंबून असतात. म्हणजे ती पराधीन असतात. उलट आत्मसुख म्हणजे वरीलपैकी तिसरे सुख नित्य असते; ते अनुभव घेणाऱ्याच्या स्वाधीन असते आणि कितीही अनुभवले तरी त्याच्यापासून दुःख उत्पन्न होत नाही.

वरीलपैकी पहिली दोन सुखे क्षणिक, अल्पकाळ टिकणारी, परावलंबी, विषयजनित आहेत हे कबूल, पण ती सुखे खोटी नव्हेत. किंवा टाकाऊ, तिटकारा करण्याजोगी नव्हेत; कारण तिसरे जे आत्मसुख ते अनुभवण्यास शरीरस्वास्थ्य असले पाहिजे. भुकेने व्याकुळ झालेल्या माणसाचे चित्त वासनारहित कधीच होऊ शकणार नाही. सर्व शरीरदुःखांचा परिहार चित्त एकाग्र करून करता येणार नाही.

शरीर आणि मन यांचा संयमित उपयोग करून माणसाला मोठे सुख प्राप्त करून घेता येईल अशी ज्ञानेश्वरांची धारणा आहे. या दोघांचाही अतिरेक होणे म्हणजे दुःख ओढवून घेणे व दोघांचा संयमित उपयोग करणे म्हणजे सुख प्राप्त करून घेणे असे ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे. ते म्हणतात,

जो रसनेंद्रियाचा अंकिला । का निद्रेसी जीवें विकला ।
तो नाही एथ म्हणितला । अधिकारिया ॥ ६–३४५ ॥

अथवा आग्रहाचिये बांदोडी । क्षुधातृषा कोंडी ।
आहारातें तोडी । मारूनिया ।। ३४६ ॥
निद्रेचिया वाटा न वचे । ऐसा हृढिवेचेनि अवतरणे नाचे ।
ते शरीरचि नव्हे तयाचे । मा योगु कवणाचा ।। ३४७ ।।
म्हणोनि अतिशये विषयसेवा । तैसा विरोध न व्हावा ।
कां सर्वथा निरोधु करावा । हे ही नको ।। ३४८ ॥
आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापे मविजे ।
क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ।। ३४९ ।।
मपितलां वोलीं बोलिजे । मितलां पाउलीं चालिजे ।
निद्रेही मानु दीजे । अवसरें एके ॥ ३५० ॥
जागणे जरी जाहलें । तरी व्हावे ते मितले ।
येतुलेनि धातुसाम्य संचले । असेल सुख ।। ३५१ ॥
ऐसे युक्तिचेनि हाते । तै इंद्रिया वोपिजे भातें ।
तै संतोषासी वाढते । मनचि करी ॥ ३५२ ।।

[दांडेकर प्रत.]

साधारणपणे लौकिक जीवनातही आपण एखादी चांगली वस्तू म्हणून जी निवडतो ती दीर्घकाळ टिकणारी, आपल्या स्वतःच्या ताब्यात राहणारी वस्तू असते. तसेच आत्मसुखाचे आहे. ते अधिक म्हणजे नित्य टिकणारे आहे म्हणून ज्ञानेश्वर त्या सुखाचा लाभ सर्वांना व्हावा असे अपेक्षितात.

ज्ञानेश्वरांच्या मते वासना अभाव असलेले सुख आणि त्यासाठी आवश्यक असणारे शरीरस्वास्थ्य ही मानवी सुखाची दोन अंगे आहेत. यांत कोणतेही कमी जास्त नाही. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. प्रवृत्ती निवृत्ती संयोग खऱ्या सुखास उपयोगी आहे. वासना अभावास वैराग्य आवश्यक असते हे जरी खरे असले तरी सुखाचे हे क्षणभंगुरत्व, पराधीनत्व आणि आत्मसुख म्हणजे काय हे कळण्यास ज्ञानाची आवश्यकता असते. जीवनास व शरीरास आवश्यक त्या वस्तू कर्मामुळे मिळतात आणि म्हणूनच ज्याला ऐहिक सुख साधता आले नाही त्याला हे अत्युच्च सुख मिळणे अशक्य हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात,

जया ऐहिक धड नाही । तयाचे परत्र पुससी काई ।
म्हणोनि सांगो का वाई । पांडुकुमरा ॥ ४.१५५ ।।

ज्ञान आणि कर्म यांच्या यथायोग्य मीलनातून आत्मसुख अनुभवास येते. हे उच्चतर सुख लाभावे म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात,

दिसो परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा ।
रिघो महाबोध सुकाळा । माजि विश्व ।। १३-११६१ ॥

ज्ञानेश्वरांच्या अभंगरचनेतही या सुखानुभवाचे वर्णन येते. नमुन्यादाखल काही ओळी दिल्याशिवाय राहावत नाही.

सुखी सुख मुरे तेथें कोण झुरे। जळी लवण विरे तैसे झाले।
ज्ञान ते विज्ञान प्रपंचेसि भान। तेजोरूप गगन बिंबले दिसे॥

ज्ञाने० अभंग गाथा, अभंग क्रमांक ५३२

सुख सोज्वळ मोतियाचे लेणे। दिधळे जाई जणे बाई ये वो।
देशी नाही देशा उरी नाही। हाटणी नाही ते पाटणी नाही।
लक्षाचेनि लाभे जोडले निधान। बापरखुमादेविवरा विठ्ठलु जाण॥ क्र. ९३९

ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी परमसुखाने सुखावणाऱ्या मनासंबंधी ज्ञानेश्वर लिहितात,

पै पायी कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे।
तैसा पोळे संकटे। पुढिळाचेनि॥ १६–१५९॥
कां पावो शीतलता लाहे। कीं ते डोळयांचि लागी होये।
तैसा परसुखे जाये। सुखावतु॥ १६–१६०॥

ज्ञानेश्वरांनी सांगितलेले हे "आत्मसुख" सर्वांसाठी म्हणजे ब्रह्मविद्येचे भुकाळू असलेल्यांसाठी आहे. ज्याला पोटाची भ्रांत आहे, ज्याला जीवनाचे अस्तित्व कसे तरी टिकवायचे आहे त्यासाठी हे आत्मसुख नव्हे. लौकिक जीवनधारणेच्या दृष्टीने सुखाचा विचार ज्ञानेश्वरांनी प्राधान्याने केलेला नाही. तो त्यांनी गृहीत धरलेला आहे. ज्याला लिहिता येत नाही त्याचे अक्षर सुंदर असावे अशी अपेक्षा नाही. पण जर अक्षर काढता येत असेल तर ते सुंदर असावे हे अधिक चांगले अशा प्रकारची ही सुखाची अपेक्षा आहे.

✦ ✦ ✦

नामदेवरायांची रूपके

मराठी संतांनी विपुल स्फुट कविता रचलेली आहे. रचनादृष्ट्याही त्या कवितेत वैपुल्य आहे. संतांच्या स्फुट कवितेची बैठक आध्यात्मिक अनुभवावर अधिष्ठित आहे. तसेच प्राधान्याने ती रूपकाचा आश्रय करताना दिसते. संतांनी आपल्या कवितेची रचना करीत असता प्राकृत छंदाचा व मात्रावृत्तांचा प्रामुख्याने उपयोग केलेला आहे. तशा प्रकारच्या रचनांचे मूळ तत्कालीन लोकगीते, लोकसंस्कृतीच्या उपासकांची गीते यांत दिसून येते. संतांना ज्या समाजात आध्यात्मिक जीवनाची समृद्धी करावयाची होती. त्या समाजाचीच रचनापद्धती त्यासाठी त्यांनी स्वीकारणे योग्य होते. एकनाथांनी वापरलेले विविध रचनाप्रकार पाहिले म्हणजे आपणास याची खात्री पटते. मूळ लोकगीताच्या वा लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या गीतरचनांच्या चौकटी स्वीकारून आपल्या अनुभवसामर्थ्याने नाथांनी काही रचनाप्रकारांना मानाचे स्थान मिळवून दिलेले दिसते. भारूड हा अशाच एका लोकसंस्कृतीच्या उपासकांचा गीतप्रकार. पण भारूडे म्हटल्याबरोबर आपल्या-समोर उभे राहतात एकनाथमहाराज. एकनाथ आणि भारूड यांच्यात जवळजवळ अभेदत्व असलेले मराठी वाचकांना जाणवते एवढे खास.

जुन्या मराठी स्फुटकवितेचे वर्गीकरण करीत असता बऱ्याच वेळा काव्यप्रकार म्हणून पुरता विचार केला गेला आहे असे दिसत नाही. असे होण्यामागे अनेक योग्य वा अयोग्य कारणे असू शकतील किंबहुना आपण सांप्रत मानीत असलेले काव्यप्रकार संतकाव्यांच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने अपुरे पडत असतील, काही असो. वस्तुस्थिती आहे ही अशी.

भारूड म्हणजे काय ?

वर नुकताच उल्लेख केला की संतांची बरीचशी स्फुट कविता रूपकात्मक असते. त्यात गौळणी, विरहिणी, गीते आदी रचना येतात. आणि सर्व रचनांना भारूड या नावाने ओळखले जाते, असेही दिसत नाही. बरे ‘ भारूड ’ म्हणून ओळखली जाणारी रचना ‘ भारूड ’ या मथळयाखाली मुद्रित झालेली आहे असे म्हणावे, तर तसेही सर्वत्र दिसत नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी भारुडे लिहिली आहेत, असे आपण सर्रास बोलतो किंवा लिहितो. पण त्या प्रत्येकाचा अभंगगाथा आपण पाहू लागलो, तर त्यात ‘ भारूड ’ असा रचनाप्रकार दिसत नाही. एक तर ‘ रूपके ’ किंवा ‘ उपदेशपर रूपके ’ या मथळयाखाली, आपण ज्यांना भारुडे म्हणतो ती स्फुट कविता छापलेली

आढळते. प्रत्येक 'रूपक' कविता म्हणजे भारूड नव्हे. 'भारुडा' चे संस्कृत नाव 'रूपक' असावे, असे दिसते. थोडक्यात एखाद्या मुलाचे शाळेच्या नोंदीत वा सरकार-दरबारचे नाव आणि घरात संबोधावयाचे खासगी नाव यात जसा फरक असतो, तसे 'भारुडा' चे प्रतिष्ठित नाव 'रूपक' आणि खासगीतील नाव 'भारूड' असा प्रकार असलेला दिसतो.

भारुडांचे एक व्यासंगी अभ्यासक डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनी "भारुडाची व्युत्पत्ती सांगणे फार कठीण आहे. ती निश्चित अशीच म्हणून सांगता येत नाही." असे म्हटले आहे. ('एकनाथदर्शन', खं. १, पृ. १७०). असे असूनही सदर लेखात त्यांनी अतिशय उपयुक्त अशी चर्चा केलेली आहे. बऱ्याचशा व्युत्पत्ती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारुडासंबंधी अभ्यास करणारांनी तो लेख मुळातून पाहणे उचित ठरेल. त्याच लेखात (पृ. १७१) 'भराडया'संबंधी जे गीत ते 'भारूड', अशीही एक व्युत्पत्ती दिली आहे. त्यांच्या अन्य व्युत्पत्तींपेक्षा प्रस्तुत लेखकाला ही व्युत्पत्ती अधिक योग्य वाटते. त्या संदर्भातच पुढील विचार वाचकांपुढे ठेवीत आहे.

भराडयांचे गीत ते भारूड

मराठी लोकसंस्कृतीच्या उपासकांचा विचार करता असे दिसते की, या उपासकांच्या उपासनापद्धती एकमेकांशी बरेच साम्य दाखविणाऱ्या असल्या, तरी त्यांच्यातही वेगळीक असलेली दिसते. वासुदेव, वाघ्या-मुरळी, गोंधळी, भराडी, चित्रकथी, भुत्या हे सारे मराठी लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. या सर्वांची निरनिराळी गीते असलेली दिसतात. त्यांच्या त्यांच्या पंथानुसार त्यांचे नियम असतात. त्यांच्या उत्सवानुसार ते आपापली गाणी म्हणतात. त्यांच्या त्यांच्या देवतांना आवाहन करून जागरण, गोंधळ, वा भराड हा कार्यक्रम पार पाडतात.

आता भराडयासंबंधी श्री. रा. चिं ढेरे 'मराठी लोकसंस्कृतीचे उपासक' या आपल्या पुस्तकात (पृ. ७१) माहिती देतात ती पाहा—

"भराडयांना 'डवरे गोसावी' असेही म्हणतात. भराडयांची जमात नाथपंथीय असल्यामुळे त्यांना गोसावी असे म्हणतात आणि भिक्षा मागताना ते डमरू (डौर) वाजवीत असल्यामुळे 'डवरे गोसावी' असे म्हणतात. भराडयांनी नाथपंथाचा स्वीकार नक्की केव्हा केला ते सांगता येत नाही. परंतु असे वाटते की, नाथपंथाच्या पहिल्या प्रभावकाळातच या भैरवोपासक भराडयांनी नाथपंथाचा स्वीकार केला असावा." तसेच "महाराष्ट्रांतील भैरवोपासक नाथपंथीय भराडी हेही मूळचे पाशुपतसंप्रदायी भरटकच होत." अशी माहिती श्री. ढेरे यांनी अलीकडेच ('केसरी', २७ डिसेंबर १९७०) दिली आहे.

जसा गोंधळयांचा गोंधळ किंवा वाघ्या-मुरळीचा 'जागरण' कार्यक्रम असतो, तसाच या भराडयांचा कार्यक्रम असतो. त्यासंबंधी श्री. ढेरे लिहितात : "लग्नासारख्या

कार्याच्या पूर्वी सोनाराकडून देव उजळून आणल्यानंतर आणि कार्य उरकल्यानंतरही 'भराड' करविण्याची प्रथा आहे. तसे नवरात्रांत भैरवनाथाच्या मंदिरात नऊ दिवस रोज रात्री भराड होते. गोंधळ आणि जागरण यातल्याप्रमाणे प्रथम गण, नंतर देवतांना आवाहन, पुढे उपास्य देवतेच्या स्तुतिपर गीत, त्यानंतर कथानिरूपण आणि शेवटी आरती असते, तोच क्रम भराड्यांतही पाळला जातो." (पृ. ७४).

वर इतक्या विस्ताराने उतारे देण्याचे कारण, लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या रात्रभर चालणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरूप लक्षात यावे, हे होय. गोंधळात या देवतांना आवाहन, आदि असते, पण संपूर्ण कार्यक्रमाला गोंधळ असे म्हणतात. तीच गोष्ट 'जागरणा'ची आणि तसेच 'भारुडा'चे असावे. भारूड हा एक कविताप्रकार नाही. भराड्यांनी रात्रभर केलेला कार्यक्रम तो 'भारूड' – अर्थात त्यात म्हटली गेलेली 'गीते' अर्थसंकोचाने कालांतराने 'भारूड' बनली. साधारणपणे त्या त्या लोक-संस्कृतीच्या उपासकांच्या नावावरून काव्यप्रकारांना नावे पडलेली दिसतात, उदा. वासुदेवाने म्हटलेली वासुदेव–गीते, भांडांची भांड–गीते, गोंधळयांची गोंधळ–गीते, तसेच भराड्यांची भारुडे, अशी अवस्था असावी असे दिसते.

भराड्यांच्या लोकगीतांत जो एक गूढ कूटात्मक भाग असतो, तोही आपणाला भारुडातून प्रकट होताना दिसतो. भराड्यांच्या गीतात गद्यपद्यमिश्रित असलेला भाग दिसतो. भराडी कथागीतांतील कथा गद्य निरूपणाने स्पष्ट करीत असतो. भारुडांच्या कार्यक्रमांत पद्याइतकेच गद्याला महत्त्व असलेले दिसते.

थोडक्यात मराठीतील 'भारूड' नावाने ओळखली जाणारी रचना भराडी लोकांनी सादर केलेल्या कार्यक्रमावरून स्वीकारली गेली असावी. प्रारंभी संपूर्ण कार्यक्रम 'भारुड' म्हणून ओळखला जाई; कालांतराने त्याचा काही भाग 'भारूड' या नावाने ओळखला जाऊ लागला.

मराठी लावणी वाङ्मयात असाच काहीसा प्रकार घडलेला आहे. त्याचे थोडक्यात दिग्दर्शन करणे आवश्यक आहे. एकनाथांची 'पांच गौळणी' ही प्रसिद्ध रचना 'गौळण' या काव्यप्रकाराखाली विचारात घेतली जाते. पण अगदी तशीच असलेली तुकनगिरी नामक लावणीकाराची रचना 'लावणी' या नावाने ओळखली जाते. दोनही रचनांत रचनाप्रकार म्हणून वेगळीक नाही, पण ती रचना सादर करणारा वा सादर करण्याचे स्थळ याच्या सापेक्षतेने त्या रचनेचे नाव बदलते, असे दिसते. संतांची सर्व 'रूपक' कविता वास्तविक भारुडात समाविष्ट व्हायला हवी होती. 'रूपके' ही 'भारुडे' नाहीत; पण 'भारुडे' मात्र 'रूपके' होताना दिसतात. थोडक्यात काव्य-प्रकारांना नावे देताना बरेचसे शैथिल्य दिसते, हेच खरे.

न ामदेव आण एकनाथ

मराठीत ज्ञानेश्वरांपासून 'भारूड'-रचना असलेली आपणास दिसते. एकनाथांनी

त्यात नाट्य, संवाद, पात्रानुसार भाषाबदल आदि बऱ्याच सुधारणा करून 'भारूड' हा प्रकार अतिशय विकसित केला. भारुडांचे महत्त्व एकनाथांच्या भारुडांवरूनच लोकांना अधिक पटले वा जाणवले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये.

नामदेव महाराजांच्या अभंगांच्या गाथेत (आवटे प्रत) भाग ७ मध्ये 'रूपके' या मथळ्याखाली क्रमांक २२११ ते २२५० इतकी 'रूपके' नामदेवांच्या नावावर दिलेली आहेत. त्यांत शेत, कुळवाडी, घोंगडे, पिंगळा, चाटापरी, धेनु, गोंधळ, डाक, वासुदेव, पांगूळ, स्वप्न, हरिजागर आदि रचना आहेत. वरील रचनांत २२१२, २२१४, २२१७, २२१८, २२२०, २२२१, २२२३, २२२४, २२२५, २२२६, २२३२, २२३३, २२३४, २२३५, २२३७, २२४०, २२४१, २२४२, २२४६, २२४७, २२४८, २२४९, २२५० इतक्या रचना शिंपी नामा, नामा, किंवा नामदेव या नावांनी मुद्रांकित आहेत. बाकी सर्व रचना विष्णुदास नामा किंवा नामया विष्णुदास या नावांनी मुद्रांकित आहेत.

'रूपक' हा एक अर्थालंकार असून त्याची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली जाते : "उपमेय व उपमान यांच्यांतील अतिसाम्यामुळे जेथे उपमेय उपमानच आहे, किंवा त्यांच्यात अभेद आहे असे सांगितलेले असते, किंवा जेथे उपमानाचा उपमेयावर सादृश्याच्या आश्रयाने आरोप केलेला असतो, तेथे रूपक अलंकार होतो." नामदेवांच्य बऱ्याचशा 'रूपकां'चे स्वरूप अर्थालंकाराचे आहे. याशिवाय 'रूपक' हा शब्द 'नाटक' या अर्थाने वापरला जातो (ज्यात दृश्य व श्राव्य भाग असतो). एकनाथांच्या डौर, जंगम वगैरे भारुडांत याची जाणीव होते. त्याशिवाय भारूड सादर करताना सोंगाची 'बतावणी' करतात. नामदेवांच्या रचनांवरून त्यांच्या 'रूपकां'त दृश्य व बतावणी हे भाग असावेत असे दिसत नाही. ते 'रूपक' अलंकाराच्या आश्रयाने आपले निवेदन करताना दिसतात. रूपक क्रमांक २२२३, गोंधळ हे बघा –

> विठाई सांवळे डोळसे रंगा येई हो ॥ ध्रु० ॥ १ ॥
> कानी कुडलांची प्रभा । जैसे चंद्रसूर्य नभा हो ॥ २ ॥
> गळां वैजयंती माळा । कासे पीतांबर पिवळा हो ॥ ३ ॥
> नामा म्हणे कृपावंता । झडकरी यावे पंढरीनाथा हो ॥ ४ ॥

नामदेवांचे विठ्ठलरूपी आईला हे गोंधळासाठी आवाहन आहे. पण त्यांत अभिनयाला वा सोंग-बतावणीला वाव नाही. एकनाथमहाराज हे आवाहन कसे करतात बघा.

> माझे कुळींची कुळस्वामिनी । विठाई जगत्रयजननी ।
> येई वो पंढरपुरवासिनी ॥
> ठेविले दोनी कर जघनी । उभी सखी सजनी ॥ १ ॥
> येई पुंडलिकवरदायिनी । विश्वजननी । रंगा येई वो ॥ ध्रु० ॥

मध्ये सिंहासन घातले । प्रमाण चौक हे साधिले ।
ज्ञानकळस वर ठेविले । पूर्ण भरियले ।
धुप दाविले । सुवासेकरूनी ।। २ ।।
सभामंडप शोभला । भक्ति चांदवा दिधला ।।
उदो उदो शब्द गाजला । रंग माजला ।
वेद बोलिला । मूळचा ध्वनि ।। ३ ।।
शुकसनकादिक गोंधळी । जीव शिव घेउन संबळी ।
गाती हरीची नामावळी । मातळे बळी ।
प्रेमकल्लोळी । सुखाचे सदनी ।। ४ ।।
ऐसा गोंधळ घातिला । भला परमार्थ लुटिला ।
एका जनार्दनी भला । ऐक्य साधिला ।
ठाव आपुला । लाभ त्रिभुवनी ।। ५ ।।

गोंधळाच्या वेळी समोर चौरंगावर चोळखण पसरून त्यावर चौक घातला आहे आदी वर्णन करून एकनाथ मूर्तिमंत तो प्रसंग उभा करताना दिसतात. (एकनाथगाथा, चित्रशाळा प्रेस, पृ. ८५१).

रूपक क्रमांक २२२४ ' डांक ' आहे. इथेही विठाई माऊलीच्या भेटीची उत्कंठा आहे. विठाईने त्वरित यावे, म्हणून हाकारा आहे. नामयाला अहंकार दैवताने झडपले आहे. त्यापासून मोकळे करण्याची विनवणी आहे.

नामदेवांचा वासुदेव सुरेख वठला आहे. सात्त्विक सरळ मनाचा वासुदेव म्हणतो (रूपक क्र. २२२५)--

बाबा अहंकार निशी घनदाट । गुरुवचनी फुटली पहाट ।
भक्ति माता भेटली वरवंट । तिने मार्ग दाविला चोखट गा ।। १ ।।
नरहरी रामा गोविंद वासुदेवा ।। ध्रु० ।।
एक बोल सुस्पष्ट बोलावा । वाचे हरि हरी म्हणावा ।
संतसमागम धरावा । तेणे ब्रह्मानंद होय आघवा गा ।। २ ।।
आला सीतळा शांतीचा वारा । तेणे सुख झाले शरीरा ।
फिटला पातकांचा थारा । कळिकाळासी धाक दरारा गा ।। ३ ।।
अनुहात वाजती टाळ । अनुक्षीर गीत नृत्य रसाळ ।
अनुभवे तन्मय सकळ । नामा म्हणे केशव कृपाळु गा ।। ४ ।।

नामदेवांचा पांगूळ (रूपक क्र. २२२६) आणि एकनाथांचा पांगूळ (क्र. ३७१४) यात प्रारंभी बरेचसे साम्य आहे. पण एकनाथ--

मज नाही हात पाय डोळा पडली झापड ।
कर्ण बधिर झाले वाचा बोले बोबड ।

नाक मुख गळूं लागले लाळ आणि शेंबूड
श्वानापरी गती झांली अवघें करती हाड हाड ।

असा लौकिक वातावरणाचा स्पर्श आपल्या रचनेला घडवितात व रचनेत एक प्रकारचा जिवंतपणा, वास्तवता आणतात. नामदेवमहाराजांच्या रचनेत तसे दिसत नाही.

बुद्धिरंजक कूटे

रूपकामध्ये किंवा भारुडामध्ये 'रूपक' उलगडत रचना केलेली दिसते. कवि रूपकाचा अर्थ अधिकाधिक स्पष्ट करतो आणि तोही नाट्यपूर्ण पद्धतीने. या दृष्टीने नाथांचा डौर अतिशय लक्षणीय आहे. कूटांत 'रूपक' असले, तरी त्याचा उलगडा केलेला नसतो. त्यात प्रेक्षकांना वा वाचकांना एक तऱ्हेचे बौद्धिक आवाहन असते. भावनेपेक्षा बुद्धीला खाद्य असते. त्यांच्या बहुश्रुतपणाला कवी स्पर्श करीत असतो. गोंधळ काय, तमाशा काय किंवा भराड काय, रात्रभर चालणारे कार्यक्रम असतात. त्यांत गण, गौळण, शृंगार असतो; तसेच भेदीक लावण्या अगर कूटेही असावी हे अपरिहार्य ! तेव्हा कूटे 'भारुडा'च्या कार्यक्रमात समाविष्ट झाली, तर आश्चर्य वाटू नये. नामदेवांची पुढील दोन कूटे या दृष्टीने बघण्यासारखी आहेत. या दोहोंमध्ये आध्यात्मिक अर्थ शोधण्याचे कारण नाही. त्यातून एक प्रकारचे बौद्धिक मनोरंजन झाले म्हणजे झाले.

हाटकर कुणबी वाट मोडी । रिकामा ब्राह्मण करितो चहाडी ॥ १ ॥
गुळेविण शिपी बोटे चाटी । प्रेमेंविण तेली क्षेम दे लाटी ॥ २ ॥
जिताचि कोष्टी घातला खाचे । प्रेमेविण कुंभार नाचे ॥ ३ ॥
लोहार हिवाविण तापे । सोनारा लागले धापे ॥ ४ ॥
नामा म्हणे यातीचे चाळे । दुखणेंविण परीट विवळे ॥ ५ ॥

प्रत्येक जण आपापल्या जातीवर जातो, हे नामदेवरायांना सांगावयाचे आहे. खेडेगावातून शहरात जाणारा रस्ता सरळ खरा, पण कुणबी आडरस्त्यानेच जातो. ब्राह्मण रिकामा असला म्हणजे चहाडखोरपणा करतो. शिंपी सुईत दोरा ओवताना बोटे चाटीत असतो. तेली घाण्यावर काम करीत असता प्रेमाशिवाय खांबाला आलिंगन देतो. मेल्यानंतर मनुष्याला खड्डयात ठेवतात, पण कोष्टी विणकाम करताना खाचांमध्ये जिवंतपणी बसतो. माती तुडवीत असता कुंभार प्रेमाशिवाय नाचतो. थंडीशिवाय लोहार भात्याजवळ बसतो. सोनाराला बसल्या ठिकाणी हातोडीने काम करताना धाप लागते. परीट कपडे धुताना कण्हत असतो. (तोंडाने श्रमपरिहारार्थ आवाज करीत असतो.) वरील प्रकारचा अर्थ कळल्यावर प्रेक्षकांना आनंद होईल यात शंका नाही.

नामदेवरायांचे आणखी एक छोटेसे 'कूट' पाहा. यातही बौद्धिक करामत आहे–

अकरा लोचन त्याचे पाच मुख । आठ कान त्याचे देख पृच्छ दोन ॥ १ ॥
अरत अखंड निरत प्रचंड । उमाळ उदंड उभा फार ॥ २ ॥
दहा पाय चहूं चालत ते जाय । नव्हेत ग माय सावज त्या ॥ ३ ॥
नामा म्हणे त्याचा अर्थ करी चोख । पूर्वज पातक लया जाय ॥ ४ ॥

हा अभंग शिवपंचायतनाचे ' रूपक ' आहे. शंकर, पार्वती, नंदी, साप, गणपति. शंकराचे तीन व इतर चौघांचे प्रत्येकी दोनप्रमाणे आठ, मिळून अकरा लोचन. पाचांची पाच मुखे, सापाला कान नाहीत, तेव्हा चौघांचे आठ कान. साप व नंदी या दोघांची दोन पुच्छे. दहा पाय. नंदीवर सर्वचण आहेत, तेव्हा फक्त चार पाय चालतात.

नामदेवांच्या भारुडांचा स्वतंत्र विचार करण्याइतकी ती विपुल नाहीत. तसेच, त्यात एकनाथांसारखे रचनावैचित्र्यही नाही, प्रामुख्याने ती रूपकात्मक साधी, सोपी रसाळ रचना आहे. त्यात नामदेवांची आर्तता आहे. त्या रचनांतून एकनाथांच्या भारुडांतल्या सारखे समाजदर्शन फारसे घडत नाहीं. एकनाथांच्या भारुडांमागें त्यांचे समाजाभिमुख व्यक्तित्व आपणास जाणवते. मानवी मनाचे बारकावे जाणून शब्दांतून व्यक्त करण्याचे एकनाथांचे सामर्थ्य नामदेवरायात दिसत नाही, हे खरे.

✦ ✦ ✦

नामदेवकृत ज्ञानेश्वर-चरित्र

मराठी साहित्यक्षेत्रात ज्ञानेश्वर समकालीन आद्य नामदेव हाच मराठीतील आद्य संत चरित्रकार व आत्मचरित्रकार म्हणून परंपरेने मानण्यात येत आहे. विशेषतः ज्ञानेश्वर-चरित्र साधनात नामदेवांच्या नावावरील आदि, तीर्थावळी व समाधी या प्रकरणांना फारच महत्त्व प्राप्त झालेले दिसते. महिपती, निरंजनमाधव, वा अलीकडे झालेल्या बऱ्याचशा ज्ञानेश्वरचरित्रांचा मूलाधार हे नामदेवलिखित चरित्र आहे. परंतु जाणकारांना मुद्रित स्वरूपात असलेला नामदेव गाथा, त्यातील अभंग-रचना व चरित्र-कथा या सर्वस्वी आद्य नामदेवांच्याच आहेत, किंवा नाही याबद्दल शंका आहे. शंकांचे मुख्य स्वरूप असे सांगता येईल.

(१) यादवकालीन भाषेशी मिळती जुळती भाषा सर्वत्र दिसत नाही.

(२) नामदेवाने (आद्य) सांगितलेली अभंगरचनेची मांडणी सर्व अभंगांत दिसून येत नाही.

(३) नामदेवलिखित ज्ञानेश्वर चरित्रातील ' आदि ' प्रकरणातील काही भाग ऐतिहासिक सत्याला धरून असल्यासारखा दिसतो. संपूर्णपणे ऐतिहासिक सत्य नाही. तीर्थावळी व समाधीप्रकरणे काव्यात्मक असली तर समकालीन व्यक्तीने घेतलेल्या वास्तव अनुभवातून व्यक्त झालेली दिसत नाहीत.

(४) पाल्हाळ करणारा, वास्तव्याच्या भानाचा अभाव असलेला व पुराणग्रंथांच्या परंपरेतून रचना करणारा हा ग्रंथकार दिसतो.

आद्य नामदेवाचे म्हणून सांगितले जाणारे ज्ञानेश्वरचरित्र आद्य नामदेवांचे नसून मराठीतील बखरी, पोवाडे ज्या पौराणिक ग्रंथांच्या परंपरेतून लिहिले गेले आहेत, त्याच परंपरेतील नामदेव नावाच्या कुणी पुराणिकाने वा कीर्तनकाराने लोकरंजनासाठी व काही अंशी आध्यात्मिक ज्ञानप्रसारासाठी केलेली ही ललित वाङ्मय रचना आहे.

हा नामदेव माणकोजी बोधल्याचं चरित्र लिहितो. माणकोजी बोधल्याचा निर्याण काळ ३१ मे १६९४ [१] असा आहे. याशिवाय कबीर, कमाल, मीराबाई, भानुदास,

(१) डॉ. गंगाधर मोरजे ' माणकोजी बोधले यांचा निर्याण काळ ' मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, जुलै १९६७ वर्ष १४ वे अंक ४ पृ. १९७.

जगमित्र नागा, संताजी पवार, जनजसवंत, जनाबाई, सावता माळी, गोरोबा कुंभार, राका कुंभार, नरसी मेहता, चोखा मेळा [२] आदींची चरित्रे याच्या नावावर आहेत. यापैकी 'जनाबाई' ही तर नामदेवाच्या घरची दासी. तिचे चरित्र नामदेव प्रथमपुरुषी निवेदनाने व्यक्त करील पण प्रस्तुतच्या चरित्राची मांडणी "नामयाचे घरी असे दासी जनी। तिने चक्रपाणी वश केला"[३] अशी तृतीय पुरुषी निवेदकाची आहे आणि शेवट "धन्य तेचि जन धन्य तिची भक्ति। नामदेव स्तुति करीतसे॥" वरील सर्व चरित्रामध्ये भक्त आणि देव यांच्यातील भक्तीसंबंधी चटकदार कथा-निवेदनाला महत्त्व आहे. संपूर्ण ऐतिहासिक चरित्राला हा नामदेव विशेष महत्त्व देत नाही.

थोडक्यात अशा प्रकारची चरित्रे लिहिणारा हा नामदेव कुणी कीर्तनकार आहे आणि कीर्तनाच्या उत्तररंगासाठी अनेक संतांची व देवतांची कथारूपाने त्याने चरित्रे गायिली आहे. ही चरित्रे गाण्यामागे ऐतिहासिक सत्याची जाण वा चिकित्सक बुद्धीची बैठक नाही.

(१) बखरकार जसे ऐतिहासिक घटनांची चिकित्सा करून वा ऐतिहासिक घटना तपासून बखरी लिहीत नाहीत, तसाच हा नामदेव करतो. परंपरेने पूर्वजांकडून व इतिहासाच्या ओघात जी माहिती त्याला मिळाली आहे, ती चिकित्सा न करता तो मांडतो. अधिक माहिती मिळविण्याच्या खटपटीतही तो पडत नाही.

ज्ञानेश्वर समाधी महिम्यांत येणारे "तिही शिवपीठ ऐसे म्हणितले। जुनाट असे केशवा ॥ ९ ॥ या शिवतीर्थाचा महिमा। कवणा वर्णवेल पुरुषोत्तमा"[४] हे वर्णन पौराणिक ग्रंथपरंपरेतील वंशावळी किंवा पूर्वमहात्म्य वर्णन करण्याच्या पद्धतीचे आहे. आळंदीचे स्थान महात्म्य "पुराणी म्हणसी कोण कथा। तरी ऐकेगा तू सकलार्था। शैवशास्त्र हा ग्रंथ सर्वथा। सिद्धमार्ग हा असे॥"[५] मग येणारे जेवणावळीचे वर्णन[६] ही सर्व कीर्तनकाराची रचना आहे. तसेच ज्ञानेश्वरचरित्रात येणाऱ्या वंशावळी, अद्‌भुत कथा, शकुनादी रचना बखरकार व कीर्तनकार ज्या मालमसाल्याने रंगवतात त्या स्वरूपाच्या आहेत. आपल्या रचनेमुळे खुद्द विठ्ठलावर, नामदेवावर विपरीत परिणाम होईल याचे भानही त्याला नाही, अद्‌भुत वर्णनाच्या पौराणिक शैलीने त्याने समाधीमहिमा वर्णिला आहे. या अभंगात विठ्ठलांनी निवृत्तिनाथांना त्रिंबकशिखरी जाण्याचा आणि सोपानदेवांना कऱ्हेपठारावर समाधी दे असे सांगितले. ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांना त्रिंबकशिखरी जाण्यास सांगितले ह्या गोष्टी समकालीन नामदेवाच्या बाबतीत घडणे शक्य नाही. नामदेव 'ज्ञानेश्वरांच्या आदी'मध्ये धन्यधन्य तुमची वैखरी। जगदोद्धार केला संसारी। बावीस वरुषे असता पै जो जो दिवस उगवला। तो तो ज्ञानदेवे सफल

(२) श्रीनामदेव महाराजांच्या अभंगाची गाथा, संपा. त्र्यं. ह. आवटे, इंदिरा प्रेस, पुणे. पृ. ६०६ ते ६३४, (३) उनि. पृ. ६२५. (४) उनि. पृ. २११. (५) उनि. पृ. १९७. (६) उनि. पृ. २०७.

केला। पदपदांतर कथिला। जेणे आत्माराम संतोषे ॥ (१००८) या ओवीने ज्ञानेश्वरांचा जन्मशक ११९७ असा मानला गेला. जनाबाई शालिवान शके अक्राशे नव्वद। निवृत्ति आनंद प्रकटले। त्र्याणवाच्या साली ज्ञानेश्वर प्रकटले। सोपान देखिल शाणवात। नवाण्णवाच्या साली मुक्ताई देखिली। जनी म्हणे केली मात त्यांनी ॥ [७] या अभंगात येणाऱ्या 'साली' शब्दावरून हा आद्य जनाबाईचा अभंग संभवत नाही १७।१८ व्या शतकातील कुणा जनाबाईचा असावा.

पुराणे ज्या अर्थाने इतिहास आहे वा बखरींना ज्या अर्थाने इतिहास म्हणता येईल त्या अर्थानेच ह्या ज्ञानेश्वरचरित्राला ऐतिहासिक महत्त्व देता येईल.

तीर्थावळीला डॉ. पेंडसे यांनी कादंबरी म्हटले आहे. पण कादंबरीत 'संभाव्यतेचे' एक तत्त्व अनुस्यूत असते. तीर्थक्षेत्रांची जी नावे दिली आहेत आणि प्रवासाचा मार्ग सूचित केला आहे; त्यामध्ये अतिशय असंभाव्यता आहे. याचे उघड कारण निवेदकाने हा प्रवासाचा मार्ग स्वतः पाहिलेला नाही. परंपरागत गोष्टी व स्थळे यांचा उल्लेख करून हा प्रवास मांडलेला आहे.

आजचा एखादा ऐतिहासिक कादंबरीकार वा पौराणिक कादंबरीकार आपली कलाकृती रचण्यासाठी प्रथमपुरुषी, द्वितीयपुरुषी वा तृतीयपुरुषी निवेदन करील तशीच रचना हा कीर्तनकार आपली कथावस्तू निर्माण करण्यासाठी करीत आहे. कीर्तन किंवा कथा रंजक व्हावी म्हणून नाट्याचाही वेळप्रसंगी उपयोग करीत आहे. थोडक्यात हा कीर्तनकार नामदेव पौराणिक कथाकार आहे. आद्य नामदेव नव्हे.

या नामदेवाच्या बाबतीत एक गोष्ट स्पष्ट आहे; ती म्हणजे त्याला ज्ञानेश्वर, त्यांची भावंडे याबद्दल आत्मीयता आहे. तसेच संतांची चरित्रे गाण्याची आवड आहे. आपण संतांच्या कृपेमुळे हे करू शकतो याची जाणीव आहे.

आज नामदेवाच्या नावावर असलेली ज्ञानेश्वर चरित्रविषयक प्रकरणे आद्य नामदेवांची नसून १७।१८ व्या शतकातील कुणा कीर्तनकार, पौराणिक कथाकाराची ती प्रकरणे आहेत. त्या प्रकरणातील भावनिक व भक्तीच्या ओलाव्याने ती लोकप्रिय झाली तरी ऐतिहासिकदृष्ट्या ती उपयोगाची नाहीत. ती प्रकरणे समकालीन नामदेवांची असती तर ऐतिहासिक सत्य, तत्कालीन जीवनपद्धती, भाषा, यांचा अपरिहार्यपणे उच्चार झाला असता. कारण चरित्रप्रकार हा समाजजीवनाशी निगडित असा वाङ्मय प्रकार आहे. या दृष्टीने महानुभावांची चरित्रे व उत्तरकालीन संतांची चरित्रे लक्षात घेण्यासारखी आहेत. मी हा नामदेव १६९४ च्या आजूबाजूलाचा असावा असे म्हणतो आहे कारण बोधल्यांचा निर्याण काळ या काळातील आहे. बोधल्यांच्या जीवनातील त्याची भक्त 'हांसी'चीच कथा हा नामदेव लिहितो, संपूर्ण चरित्र नाही.

✦ ✦ ✦

---

(७) उनि. पृ. ७४३.

' भक्तराज ' कर्त्या ज्ञानदेवाच्या शोधासंबंधी आणखी काही

मराठी संशोधनपत्रिकेच्या रौप्यमहोत्सवी वर्ष अंकात[1] श्री. न. शे. पोहनेरकरांनी ' भक्तिराज 'च्या एका हस्तलिखित प्रकरणासंबंधी लिहिले. त्याच अंकात प्रा. सु. आ. गावस्कर यांनी " ज्ञानदेवांचा भक्तिराज : एक टिपण " लिहिले (पृ. ११९–१२१). या दोन लेखांच्या निमित्ताने व पूर्वी " भक्तराजकर्त्या " ज्ञानेश्वरांच्या संबंधी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने " भक्तराजकर्त्या ज्ञानदेवाचा शोध[2] " घेणारा लेख डॉ. म. रा. जोशी यांनी प्रसिद्ध केला. आणि " भक्तराजकर्ता ज्ञानदेव मूळचा अंबेजोगाईचा असून जनी जनार्दन परंपरेतील ठरतो. त्याचा समय शके १५६०–१६२० च्या दरम्यानचा आहे " असे सांगून शिक्कामोर्तब केला आहे.

उपरोक्त मान्यवर संशोधक–द्वयाने सौ. पद्मा मोरजे यांच्या टिपणाचा[3] संदर्भ घेतलेला आहे. सौ. मोरजे यांनी आपल्या टिपणाचे लक्ष्य प्रामुख्याने ' भक्तराज ' या ग्रंथाचा शब्दकोश कशा स्वरूपाचा आहे, याकडे केंद्रित केलेले आहे. ' भक्तराज ' ग्रंथाचा कर्ता ज्ञानदेव असणे शक्य आहे असे त्यातील शब्दांच्या आधारे त्या म्हणतात.

सौ. पद्मा मोरजे यांनी जे हस्तलिखित वापरले ते माझ्या संग्रहातील आहे. त्या हस्तलिखिताचा तपशील त्यांनी पूर्वी दिलेला आहेच. त्या हस्तलिखिताच्या आधारे भक्तराजकर्त्या ज्ञानदेवासंबंधी आणखी काही कळते काय ते पाहू. प्रथम आमचे मित्र डॉ. म. रा. जोशींच्या लेखनाच्या संदर्भात विचार करणे योग्य होईल. " मोरज्यांना मिळालेली प्रत शके १६५९ ची असल्याने असे समजण्यास प्रत्यवाय नसावा की

१. न. शे. पोहनेरकर, " ज्ञानदेवांचा भक्तिराज ", म. सं. प. व. २५ अं. १ (ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९७७ पृ. ३९ ते ४३)
२. म. रा. जोशी, " भक्तराजकर्त्या ज्ञानदेवाचा शोध ", म. सं. प. व. २६ अं. १ (ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९७८)
३. पद्मा मोरजे, " टिपण–भाषा–भक्तराज ग्रंथ परिचय " म. सा. प. अं. १९३–९४ (एप्रिल ते सप्टें. १९७५ पृ. १०१ ते १०६)

भक्तराज ग्रंथ शके १६००–१६५० दरम्यान प्रसिद्ध होता. "[४] वस्तुस्थिती आहे ती अशी " सार्धसोळाशते शालीवाहनी। संवत्सर किलकाभिधानी। फाल्गूण त्रीतीया कृष्णी। गुरुवासरी ग्रंथ समाप्त ॥ ९ ॥ फाल्गुन कृष्ण शके १६५० – किलक नामसंवत्सर रोजी ग्रंथ लिहून पुरा झाला. "[५] असे सौ. मोरजे यांनी टिपणात स्पष्ट केलेले आहे. (श्री. पोहनेरकर यांनी शके १६६९ असा तो काल नोंदलेला आहे. (पृ. ३९)

डॉ. म. रा. जोशी भक्तराज्यकर्त्यांचा समय शके १५६०–१६२० दरम्यानचा असल्याचे सांगतात. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, त्या ग्रंथाचा शब्दकोश शके १६५० मध्ये तयार करण्याची आवश्यकता भासण्याइतका तो अर्थबोधाला कठीण झाला होता का ? पैठणकर एकनाथ ज्ञानेश्वरांनंतर तीनशे वर्षांनी 'ज्ञानेश्वरी' शुद्ध करतात. 'ज्ञानेश्वरी–टिपण'कार उगाउकर जगन्नाथ बाळकृष्ण, आपला ग्रंथ शके सोळाशेसत्तर येक उणे' म्हणजे शके १६६९ साली सिद्ध करतात,[६] या उदाहरणावरून कमीत कमी दोन-तीनशे वर्षांनंतर एखाद्या ग्रंथाचा भाषाकोश तयार होत असावा असे अनुमान काढता येते. ग्रंथाबरोबर त्या ग्रंथाचा शब्दकोश असणे त्या काळात तरी संभवत नाही. डॉ. जोशी 'भक्तराज' ग्रंथ शके १६०० ते १६५० च्या दरम्यान होता असे जे म्हणतात ते बरोबर आहे. पण शके १५६०–१६२० या काळातील जनीजनार्दन परंपरेतील " ज्ञानेश्वर " **भक्तराज ग्रंथ शके १६५० मध्ये लिहायला अस्तित्वातच** नाही हे लक्षात घ्यावे लागते.

पुढे डॉ. जोशी प्रस्तुत विषयाच्या संदर्भात जनीजनार्दन एकनाथाचे उल्लेख ज्ञानदेवविरचित भक्तराज ग्रंथात येतात. भक्तराज ग्रंथाच्या दोनशे बाराव्या ओवीतही जनीजनार्दनाचा उल्लेख येतो. उदा :– आता जनी जनार्दन। यासि नाही भेद भिन्न। तरी माया जाळी कवण। बांधिला जाये ॥ २१२ ॥ असा आधार देतात.[७]

माझ्या जवळील हस्तलिखितातील ओव्या, या संदर्भात अधिक स्पष्टीकरणासाठी देतो :—

जेवि उंस रसा पासूनि उपनलि गूळसाकर ॥
येकचि गोडि पृथकाकार। तैसे येकचि सुवे साचर विस्तार।
तयाचाची किर ॥ २१२ ॥
संम्यक जनि वनि **लसा** जनार्दन।
तयासी **किर नाहि** भेद भिन्न भिन्न।
तरि का **मोघप्राणि** माया जाळे करून।
बांधला जाये ॥ २१३ ॥

४. म. रा. जोशी, उपरोक्त पृ. ३७

५. पद्मा मोरजे उपरोक्त पृ. १०३

६. 'ज्ञानेश्वरी टिपण'.–संपा–कानडे आणि कुळकर्णी, पुणे विद्यापीठ, पृ. ३२.

७. म. रा. जोशी, उपरोक्त पृ. ३८

खरे म्हणजे " एकम् सत् विप्राः बहुधा वदन्ति " या कल्पनेचे हे स्पष्टीकरण आहे. कोशकाराने या ओवीतील शब्दाचे अर्थ अनुक्रमे असे दिलेले आहेत :– संम्यक–संपूर्ण; लेसा–बरे रीती; किर नाहि–निश्चयें नाही; मोघ प्राणी–व्यर्थ प्राणी. याचा अर्थ शके १६५० साली ' भक्तराज ' ग्रंथाची प्रत व कोश लिहिणाऱ्या लेखकाला या ओवीत ' जनीजनार्दन ' असा उल्लेख माहीत होता असे दिसत नाही. प्रा. गावस्कर यांनी आपल्या टिपणात या संदर्भांत नोंद घेतली आहे आणि जनी जनार्दनाचा उल्लेख आढळतो तो अलंकरणाच्या ओव्यांत की साभिप्राय याचा शोध घ्यावा लागेल. अन्यत्र (मुद्रित प्रतीत) ' आता जनी वनी जनार्दन ॥ ' असा पाठभेद आहे ' असे म्हटले आहे.[८] यावरून आपण असे म्हणू शकू की शके १६५० नंतर केव्हा तरी काही कारणाने ' जनी जनार्दन ' असा पाठ झाला असेल. त्यापूर्वी तो तसा असता तर कोशकारांनी तरी तशी नोंद घेतली असती. जनीजनार्दनाच्या परंपरेतील लेखकाने ती निश्चित घेतली असती. तेव्हा डॉ. जोशींनी सादर केलेला आधार ' भक्तराजकर्त्यावर ' विशेष प्रकाश पाडू शकत नाही. ते ज्या आधारावर व दिशेने विचार मांडीत आहेत त्याने भक्तराजकर्त्याचा शोध लागणार नाही. या संदर्भात पुढे विवेचन येईलच.

डॉ. जोशी आणि इतर संशोधक ' भक्तराज ' या मूळ ग्रंथाची ओवी संख्या ' तीनशे दोन ' होती याबद्दल एकमताने सांगतात. पण डॉ. जोशी यानंतर आपला अभिप्राय देताना म्हणतात,' नंतरच्या नकलकारांनी ग्रंथ ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचा समजून कालदर्शक ओवी समाविष्ट केली. ' ज्ञानदेव विरचित भक्तराज संपूर्ण ' अशी मूळ ग्रंथामध्ये गद्यात नोंद होती. '[९] डॉ. जोशी यांच्या माहितीसाठी माझ्याकडील हस्तलिखितात ' भक्तराज ' ग्रंथाची अखेर काय आहे ते उद्धृत करणे योग्य ठरेल—

ग्रंथाचे अभिधान भक्तराज । महाराष्ट्र सुगम जाला सहज ।
दृढ भक्तिभावे चिंतने तुज । तुवाहि सतत हृदइं आसावे ॥ ३०१ ॥
इति श्रीज्ञानेश्वर सूमनकृत । मंजिर रूपे श्रीनिवृतिपदि पारंगत ॥
ग्रंथ केला सह आर्थ विवरित । प्रतिपावो परब्रह्मी ॥ ३०२ ॥
" इति श्री ज्ञानेश्वरकृत भक्तराज ग्रंथ संपूर्णमस्तु । तत्सतब्रह्मार्पणमस्तु ॥

यावरूनही डॉ. जोशी यांच्या लक्षात येईल की वि. ल. भावे यांनी दिलेले समाप्ती ओवी किंवा त्यांनी वेगळ्या पाठासह नोंदलेली ओवी ह्या शके १६५० नंतरच्या आहेत. ग्रंथात नंतर घातलेली ती भर आहे. मूळ ग्रंथात कालोल्लेख नाही. पण ग्रंथ ज्ञानेश्वरकृत असून त्याचे नाव ' भक्तराज ' असल्याचे विधान स्पष्ट आहे. त्याबद्दल संहितेत तरी कुठे शंकेला जागा नाही. श्री. न. शे. पोहनेरकर यांनी आपल्याकडील ' भक्तिराज ' हस्तलिखितासंबंधी एका सांप्रदायिक अभ्यासू विद्वानाशी विचारविनिमय केल्याचा उल्लेख

८. सु. आ. गावस्कर, उपरोक्त पृ. १२१
९. म. रा. जोशी, उपरोक्त पृ. ३९

आपल्या लेखात [१०] केला आहे. " त्यांच्या (अभ्यासकाच्या) मते गुरूची लक्षणे यांत आलेली असताना, श्रीज्ञानेश्वर आपल्या गुरूचा, श्रीनिवृत्तिनाथांचा अवश्य उल्लेख करतील परंतु तसा प्रकार येथे नाही. " सांप्रदायिक अभ्यासकाला हवा असलेला उल्लेख " मंजिर रूपे श्रीनिवृत्तिपदि पारंगत " अशा स्वरूपात मूळात आहे मला वाटते त्या सांप्रदायिक अभ्यासकाला ' भक्तराज ' ग्रंथ ज्ञानेश्वरांचाच आहे हे मान्य करण्यास प्रस्तुत आधार भरपूर आहे.

प्रस्तुत हस्तलिखितात मूळ " भक्तराज " ग्रंथाची ओवी संख्या ३०२ असलेली संहिता संपल्यावर वेलबुट्टीचे चित्र काढून ग्रंथ संपल्याचे स्पष्ट केले आहे व त्यानंतर ९ ओव्यांत लेखनिक आपले निवेदन, काल्लोल्लेख आदी मांडतो आहे. हस्तलिखितानुसार या ओव्या अशा :—

अभिधान चतुराक्षरी । ग्रंथ भक्तिसार ज्ञानेश्वरी ॥
कथिली ते जगदोद्धार करी । नमस्कार करी तयासी ॥१॥
आर्थ करूनि पढतिल भावार्थी । वाचिता मन मिळे परमार्थी ॥
संशयो नाही यदर्थी । श्रीकृष्ण वरद आथी ॥ २ ॥
येका म्हणे मज शिष्यासी लिहिता । देवे तेचि वाचणे तत्त्वता ॥
तेणे श्रवणि लोचनी सादरता । संम्येक इंद्रियांसी ॥ ३ ॥
सूख स्वहित आनिभ्रांत । सूचले ऐका पघळ हित ॥
श्रीहरिचरणि भावार्थ पारंगत । तेणें सार्थक जन्माचें ॥ ४ ॥
ग्रंथ जाला श्रीगुरूच्या प्रसादे । पघळ आनूसंधानाचेनि छंदे ॥
लिहिता लीहिता आर्थाबोधे । बोधला येका ॥ ५ ॥
येका वंचूनि येका । म्हणता नये (नये) जालो मूंका ॥
मूकाचि जाला बाळक येका । लेखक येका त्याचेनी ॥ ६ ॥
त्याचे त्यासचि मानले । त्यांचेचि कौतुक त्यांनि केले ॥
बोलें बोलतां दुजे जालें । केले न केलें येकचि येक ॥ ७ ॥
सार्द्धसोळाशते शालिवाहनी ॥ ८०० ॥ संवत्सर किलकाभिधानी ॥
फाल्गूण त्रीतिया कृष्णी । गूरूवासरिं ग्रंथ समाप्त ॥ ८ ॥
भक्तराजाचि संपूर्णता । श्री ज्ञानेश्वर साह्य होता ॥
म्हणोनि कार्यासि कटाक्षता । जाला लीहिता तोचि तो ॥ ९ ॥

या निवेदनाच्या आधारे पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

(१) " येका ह्मणे मज शिष्यासी लिहिता " येका नावाच्या कुणा गुरूचा शिष्य या ' भक्तराज 'ची प्रत करतो आहे.

(२) ग्रंथ जाला श्रीगूरूच्या प्रसादे । पघळ आनूसंधानाचेनि छंदे । लीहिता

१०. न. शे. पोहनेरकर, उपरोक्त पृ. ४०

लीहिता आर्थांबोधे । बोधला येका ॥ ५ ॥

हा ग्रंथ गुरूच्या प्रसादाने– त्याने केलेल्या विस्तृत स्पष्टीकरणाने– हा ग्रंथ लिहिणारा " येका " ग्रंथ लिहिता लिहिता अर्थबोध करू शकला.

(३) लेखक " येका " आणि गुरु ' येका ' यात अद्वैत आहे. इतकेच नव्हे तर लेखक ' येका ' गुरु ' येका 'ची निर्मिती आहे.

(४) ग्रंथ लेखनाला ज्ञानेश्वराचे सहाय्य (कृपा) होती. त्यामुळे ग्रंथ लिहिण्याला जी कटाक्षता हवी ती लाभली. त्यानेच माझ्याकडून ग्रंथ लिहून घेतला.

आता आपणाला अशी अनुमाने मांडणे शक्य आहे :—

भक्तराज ग्रंथ शके १६५० यावर्षी लिहून काढणारा लेखक कुणी येका आहे. तो गुरूच्या प्रसादाने ग्रंथ लिहिण्याचे काम करीत आहे. गुरूच्या प्रसादाने व ज्ञानेश्वरांच्या कृपेने काहीशा कटाक्षतेने प्रस्तुत ग्रंथ त्याच्याकडून लिहिला गेला. म्हणजे ' भक्तराज ' ग्रंथाची प्रत केली गेली. याचा अर्थ ग्रंथ त्याच्यापूर्वी अस्तित्वात होता. तसाच त्याने नकलला व आपले निवेदन नंतर दिले. मूळ ग्रंथात बदल केला नाही. हा ग्रंथ ज्ञानेश्वरी भक्तिसार आहे. आता ग्रंथातील शब्द कालांतरामुळे दुर्बोध झाले आहेत म्हणून तो कोश देतो आहे. ग्रंथाचे कर्तृत्व ' निवृत्तिपदि पारंगत ' असलेल्या श्रीज्ञानेश्वरांचे आहे हे त्याला मान्य आहे. त्याच्या मनात कुठेही संशय नाही. ३०२ ओव्यांनंतर लेखनिकांच्या निवेदनामुळे आपण संशय घेत आहोत. पण ते लेखनिक आहेत, ग्रंथकर्ते नव्हेत. त्यामुळे **' भक्तराज ' ग्रंथाचे कर्तृत्व ज्ञानेश्वराचे आहे याबद्दल** शंका नसावी.

डॉ. म. रा. जोशी यांच्या समाधानासाठी गुरुशिष्य परंपरा अशी मांडता येईल. जनार्दन–एकनाथ–येका. पण ती प्रत करणारांची, ग्रंथकर्त्यांची नव्हे.

अधिक सुबोध करून सांगायचे झाले तर एकनाथांनी ज्ञानेश्वरी जशी पाठशुद्ध केली, तसेच कार्य " येका " शिष्य ' येका ' ने भक्तराज ' ग्रंथातील ' शब्दकोश ' देऊन शके १६५० मध्ये केले. एकनाथांनी जशी ज्ञानेश्वरी लिहिली नाही, तिचे कर्तृत्व ज्ञानश्वरांचेच आहे. तसेच ' भक्तराज 'चे कर्तृत्व ज्ञानेश्वरांचे आहे. " येका " चे नाही. आणि आंबेजोगाईच्या जनीजनार्दन परंपरेतील ज्ञानदेवांचेही नाही.

प्रा. जोशी यांनी प्रियोळकर यांनी उल्लेखिलेल्या ' शंकास्पद ' रचनेसंबंधी युक्तायुक्तता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे आणि पुढे त्यांनी गुरूची नाममुद्रा घेऊन (होऊन) गावबाने भावार्थरामायण पूर्ण केले. तसेच मुक्तेश्वरानेदेखील एका जनार्दन नाममुद्रेने भावार्थ रामायणाचे उत्तरकांड पूर्ण केले"[११] असे उदाहरण दिलेले आहे. या संदर्भात तो ग्रंथ मूळ गुरूचेच कर्तृत्व असते. गुरुसंबंधीच्या श्रद्धेने–आदराने–नैतिक बंधने मानीत असल्यामुळे तो लेखनिक झाला तरी ग्रंथकर्तृत्व त्याने घेतले नाही. प्राचीन ग्रंथांच्या बाबत हे खूपदा घडताना दिसते. जनी जनार्दन परंपरेतील " ज्ञानेश्वर "

---

११. म. रा. जोशी, उपरोक्त पृ० ४०

त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या, मान्यता पावलेल्या " ज्ञानदेवां " च्या ग्रंथाचे कर्तृत्व स्वतः घेणे शक्य वाटत नाही. दुसरे एक उदाहरण डॉ. जोशींच्या माहितीसाठी देत आहे. निवृतेश्वरी, सोपानदेवी, मुक्तेश्वरी असे तीन गीताटीका ग्रंथ वेगवेगळे असल्याची समजूत आजवर अभ्यासकांत आहे. निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्तेश्वर हे एकाच परंपरेतील आहेत. वरील तीन टीका ग्रंथ वेगळे वेगळे नसून " निवृत्तिदेवी " चे कालसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष अवतार आहेत.[१२] हे मी स्पष्टपणे दाखविले आहे.

श्री. पोह्नेरकरांनी आपल्या हस्तलिखितातील पाच ओव्यांची संहिता दिलेली आहे. त्यांच्या माहितीसाठी माझ्या हस्तलिखितातील ओव्या उद्धृत करीत आहे.

विषय सूखाचिया सानूराग चाडे । आनाचार आज्ञान पघल वाढे ॥
सेवटि उबडी पडताति दाढे । कृतांताचिये ॥ १०२ ॥
जे ऐसें जाणोनि जाले सावचित । वुझोनि करीति आत्महित ॥
तयासि पूर्व विभव जाले उदित । याव्याजे तदा शेत (?) ॥ १०४ ॥
हे माया जाळे आलिमात्र गूंडाळिले । हे त्रिदोसि नावानावं दंडिले ॥
हे जिवासि प्रौढ गहन मांडले । फांसा पडले काळाचिया ॥ १४२ ॥
संम्यक रोग राहिले सांदोसांदी । जैसे जन्मजन्मातरीचे दंदी ।
सांपडलियां धूंदमार युद्धी । नावे कन राखती जिवै ॥ १४३ ॥
त्याकाळे गहन खर्ग घेउनि करी । घाव उचलिला त्रिधातुकावरी ।
वेळ आलिया आळुभाळ पळभरी । जिताणे राहो नेदी ॥ १४५ ॥

डॉ. जोशी ज्या आंबेजोगाईच्या परिसरांतील " ज्ञानेश्वर " जनीजनार्दन परंपरांच्या संदर्भात ' भक्तराज ' कर्त्या ज्ञानेश्वरांचा शोध घेत आहेत, त्या परंपरेतील त्यांना उपलब्ध झालेल्या प्रती शके १६५० नंतरच्या आहेत. तेव्हा त्यांनी ' भक्तराज ' ग्रंथ आपल्या परंपरेतील आहे आणि मग तो आपल्या परंपरेत बसला पाहिजे म्हणून आपल्या सोयीनुसार श्री. जोशींनी उद्धृत केलेल्या ओव्या समाविष्ट केल्या असणे शक्य आहे.

पोह्नेरकरांनी आपल्या हस्तलिखितातील ३०१ वी ओवी दिली आहे. (पृ. ४२) तशा स्वरूपाची ओवी (३०० वी) माझ्या हस्तलिखितात आहे ती अशी :

" ज्ञानदेवि भगवद्गितेचिसह आर्थ टिका । संस्कृताचि पघळ टिका ते ऐका ॥
श्रीकृष्णे आर्ज्जुनासि॥हाचि बोध केला निका ॥ गीता अष्टादशाध्याइ ॥३००॥

तरी ' भक्तराज 'ची सर्व हस्तलिखिते बारकाईने तपासून ' भक्तराज 'चा सर्वांगीण अभ्यास होणे आवश्यक आहे, याबाबत कुणाचेही दुमत होणार नाही. मी भक्तराजकर्त्या ज्ञानदेवासंबंधी शोध घेणाऱ्या संशोधकांना काही माहिती पुरविली एवढेच.

✦ ✦ ✦

१२. गंगाधर मोरजे " निवृत्तिनाथकृत निवृत्तिदेवी " (छापत आहे.)

निवृत्तिनाथकृत निवृत्तिदेवी

निवृत्तिनाथांच्या रचनेसंबंधी संशोधन : महाराष्ट्राच्या अलौकिक विभूतीमध्ये निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ही चारही भावंडे आपापल्या सामर्थ्याने तळपताना दिसतात. यापैकीं ज्ञानदेवांच्या रचनांचे बरेचसे संशोधन झालेले असून त्या रचनांच्या महात्मतेबद्दल सर्वांत एकवाक्यता झालेली दिसते. चौघाही भावंडांची अभंगादी स्फुट रचनाही प्रसिद्ध आहे. ज्ञानदेवांचे ग्रंथकर्तृत्व व अभंग रचना याबद्दल मधून मधून वादळे उठतात पण अंतर्गत पुराव्यावरून ज्ञानदेवीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव एकच असल्याचे आता जवळ जवळ मान्य झालेले आहे.

ज्ञानदेवांचे वडीलबंधू व गुरू निवृत्तिनाथ यांची काही स्फुट रचना सोडली तर त्यांच्या ग्रंथरचनेबद्दल अजून साधार कुणी मांडलेले नाही. " निवृत्तिनाथांच्या नावावर " निवृत्तिसार ", " निवृत्तिगीता ", " उत्तरगीता " असे तीन ग्रंथ ऐकू येत असले तरी त्यांतील आज एकही उपलब्ध नाही." असे सारस्वतकार सांगतात.[1] आणि पुढे म्हणतात, " ठाणे येथील संशोधक श्री. रा. म. आठवले यांनी 'एक निवृत्तेश्वरी' प्रसिद्ध केलेली आहे पण ती निभ्रांतपणे निवृत्तिकृतच होय हे अजून ठरावयाचे आहे." [2] यावरून असे दिसते की निवृत्तिनाथांच्या रचनेबाबत अजूनही अनिश्चितता आहे.

सारस्वतकारांनी श्री. आठवले संपादित " निवृत्तेश्वरी " म्हणून ज्या ग्रंथाचा उल्लेख केलेला आहे त्या ग्रंथाचा शोध घेण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला. पण तो ग्रंथ मिळू शकला नाही. या संदर्भात मी स्वतः श्री. रा. म. आठवले यांची मुंबई मुक्कामी भेट घेतली. उपरोक्त 'निवृत्तेश्वरी" संबंधी चौकशी केली. त्यावेळी त्यांनी " अजूनही तो ग्रंथ प्रकाशित झालेला नाही, त्या ग्रंथाचे काम मात्र चालू आहे. आपण जी " निवृत्तेश्वरी " संपादित करीत आहोत ती ज्ञानेश्वर बंधू निवृत्तिनाथांचीच " आहे असे सांगितले. ते संपादित करीत असलेली हस्तलिखित पोथी वा त्या संदर्भात छापलेला

१. **महाराष्ट्र सारस्वत** वि. ल. भावे; आ. ५ वी, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन. इ. स. १९६३ (पुरवणी) पृ. ७२७

२. तत्रैव — वि. ल भावे; आ. ५ वी, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन. इ. स. १९६३ (पुरवणी) पृ. ७२७

मजकूर दाखविण्यास विशेष उत्सुक दिसले नाहीत. असो.

श्री. रा. म. आठवले " निवृत्तेश्वरी "चे संशोधन साधारणपणे १९३० सालापासून करीत आहेत. त्यांचा या विषयावरील ग्रंथ प्रकाशित होईल तेव्हा बरीचशी नवीन माहिती उजेडात येईल. तो ग्रंथ प्रकाशित होण्याचा योग लवकरच येवो. मला उपलब्ध झालेल्या साधनानुसार " निवृत्तिनाथकृत निवृत्तिदेवी " संबंधी काही विचार जाणकारांच्या समोर ठेवीत आहे.

निवृत्तिनाथांनी ग्रंथरचना केली असणे शक्य आहे काय ? ज्ञानेश्वरीत जागोजागी निवृत्तिनाथांचा उल्लेख आदरपूर्वक येतो. ज्ञानेश्वरांना गुरुस्थानी असणारी ही व्यक्ती सामान्य असणे शक्य नाही, अभंगादि स्फुट रचना निवृत्तिनाथांनी केली होती व ती आज प्रसिद्धही आहे, ठिकठिकाणी निवृत्तिनाथांच्या रचनेचे उल्लेख सापडत असले. तरी ती रचना प्रत्यक्षात सापडत नाही किंवा अजून तरी ती उपलब्ध होऊ शकत नाही असे सारस्वतकारांचे म्हणणे आहे. निवृत्तिनाथांची ग्रंथरचना उपलब्ध झालेली आढळत नाही म्हणून निवृत्तिनाथांनी ग्रंथरचना केलीच नाही असे म्हणणे तर्काला धरून होणार नाही.

याबाबत आणखी एक शंका उपस्थित होणे शक्य आहे. ती म्हणजे निवृत्तिनाथांचे बंधू श्री ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीसारखी रसाळ व समर्थ अशी गीताटीका त्यांच्याच आज्ञेने लिहिलेली असता निवृत्तिनाथांनी " गीताटीका " किंवा " निवृत्तिदेवी " यासारखी रचना करण्याची आवश्यकता तरी काय ? किंवा समजा निवृत्तिनाथांनी प्रथम आपला गीता टीका ग्रंथ लिहिला असेल तर मग गुरूने केलेल्या रचनेवरच आपण निराळी ज्ञानेश्वरीसारखी रचना करण्याची आवश्यकता ज्ञानेश्वरांना का भासली असेल ?

या प्रश्नांची उत्तरे देताना आपणास असेच म्हणावे लागेल की एकाने केलेल्या रचनेवर दुसऱ्याने रचनाच करू नये असा कुठेही निर्बंध नाही, तसेच शिष्यापेक्षा गुरूची रचना सरस असतेच किंवा असायला पाहिजे असे कुणीही जाणकार म्हणणार नाही. शिष्य लोकप्रिय रचनाकार असतो म्हणून गुरूही तसा असतोच असेही नाही. या संदर्भात अलिकडील एक उदाहरण द्यायचे झाले तर परमहंस व विवेकानंद या गुरुशिष्याचे देता येईल. " परमहंस " याचा सूत्ररूप उपदेश विवेकानंदांनी आपल्या वक्तृत्वाने व शैलीने जगभर पसरविला. दोघांनाही एकाच तत्त्वाचा प्रसार करावयाचा होता. पण दोघांचीही शैली भिन्न होती. एकाच्या समोर बुद्धीने तल्लख असणारा शिष्यवर्ग होता. सूत्र मांडताच आशय अवगत होण्याची ताकद त्या शिष्यवर्गात होती. विवेकानंदांच्या समोर अखिल मानव समाज होता. त्यांना आपले तत्त्वज्ञान जेवढे स्पष्ट करून सांगता येणे शक्य होते तेवढे स्पष्ट करणे भाग होते. यात दोघांच्या श्रेष्ठकनिष्ठत्वाचा भाग नाही. विवेकानंदांना लोकसंग्रह व वक्तृत्वाचे " वरदान " होते. परमहंसांना अशा वरदानाची आवश्यकता भासली नाही. निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर यांचे बाबत आपणास असे म्हणता येणार नाही काय ? निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वराच्या आधी

गीतेचे सार मराठीत प्रथम सांगितले असावे. ज्या काळात प्राकृतातून-मराठीतून रचना करणे अवघड होते त्या काळात निवृत्तिनाथांनी पुढे होऊन मराठीतून गीताटीका करता येते हे " सार " रूपाने आपल्या " निवृत्तिदेवी " रचनेने दाखविले असणे शक्य आहे. मराठीतून " गीता " विषय मांडता येतो याची दिशा निवृत्तिनाथांनी दाखविली असेल आणि मग " व्याख्या " ज्ञानेश्वरांनी लिहिली असेल. ज्ञानेश्वर व निवृत्तिनाथ या दोघांच्या उपलब्ध प्रकाशित वाङ्मयाचा विचार करता काव्यात्मकता, रसिकता, निवेदनाची सरसता याबाबत ज्ञानेश्वरच उजवे ठरतात ही बाब सर्वश्रुत आहे. त्यावरून ' निवृत्तिदेवी ' ची रचनादृष्ट्या तुलना " ज्ञानेश्वरी "शी करण्याची अपेक्षा कुणी धरणार नाही.

निवृत्तिनाथांनी रचना केली होती हे साधार सिद्ध करण्यासाठी वरील अनुमाने फारशी उपयोगी पडणार नाही. याबाबत निर्णय करावयाचा असेल तर

(१) निवृत्तिनाथांनी रचना केली होती असे सांगणारे बाह्य पुरावे (समकालीन वा उत्तरकालीन) शोधून मांडणे.

(२) त्या पुराव्यावरून निवृत्तिनाथांच्या रचनेचे स्वरूप समजत असेल तर त्याचा शोध घेणे.

(३) निवृत्तिनाथांच्या नावावर ज्या गीताटीका उपलब्ध आहेत त्या तपासून त्यांचे वर्गीकरण करणे (स्वरूपाच्या आधारे).

(४) अंतर्गत पुराव्यावरून ज्ञानेश्वर " बंधू " " निवृत्तिनाथांच्या " गीता-टीकेचा शोध घेणे.

या गोष्टींचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. हे काम करीत असता कोणताही पूर्वग्रह नसावा ही गोष्ट मान्य व्हावी.

समकालीन व उत्तरकालीन बाह्य पुरावे (अ) ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीत प्रत्यक्ष " निवृत्तिदेवी " चा नसला तरी निवृत्तिनाथाच्या रचनेचा उल्लेख केलेला आढळतो. तो असा.

> तीरे संस्कृताची गहने । तोडोनिया मराठी शब्द सोपाने
> रचिली धर्मनिधाने । निवृत्तिदेवे ।। अध्याय ११।९

ज्ञानेश्वरीचे मान्यवर संपादक ह. भ. प. शं. वा. दांडेकर यांनी " धर्माची खाण जे माझे गुरु निवृत्तिनाथ, त्यांनी मला कारणीभूत करून संस्कृत भाषारूपी कठीण (उंच डगरीचे) किनारे फोडून मराठी भाषेतील शब्दरूपी पायऱ्यांचा घाट बांधला " असा या ओवीचा अर्थ लावलेला आहे.‡ ज्ञानेश्वर वारंवार गुरूच्या प्रेरणेने, कृपादृष्टीमुळे आपण हे काम करण्यास समर्थ झालो आहोत असे सांगतात. त्यामुळे इथे असा अर्थ लावला गेला आहे असे वाटते. व्याकरण दृष्ट्या " रचिली धर्मनिधाने । निवृत्तिदेवे । याचा अर्थ " धर्माची खाण जे निवृत्तिदेव त्यांनी रचली " असा सरळ आहे. " मला

‡) **ज्ञानेश्वरी**, शं. वा. दांडेकर, आ. प्रसाद प्रकाशन–पुणे : पृ. ३२१

कारणीभूत करून " असे ओढून ताणून पद आणण्याची (अर्थासाठी) गरज दिसत नाही. ज्ञानेश्वर ग्रंथप्रेरणा गुरूंनी दिली असे सांगतात तसेच निवृत्तिनाथ आपल्या गुरूचेही अशाच प्रकारचे ऋण उल्लेखताना अभंग रचनेत दिसतात. याबाबत दोघांचेही गुरूबद्दलचे उल्लेख अगदी स्पष्ट असतात. अर्थाची अशी ओढाताण करण्याची आवश्यकता भासत नाही. तेव्हा " निवृत्तिदेवे रचिली " यावरून निवृत्तिनाथांनी संस्कृत रचना तोडून कोणती तरी मराठी रचना केली असावी असे या ओवीवरून दिसते. यावर कुणी असे म्हणण्याची शक्यता आहे की निवृत्तिनाथांनी रचना केली होती ती अभंगादि स्फुट रचना. तिचा उल्लेख या ओवीत असलाच तर असण्याची शक्यता गृहीत धरावी. स्वतंत्र ग्रंथरचना कशी गृहीत धरता येईल ? पण अभंगादी रचना ही संस्कृत रचनेवरून आणण्याची काही गरज दिसत नाही. संस्कृताची कोंडी फोडण्यासाठी तसेच काहीतरी मातबर काम निवृत्तिनाथांनी केले असावे की ज्यामुळे ज्ञानेश्वरही प्रभावित झाले असावेत व त्या कार्याचा उल्लेख अपरिहार्यपणे त्यांच्याकडून केला गेला असावा.

(आ) नामदेव हा ज्ञानेश्वर समकालीन संतकवी. त्याने आपल्या अभंग गाथ्यात चौघाही भावंडांची चरित्रे गायिली आहेत. तेव्हा नामदेव गाथ्यातील अभंगाचा पुरावा या दृष्टीने अत्यंत विश्वसनीय ठरावा. पण त्या गाथ्यातही अनेक नामदेवांच्या रचनांचा भरणा असल्यामुळे सावधगिरीने शोध घ्यावा लागतो. सुप्रसिद्ध संशोधक श्री. रा. चिं. ढेरे नामदेव गाथ्यातील " ज्ञानेश्वर चरित्र " विषयक लिहिताना म्हणतात : " सर्वसाधारणपणे नामदेव गाथ्याचे स्वरूप जसे शंकास्पद वाटते तसेच या गाथ्यातील ज्ञानेश्वरविषयक प्रकरणांचेही वाटते. " कारण ही प्रकरणे समकालीन नामदेवाची ठरत नसल्यामुळे त्यांच्या विश्वसनीयतेला मर्यादा पडते. ज्ञानेश्वर चरित्रविषयक प्रकरणे ज्ञानेश्वर समकालीन नामदेवाची नसून त्यानंतर दोन तीन शतकांनी " नामदेवाची भूमिका " घेऊन अन्य कोणीतरी रचली असावीत.[३] हे सर्व सांगून श्री. ढेरे पुढे म्हणतात, " विश्वसनीयतेला मर्यादा पडत असली तरी ती सर्वस्वी असत्यावर आधारलेली आहे असे मानण्याचे कारण नाही. त्यातही अनेक सत्याचे कण विखुरलेले असण्याचा संभव आहे.[४]

निवृत्तिनाथांच्या समाधी प्रकरणात निवृत्तिनाथांच्या गत आठवणींचे स्मरण होऊन नामदेव सांगतो.

> " गहिनीनाथे मज सांगितले सार । केली ज्ञानेश्वरे व्याख्या त्याची
> काढिला शोधून अनुभव मुक्ताईने । ते ज्ञान सोपाने संपादिले ॥२॥[५]

---

३) **विविधा** रा. चिं. ढेरे; नीलकंठ प्रकाशन, पुणे : इ. स. १९६७; पृ. १०४

४) तत्रैव ,, ,, ,, पृ. १०८

५) **श्री नामदेव महाराज यांच्या अभंगाची गाथा** : आवटे प्रत, शके १८३० पुणे : अभंग : ७२० पृ. २६५

आपले गुरू गहिनीनाथ.त यांच्या कृपेने आपण " सार " सांगितले. त्या "सार"ची "व्याख्या" ज्ञानेश्वरांनी केली. ज्ञानेश्वरांची ती व्याख्या म्हणजे "ज्ञानेश्वरी" होय आणि ते ज्ञान सोपानाने जोपासले. सोपानाने ते ज्ञान कसे जोपासले ते आपण पुढें पाहू. या अभंगावरून निवृत्तिनाथांची " सार " रूप रचना वा "सार" नावाची कोणती तरी रचना होती तिच्यावर ज्ञानेश्वरांनी स्पष्टीकरणात्मक ग्रंथ लिहिला व त्याची जपणूक सोपानदेवांनी केली असे दिसते.

संस्कृतमध्ये सार शब्दाचा अर्थ थोडक्यात आशय सांगणे असा आहे व व्याख्या याचा अर्थ स्पष्ट करणे, अर्थविस्तार करणे, असा आहे. या दोन्ही अर्थांचा विचार करीत असता निवृत्तिनाथांच्या " सार " रचनेला व ज्ञानदेवांच्या व्याख्येला विशेषच अर्थ असावा असे जाणवते.

याच प्रकरणात " निवृत्तिनाथांच्या सार " रचनेसंबंधी नामदेव काय म्हणतो ते पहा–

निवृत्तिदेवे ग्रंथ केला होता सार। ठेविला समोर विठोबाच्या
अवघ्या जनालागी केला नमस्कार। उठावले भार वैष्णवांचे ॥[६]

या अभंगावरून " निवृत्तिनाथांची सार " नामक ग्रंथरचना नामदेवाला माहीत होती याबद्दल कुणाला शंका राहू नये. आता या ग्रंथाचे नाव " सारग्रंथ " असे होते की स्वरूप "सार" होते असा प्रश्न मनात उपस्थित होणे साहजिक आहे. याद्दष्टीने नामदेवाने तीनही भावंडांच्या रचनेचे केलेले उल्लेख विचारात घेणे आवश्यक व महत्त्वाचे ठरावे. नामदेवाच्या वरील दोन्ही अभंगांत निवृत्तिनाथांच्या रचनेचे उल्लेख आलेले आहेतच. तसा ज्ञानेश्वरांच्या "व्याख्या" रचनेचाही उल्लेख आलेला आहे. याशिवाय ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा उल्लेख करताना नामदेव म्हणतो–

जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी।
पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥[७]

समाधी घेणाराची ग्रंथरचना समाधीच्या वेळी त्याच्या जवळ ठेवीत अशी पद्धत दिसते. सोपानदेवाच्या समाधी प्रकरणात नामदेव सोपानदेवांच्या रचनेसंबंधी लिहितो–

सोपानदेवे ग्रंथ केला होता सार।
ठेविला समोर निवृत्तीच्या ॥[८]

यावरून आपण असे म्हणू शकूं की सोपानदेवानी " सारग्रंथ " केला होता व तो निवृत्तिनाथांच्या समोर ठेविला. या "सार" शब्दावरून ग्रंथाचे स्वरूप कळणे अवघड

---

६) श्री नामदेव महाराज यांच्या अभंगाची गाथा; आवटे, पुणे शके १८३० अभंग ९३१ पृ. २६८

७) तत्रैव अभंग ८२५ पृ. २४२

८) तत्रैव अभंग ८६३ पृ. २५२

आहे. पण निवृत्तिनाथांच्या "ज्ञाना'ची संपादना सोपानाने केली असे दिसते. असो.

नामदेवाचे वरील संदर्भ लक्षात घेता श्री. ढेरे यांची नामदेव गाथ्याबद्दलची साशंकता गृहीत धरूनही असे म्हणता येईल की ज्ञानेश्वरांनंतर जो कोण नामदेव "नामदेवाची भूमिका" घेऊन चौघा भावंडांची चरित्रे लिहितो आहे, त्याला निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर व सोपान यांच्या ग्रंथरचनेची माहिती आहे. म्हणजे हे ग्रंथ त्याच्यापूर्वी अस्तित्वात होते. सुदैवाने वरील अभंग समकालीन नामदेवाचेच ठरले तर त्याने दिलेली माहिती अचूक ठरावी. दोन तीन शतकांनंतरचा असला तर त्याच्या आधी निवृत्तिनाथांची रचना होती असे खात्रीपूर्वक म्हणता येईल. पण त्या नामदेवाच्या आधी "ज्ञानेश्वर बंधू निवृत्ति" खेरीज एखादा 'निवृत्ति' ग्रंथरचना करून गेला असेल तर? त्या निवृत्तीच्या रचनेचा उल्लेख नामदेव कशावरून करत नसेल? नामदेवाची एक परंपरा आहे. त्रे पहिल्या 'निवृत्तीला' सोपान, ज्ञानेश्वर वगैरे बंधू आहेत. दुसऱ्या 'निवृत्ती' बद्दल नामदेवाची भूमिका घेऊन लिहिणारालाही तसा उल्लेख करावा लागला असता. निवृत्ती ज्ञानेश्वरांच्या परंपरेतीलच 'भूमिका' घेणारा नामदेव असला पाहिजे याबद्दल शंका नाही. तेव्हा नामदेव ज्या निवृत्ती रचनेचा उल्लेख करतो ती ज्ञानेश्वर बंधू "निवृत्तिनाथांची' रचना होय.

निवृत्तिनाथांनी रचना केली होती हे एकदा सिद्ध झाल्यावर त्या रचनेचे स्वरूप काय होते हे आपणास पाहावे लागेल. निवृत्तीकृत अनेक गीताटीकामुळे जो आज गोंधळ उडतो आहे त्यातून सुटण्यासाठी निवृत्तीने केलेल्या गीता टीकेचे स्वरूप निश्चित ठरवावे लागेल.

या दृष्टीने शोध घेता एक आधार सापडतो तो म्हणजे 'हुसेनांबरी' तंजावरच्या सरस्वती महालात एक गीता टीका आहे. तिचे दुसरे नाव 'अंबर हुसेनी' हस्तलिखित स्वरूपांत तिच्या तीन प्रती आहेत.

प्रस्तुत गीताटीका जिंजी येथे हुसेन अंबरखान नावाच्या एका मुसलमान कवीने शके १५७५ (सन. १६५३) साली लिहून पुरी केली. ज्ञानेश्वरीचा जसा सच्चिदानंदबाबा तसा या हुसेनांबरीचा 'लेखकु' नारायण झाला. या ग्रंथाचे शके १५७६ सालचे हस्तलिखित सरस्वती महालात आहे (वेदांत ४९).

हा हुसेनांबर आपल्या ग्रंथाच्या प्रास्ताविकांत लिहितो.

तेणे ही भगवद्गीतेची टीका : करिजे ब्रह्मबोध होवया निका
उपकारार्थ सर्व लोका। नांवे अंबरहुसेनी ॥ १० ॥

अच्युताश्रमनिवृत्तिनाथादिकी। गीतेचिये प्रतिश्लोकी।
केली वोवी येकी येकी। परि श्लोकार्थ संपूर्ण नसे ॥११॥

म्हणौनि जगद्वंद्य अंबरे। करिजे टीका श्लोकार्थानुसारें।
जे अवलोकिता विचारे। आत्मबोध पाविजे ॥ १२ ॥[९]

सोळाव्या शतकातील हा मुसलमान कवी अच्युताश्रमनिवृत्तिनाथादी कवींचा प्रामुख्याने उल्लेख करतो. एकतर त्या रचना बहुजन समाजाला माहीत असाव्यात. आणि त्याच पद्धतीने आपण लिहिलेली गीताटीका त्यांच्यापेक्षा अर्थाने कशी सरस आहे ते लोकांना स्पष्ट करून सांगावे असा त्याचा भावार्थ दिसतो. निवृत्तिनाथांचा स्पष्ट उल्लेख असून त्यांच्या गीताटीकेचे स्वरूपही अगदी स्पष्टपणे त्याने मांडलेले आहे. गीतेच्या प्रत्येक श्लोकावर एक एक ओवी रचण्याचे कार्य निवृत्तिनाथांनी केलेले आहे. म्हणजे गीतेच्या ७०० श्लोकांवर ७०० ओव्या हे "निवृत्तिदेवी"चे स्वरूप होय. आपली टीका श्लोकार्थानुसार आहे. म्हणजे प्रतिश्लोकी एक एक ओवी हे तिचे प्रमाण नाही हे उघड आहे असे तो म्हणतो. त्याने गीतेच्या ७०० श्लोकांवर ८१६ ओव्या रचल्या आहेत.

आपण आतापर्यंत केलेल्या चर्चेवरून पुढील अनुमाने काढू शकू.

(१) निवृत्तिनाथांनी गहिनीनाथांच्या कृपेने "सार" रचना केली.

(२) निवृनाथांच्या साररचनेवर ज्ञानेश्वरांनी "व्याख्या" केली. ज्ञानेश्वरांची व्याख्या म्हणजे "ज्ञानेश्वरी" तेव्हा निवृत्तिनाथांचे "सार" म्हणजे 'गीताटीका' "निवृत्तिदेवी" होय.

(३) निवृत्तिनाथांची "निवृत्तिदेवी" प्रतिश्लोकी एक एक ओवी अशा स्वरूपाची आहे.

(४) निवृत्तिनाथांची रचना सोपानदेवांनी जोपासली.

निवृत्तिकृत गीताटीकेची हस्तलिखिते व प्रसिद्ध ग्रंथ :

निवृत्तिकृत म्हणून जी गीताटीकेची हस्तलिखिते उपलब्ध आहेत त्यांचा शोध घेऊन वरील कसोटीला त्यांतील कोणती रचना उतरते ते पाहू.

उपलब्ध हस्तलिखिते पुढीलप्रमाणे आहेत.

(१) **भगवद्गीता टीका निवृत्तिकृत :** (मला उपलब्ध झालेली प्रत) नकलेचा काळ शके १६२२. प्रस्तावना ३० ओव्या. प्रस्तावनेच्या अखेरीस विनविंतुसे निवृत्तिदेवो। यथामति। असा कवीचा नामोल्लेख आहे. एकूण ओवी संख्या १५९६. संपूर्ण पोथी उपलब्ध आहे.

(२) **निवृत्तिदेवकृत भगवद्गीता टीका :** श्री समर्थ वाग्देवता मंदिर बाडांक २१९७. एकूण ओवी संख्या १५९६. नकलेचा काळ शके १७३२, संपूर्ण पोथी. आशयदृष्ट्या वरील क्रमांक १ प्रमाणे.

---

९) अ. का. प्रियोळकर; हुसेन अंबरखानकृत श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका; म. स. पत्रिका. वर्ष २ रे अंक १ ला. ऑक्टो. १९५४

(३) **निवृत्तिदेवकृत भगवद्गीता टीका :** समर्थ वाग्देवता मंदीर बाडांक ३५०. पोथी अपूर्ण असून पहिली दोन पाने व त्यातील चवदा ओव्या नष्ट. अध्याय १ ते ८ उपलब्ध मजकूर क्रमांक १ प्रमाणे.

(४) **गीता टीका :** ऐतिहासिक वस्तु-संग्रहालय, नगर, मिरीकर संग्रह, पोथी २३।१ पोथी अपूर्ण. मजकूर वरील क्रमांक १ प्रमाणे.

(५) **निवृत्तिटीका :** भा. इ. सं. मंडळ पुणे बाड क्रमांक २२।१०१ ओवी संख्या ११३९ नकलेचा काळ शके १५८३.

अपूर्ण अवस्थेत. इति श्री निवृत्ति टीका असा उल्लेख आहे.

(६) **गीता निवृत्ति** ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, नगर, मिरीकर संग्रह, पोथी २२।११. पोथी अपूर्ण. प्रतिश्लोकाला एक ओवी.

(७) **निवृत्तिदेवी टीका :** पंढरपूर संशोधन मंडळ. नकलेचा काळ शके १७११, १ ते १८ अध्याय संपूर्ण. प्रतिश्लोकी एक ओवी. आशयदृष्टया क्रमांक ६ प्रमाणे.

(८) **निवृत्तिदेवी :** उस्मानिया विद्यापीठ हस्तलिखित संग्रह. पोथी अपूर्ण, १ ते १६ अध्याय. प्रतिश्लोकी एक ओवी. आशयदृष्टया क्रमांक ६ प्रमाणे.

(९) **निवृत्तिदेवी :** सरस्वती महाल, तंजावर. ठोकळ क्रमांक १७४. नकलेचा काळ शके १६५१ संपूर्ण पोथी, प्रतिश्लोकी एक ओवी. आशयदृष्टया क्रमांक ६ प्रमाणे.

(१०) **निवृत्तिदेवी :** सरस्वती महाल, तंजावर, ठोकळ क्रमांक १७५. अपूर्ण. आशयदृष्टया क्रमांक ६ प्रमाणे.

(११) **श्रीमद्भगवद्गीता :** (भाग पहिला अध्याय पहिला) संपादक रा. स्वा. नाईक, ज. र. अजगांवकर, क. रा. अंबेवाडी, मराठीतील वीस गीताटीकांचे पहिले अध्याय या ग्रंथात छापण्यात आलेले आहेत. त्यात निवृत्तिदेवी, सोपानदेवी व मुक्तेश्वरी अशा तीन गीता वेगळ्या वेगळ्या छापल्या आहेत पण त्या आशयदृष्टया व भाषादृष्टया सारख्या आहेत. पंढरपूरच्या " निवृत्तिदेवी " शी त्या अगदी मिळत्य जुळत्या आहेत. एकच रचना तिघांच्या नावावर प्रसिद्ध असलेली दिसते. संपादकांनी वापरलेल्या हस्तलिखितांबद्दल विशेष माहिती दिलेली नाही.

वरील हस्तलिखितांचा साकल्याने विचार करताना तीन भाग प्रामुख्याने पडतात. १ ते ४ निवृत्तिटीका या प्रतिश्लोकी एक ओवी नसलेल्या ३० ओव्यांची प्रस्तावना असलेल्या व एकूण ओवी संख्या १५९६ असलेल्या. कवीनाम " निवृत्तिदेव " असे येते पण हुसेनांवराने सांगितलेल्या स्वरूपानुसार ही रचना दिसत नाही तेव्हा या निवृत्तिनाथांची ही रचना नसावी. तसेच यांपैकी कुठलीही रचना " निवृत्तिदेवी " या नावाने प्रसिद्ध असलेली दिसत नाही. निवृत्तिकृत गीता वा भगवद्गीता टीका असे तिचे नाव दिसते. ही गीता दुसऱ्या कुठल्यातरी " निवृत्तिदेवाची " असायला हवी. याच काळाच्या आसपास दुसरा एक निवृत्तिदेव गीताटीका लिहिताना दिसतो. त्यासंबंधी माहिती देताना य. खु. देशपांडे म्हणतात,

" यक्षदेवकृत गीताटीका ही गीताटीका शके १२२४ मध्ये लिहिल्याचा उल्लेख सापडतो. ही टीका मुरारीमल ऊर्फ यक्षदेव ऊर्फ निवृत्तदेव यांनी आपल्या गुरूच्या आज्ञेवरून मराठीत लिहिली. "[१०] श्री. देशपांडे यांनी महानुभावीय कवी आणि ग्रंथकार यांच्या शिष्यपरंपरेचा जो वंशवृक्ष दिला आहे त्यात निवृत्तियक्षदेव (गीताटीका) श. १२६१ असे लिहिले आहे. प्रत्यक्ष हस्तलिखिताची माहिती मिळावी म्हणून मी श्री. देशपांडे यांना पत्र पाठविले. पण ती पोथी त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी कळविले. यामुळे याबाबत अधिक सांगणे शक्य नाही. श्री. देशपांडे यांनी आपल्याला असलेली माहिती तातडीने दिल्याबद्दल मी आभारी आहे. थोडक्यात १ ते ४ क्रमांकांच्या हस्तलिखितांचा कर्ता हा ज्ञानेश्वर बंधू निवृत्तिनाथ नव्हे.

हस्तलिखित क्रमांक ५ ही मुद्धा निवृत्तिनाथांची रचना दिसत नाही. तिची ओवी संख्या ११३९ आहे पण ती पोथी अपूर्ण असल्यामुळे विचार करणे जरा अवघड आहे.

पोथी क्रमांक ६ ते १० या सर्वांचे स्वरूप सारखे आहे. प्रकाशित झालेली (क्रमांक ११) " निवृत्तिदेवी ", " सोपानदेवी " व " मुक्तेश्वरी " यांचेही स्वरूप पोथी क्रमांक ६ ते १० प्रमाणेच आहे. यावरून या सर्व रचनांचा कर्ता एकच असावा याबद्दल शंका नाही.

या कर्त्याचे नाव " निवृत्तिनाथ " होय. हाच ज्ञानेश्वर बंधू निवृत्तिनाथ व त्याचा सारग्रंथ जो " निवृत्तिदेवी " तो हाच, सोपानदेवांनी जे ' ज्ञान ' संपादले ते " निवृत्तिदेवीचे " आणि मग त्यांच्याकडून पुढील पिढीला तो ग्रंथ मिळाला म्हणून " सोपानदेवी " झाला. कालांतराने मुक्तेश्वरांनी तो जोपासला म्हणून " मुक्तेश्वरी " झाला असे एकूण चित्र दिसते. निवृत्तिनाथांची " निवृत्तिदेवी " हीच असली पाहिजे असे म्हणायला आणखी एक सबळ कारण म्हणजे सोपानदेव, मुक्तेश्वर या व्यक्ती निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर यांच्या परंपरेतील, त्या मार्गातीलच आहेत. त्या व्यक्ती अन्य " निवृत्ति " च्या रचना जोपासतील व ती परंपरा पुढे चालवतील असे वाटत नाही.

या ग्रंथाची भाषा यादवकालीन नाही हे उघड आहे. ती तशी नाही याला कारण ती वारंवार प्रत्येक पिढीने भाषिकदृष्टया बदल करून लिहिली असावी. अभंगाच्या बाबतीत जो अनुभव आपणाला येतो तोच नमुना या बाबतीत दिसतो. पण भाषा फार अर्वाचीन आहे असे मात्र नव्हे.

तेव्हा ज्ञानेश्वर बंधू " निवृत्तिनाथ " यांची " निवृत्तिदेवी " नामक रचना आहे. ती गीतेच्या प्रतिश्लोकी एक ओवी या स्वरूपाची असून सोपानदेवी, मुक्तेश्वरी ही " निवृत्तिदेवी " ची बदलत्या काळात झालेली रूपे आहेत. आजही उपलब्ध असलेल्या हस्तलिखितांच्या आधारे " निवृत्तिदेवी " चे संपादन करणे शक्य आहे. ✦ ✦ ✦

१०) महानुभावीय मराठी वाङ्मय-य. खु. देशपांडे; व्हीनस प्रकाशन, पुणे- आ. पृ. ७२

तेराव्या शतकातील नेवासे आणि त्याचा परिसर

सांस्कृतिक भूगोलाचे महत्त्व

मध्ययुगीन मराठी साहित्याच्या अभ्यासात मराठवाड्यातील पैठण-नेवासे या परिसराला अत्यंत महत्त्व असलेले दिसते. किंबहुना मराठी साहित्य निर्मितीची ती समर्थ केंद्रे होती. नेवाश्याला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी आपली गीताटीका ' ज्ञानेश्वरी ' रचली असे आपण परंपरेने मानतो आहोत. याच परिसरात आपल्या पंथाचा प्रसार करणारे महानुभाव वावरले; त्यांनी आपली महत्त्वाची ग्रंथरचना याच भागात केली. वाङ्मयेतिहासात या कालातील साहित्य-निर्मितीचा इतिहास व विकास आपण या ना त्या स्वरूपात पाहिला आहे; पण भूगोलाकडे आपले जावे तसे लक्ष गेलेले नाही. या परिसराच्या भूगोलाचा काहीसा शोध घेतल्यास आजचे नेवासे व त्याचा परिसर आणि तेराव्या शतकातील नेवासे व त्याचा परिसर लक्षात येणे शक्य होईल. कालांतराने सांस्कृतिक वा औद्योगिक केंद्रात बदल का व कसे घडतात, याचा विचार होण्याच्या दृष्टीनेही असा अभ्यास उपयोगी ठरेल. ज्ञानेश्वरांच्या सातव्या जन्मशताब्दीनिमित्ताने हे कार्य घडत आहे, हाही एक सुयोगच होय.

कोरीव लेखांतील उल्लेख

मध्ययुगीन शिलालेख व त्या कालातील साहित्यात येणारे नेवासे व त्याच्या परिसरातील स्थळे यांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केलेला आहे.

तसे पाहू गेल्यास नेवासे व त्याचा परिसर यासंबंधीची ऐतिहासिक व औद्योगिक माहिती इ. स. पूर्वकालापासूनची उपलब्ध असल्याचे दिसून येईल. डॉ. सांकलिया यांनी नेवासे येथे इ. स. १९५४ ते १९५६ या काळात जे उत्खनन व संशोधन केले, त्या आधारे नेवासे गाव इ. स. पूर्व १०० काळात नांदते असल्याचे ते सांगतात. प्रारंभीच्या काळातील तिथली वस्ती अन्न गोळा करून आपला निर्वाह चालविणाऱ्या मानवाची होती तर, इ. स. पूर्व शंभर ते इ. स. नंतर शंभर वर्षे (सुमारे) हे गाव शहरवजा होते, असे पुराव्यांच्या आधारे त्यांनी सिद्ध केले आहे. इ. स. २०० नंतर हे गाव काही कारणाने ओसाड झालेले दिसते, तेव्हापासून इ, स. च्या दहाव्या शतकापर्यंत या गावाचा विशेष उल्लेख सापडत नाही, पण इ. स. ११०० च्या सुमारास हे एक धार्मिक केंद्र

म्हणूनच ओळखले जाऊ लागल्याचा उल्लेख आढळतो.[१] त्यानंतरच्या काळात मुसलमानांच्या व मराठ्यांच्या राजवटीत या गावाचा उल्लेख येत असून, तेव्हापासून आजच्या नेवाश्याचे अस्तित्व असलेले दिसते.

नेवाश्यासंबंधी उल्लेख सापडणाऱ्या शिलालेखांपैकी नेवरगाव येथील यादव रामचंद्र देव यांचा शके १२०० (इ. स. १२७८) मधील पहिला उपलब्ध शिलालेख होय. त्या शिलालेखात पुढील स्थलनामे येतात–

(१) सेऊणदेश, (२) निधिवास खंपणक, (३) बिल्वग्राम, (४) पिप्पलग्राम, (५) सुरिएगाव, (६) निद्वासे, (७) ईडलगाऊ, (८) मुनादेव, (९) पाचेगाव, (१०) टाकळी, (११) डोमेग्राम. (१२) घोगरग्राम.

या स्थळनामातील सेऊणदेश म्हणजे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुका होय. नगर जिल्ह्याचा उत्तरभाग आणि औरंगाबादचा पश्चिम भाग म्हणजे नूपुरग्राम. त्या नूपुरग्रामचा हा शिलालेख आहे. त्या गावाचे सध्याचे नाव नेवरगाव ऊर्फ नेऊरगाव. सध्या औरंगाबाद जिल्ह्यात असलेले नेऊरगाव त्या काळात निधिवास खंपणकात होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शके ११९३ मधील यादव रामचंद्राच्या पैठण येथील ताम्रपटात या गावाचा उल्लेख नेऊरगाव असा आहे.[२]

वरील कोरीव लेखामधील ' निधिवास खंपणक ' म्हणजे आजचे नेवासे होय. प्रवरेच्या दोन्ही तीरावर हे गाव वसलेले असून, ह्या गावाचे, नेवासे खुर्द व नेवासे बुद्रुक असे दोन भाग आहेत. अग्रहाराच्या सीमा सांगताना ' निद्वासे ' असा उल्लेख आहे, तो नेवासे या नावास अधिक जवळचा आहे.

यानंतरचा दुसरा शिलालेख नेवासे येथील कणैरेश्वराचा शिलालेख. याचा काल शके ११६१ (इ. स. १२३९–४०) असा असून, हा प्रथम मोहिनी–राजाच्या देवळाजवळील उत्तरेस असलेल्या काण्णव देशपांडे यांच्या वाड्यात होता. आता तो शिलालेख तिथे नाही. यात कणैरेश्वराचा उल्लेख व वृत्तिकार ' जीवण ' याचा नामोल्लेख सापडतो.

वाङ्मयातील उल्लेख

प्रस्तुतच्या शिलालेखाशिवाय नेवासे व त्याच्या परिसरातील स्थळनामांचा उल्लेख महानुभावांच्या लीळाचरित्र, स्थानपोथी, पूजावसर, स्मृतिस्थळ आदी ग्रंथांत व ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत मिळतो. यातील काही प्रमुख स्थळांची उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज काही स्थळांची नामांतरे झालेली आहेत, याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

१. Dr. H. D. Sankalia From history to pre–history of Newasa (1965–56), Deccan Collage. Poona Uni 1960.

२. मो. गं. दाक्षित, महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख– भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथ; पृ. ८९–१०२.

नेवाशाच्या नामकथा

नेवासे गाव प्रवरा नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेले आहे. उत्तरेकडील भागाला नवासे बद्रुक व दक्षिणेकडील भागाला नेवासे खुर्द म्हणतात. आता नेवासे खुर्द हाच भाग विकास पावलेला आहे. ते तालुक्याचे मुख्य ठिकाण असून, आज तिथे महाविद्यालयही आहे. नगरपासून ३२ ते ३५ मैलांवर हे गाव आहे. आजच्या 'नेवासे' या गावाची 'निधिवास', 'निद्वास', 'निवास' अशी नावे असलेली आढळतात. ही नावे कशी पडली, ते सांगणाऱ्या कथाही उपलब्ध आहेत. त्यांतील काही कथा अशा–

(१) तारकासुर दैत्याने कुबेरावर हल्ला केला, तेव्हा कुबेर घाबरून गेला. तेव्हा विष्णूने त्याला जागा दिली. तिथे कुबेर आपली संपत्ती घेऊन गेला. त्याने तिथे आपला निधी ठेवला, म्हणून त्या गावाला 'निधिवास' असे नाव पडले; अशी माहिती 'महालयामाहात्म्य' सांगताना दिसते.

(२) 'महालयामाहात्म्या'च्या दुसऱ्या एका संहितेप्रमाणे तारकासुराने एकट्या कुबेरालाच नव्हे, तर सर्व देवांना स्वर्गातून हाकलले. तेव्हा ते देव ब्रह्मदेव व विष्णू यांच्याकडे निवाऱ्यासाठी गेले. त्यांना विष्णूने निवाऱ्यासाठी जे स्थान दिले, ते स्थान म्हणजे 'निवास' म्हणजे नेवासे होय. तिथे नेवासे असा स्पष्ट उल्लेख नसला, तरी जो स्थलनिर्देश केला आहे तो असा : विंध्यपर्वताच्या दक्षिणेला गोदावरीच्या दक्षिण तीरावर प्रवरेच्या काठी एक पवित्र क्षेत्र असून, नदीच्या पूर्वेला 'वैष्णवीशक्ती' मोहिनीराजा आहे. कुबेर व इतर देवांनी आपापली मौल्यवान संपत्ती आणली व तिथे देव राहिले म्हणून त्या भागाला 'निधिवास' असे नाव पडले. सर्व देव एकत्र राहिले म्हणून 'महालय' असे संबोधले जाऊ लागले.[3] (महालयामाहात्म्यातील ही कथा स्कंद पुराणात दिलेली आढळत नाही. स्कंद पुराण–श्री व्यंकटेश्वर प्रेस, मुंबई १९१८)

डॉ. सांकलिया यांनी नेवासे या नावासंबंधी एक स्पष्टीकरण दिलेले आहे, ते येणेप्रमाणे : 'आजही नेवासे इथे असलेल्या टेकड्यांत सोन्यासारख्या मौल्यवान वस्तू सापडतात. त्यामुळे या स्थळाला 'मौल्यवान वस्तूंचा साठा असलेले स्थळ' (The abode or repository of wealth–Nidhiwas) असे म्हणत असावेत :

दुसरे असे की, इथल्या टेकड्यांना 'वसती' असे इथले स्थानिक लोक म्हणतात. बदलत्या भौगोलिक कारणांमुळे इथली वसती बदलत गेली त्यामुळे ती जागा 'वसती'ची राहिली. वसतीचे सांस्कृतीकरण 'निवास' झाले.[3]

नेवासे येथील लाड-मोड टेकडीचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात, लाड म्हणजे सोन्याचा धंदा करणारे लोक. त्यांची वसतीची जागा म्हणजे लाडमोड.'

---

३. उपरिनिर्दिष्ट–सांकलिया, पृ. ६–७

महानुभाव वाङ्मयातील नेवासे

महानुभावांच्या साहित्यात या परिसराचे भरपूर उल्लेख आहेत. त्याआधारे या परिसराचा तत्कालीन भूगोल अभ्यासणे शक्य आहे. कुणीतरी त्या दृष्टीने अभ्यासास प्रवृत्त होणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखात त्या दिशेने कसे जाता येईल, ते दाखविण्याचा प्रयत्न आहे.

माहिमभट्टकृत लीळाचरित्रात (उत्तरार्ध, भाग २) लीळा क्र. २४४ मध्ये नेवाश्याचा उल्लेख येतो. त्यात चक्रधर स्वामी डोमेग्रामाहून नेवाश्याला गेले, असे सांगितले आहे. 'नीवासेया जावे : पाठक नीवासाचेया वाटा गेले : गोसावी कानडी भालगावचीया वाटा बीजे केले' महानुभाव वाङ्मयात प्रसिद्ध असलेला 'काकसूक्त दृष्टांत[4] या मार्गातच चक्रधरांनी इंद्रोबाला सांगितला व तिथून ते टोके-गव्हाण, पेहरा-संगम (प्रवरासंगम) कडे गेले.

नेवासे येथील स्थळासंबंधी माहिती स्थानपोथीत पुढीलप्रमाणे आहे. ज्या ठिकाणी नामनिर्देश स्पष्ट आहे तेवढाच उतारा देत आहे. इतर गोष्टींचा उल्लेख देण्याचे कारण नाही. 'डोमेग्रामूनि बीजेकरिता चाचरमुदी आसन : पव्हेआसन : मग गोसावी तेथोनि बीजे केले : कनरेश्वरी आसन : गांवापाशी मेळा : कुसुमेश्वरा बीजे केले : तेथ आसन : तोचि वाटू गावा परसीमे अग्निष्टिका : नदीचीए थडीए उत्तरे : दुरादित्यी अवस्थान : मास चार : पुरादित्यपूर्वाभिमुख....दक्षिणे बडुवे यांचे घर : पूर्वे हाटवटी....म्हाळसेचे देऊळ पसीमामुख....दुर्गाआंतु गोपाळाचे देऊळ : पसीमामुख : गोपाळीहुन साधे म्हाळसी पाहु पाठविणे :' अशी माहिती 'तेराव्या शतकातील नेवासे' (भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, वर्ष १९, अंक २) या लेखात श्री. ह. ना. नेने देतात. त्याच लेखात ते पुढे म्हाळसेचा महानुभाव वाङ्मयातील महत्त्वाचा उल्लेख सांगताना लिहितात–

'एकू दी उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरे : गोसावी म्हाळसीचेया देऊळा बीजे केले : मग गोपाळाचेया देऊळी रीगतां : उत्तरिलीकडे आसन : गोसावियाचेया दर्शना साधे आळी असोनिः तीये गोसाविया जवळि बैसलि असेति : सर्वज्ञे भणीतले ; साधे होः तुम्ही म्हाळसी देखिलीः नाही जीः तरिः पाहा जाः हो का जीः गेली तंव तीएचे अलंकार फेडिले असतिः न्हाण करावेयाः ऐसी देखिलीः आणि आलीः गोसावी पूसिलेः साधे होः म्हाळसा देखिलीः जी जीः देखिलीः कैसी आहेः काळीः मीटकीः काः भणौनि मागुति गेलीः तवं शृंगारू केला असेः ऐसी देखिलीः मग आलीः मागुते गोसावी पूसिलेः साधे होः म्हाळसी देखिली : जी जी : देखिली : कसी असे : पाटाऊ साऊळा : नेसली असे : पाटाऊ चोळी : कांकण : कळाविया : सोनयाची तानवडे : भंवरिया भांगुः टीळा : नाकी मोती : जी जी ऐसी देखिली जी : सर्वज्ञे म्हणीतले :

---

४. उपरिनिर्दिष्ट–पृ० ६

आता होए : ('मोहिनीराज दर्शन' न. मु. बडवे, पृ. २९-३०). विशेष म्हणजे चक्रधर मोहिनीराजाचे वर्णन करीत नाही; म्हाळसेचे वर्णन आपणाला साधेचे तोंडून ऐकण्याला मिळते. सध्याच्या मोहिनीराजाच्या मूर्तीचे वर्णन " मोहिनीराजाची– अर्धनारीनटेश्वर, शंख, चक्र, गदा, अमृतकुपीधारी उभी मूर्ती ४।। फूट उंचीची आहे. तिचे पायाखाली राहू आहे. शेजारी लक्ष्मीची सिंहावर बसलेली बैठी मूर्ती आहे,।" असे 'मोहिनीराजदर्शन'-कार करतात. याचा अर्थ ही मूर्ती साधेच्या वर्णनातील म्हाळसेहून निराळी आहे.

आजचे नेवासे

आजचे मोहिनीराजाचे मंदिर सरदार चंद्रचूडांनी दृष्टान्तानुसार बांधलेले असून, त्या देवळाचे बांधकाम सुमारे इ. स. १७७३ या काळातील आहे. थोडक्यात मोहिनीराज म्हाळसेइतका जुना असलेला दिसत नाही. या संदर्भात 'मोहिनीराजदर्शन'कारांची पुढील माहिती उपयोगी पडण्यासारखी आहे.

' लाडमोड, माळीमोहेतर्फे व नेवासे या तिन्ही गावांना वळसा घालून पूर्वी प्रवरा नदी वाहात होती. परंतु नदीचे प्रवाहाचे जोराने खडक फुटून तिचा मूळचा ओघ बदलून ती देवालयाजवळून वाहू लागली व त्यामुळे नेवासे गाव दुभंगला गेला व त्याचे नेवासे खुर्द व नेवासे बुद्रुक असे दोन भाग झाले. त्यांपैकी खुर्द भागात जुने व नवे देवालय आहे म्हणून त्यास मोहिनीराजाचे नेवासे म्हणतात. बुद्रुक या भागात खंडोबाचे स्थान आहे, म्हणून त्यास ' खंडोबाचे नेवासे ' म्हणतात. (पृ. २३)

म्हाळसा आणि मोहिनीराज

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा विचार करता खंडोबा आणि म्हाळसा यांची मंदिरे जवळ जवळ असणे सहज शक्य आहे. नेवाश्याला आजही नदीच्या काठी पडक्या अवस्थेत मंदिर आहे ते साधेने वर्णन केलेल्या म्हाळसेचे, मोहिनीराजाचे नव्हे; हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तेराव्या शतकानंतरच्या काळात केव्हा तरी म्हाळसा ' मोहिनीराजा 'त काही कारणाने रूपांतरित झाली असली पाहिजे. त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. साधेच्या वर्णनात मोहिनीराजाच्या आजच्या मूर्तीशी संबंधित असा काहीच उल्लेख येत नाही. याचा अर्थ मोहिनीराजाची मूर्ती तेराव्या शतकानंतरची असली पाहिजे किंवा काही संस्कारांनी (वज्रलेप वगैरे) ती मूर्ती बदललेली असली पाहिजे.

केशीराज व्यासाच्या ' रत्नमाला स्तोत्रा 'त चक्रधरांच्या, राजा टाकळी आणि घोगरगावाहून नेवाश्याच्या यात्रेच्या प्रवासाची माहिती आहे. चक्रधरांनी आपली एक दिवाळी नेवासे येथे शके ११९५ मध्ये (म्हणजे १२ ऑक्टोबर १२७३ या काळात) साजरी केलेली दिसते.

महानुभाव वाङ्मयातील या उल्लेखानंतर महत्त्वाचा उल्लेख म्हणजे ज्ञानेश्वरीच्या अखेरीस येणारा–

ऐसें युगीं परी कळी । आणि महाराष्ट्रमंडळी ।
श्रीगोदावरीजवळी । निवासस्थान ।। ज्ञा. १८.१७८१

ज्ञानेश्वरीची सरकारी प्रत, दांडेकर संपादित प्रत, इ. प्रतींत ' निवासस्थान ' हा शब्द या ओवीत नाही; त्याऐवजी दक्षिणिली असा शब्द आहे.

सदरचा ' निवासस्थान ' शब्द महालयामाहात्म्याच्या संदर्भात नंतर कुणीतरी समाविष्ट केलेला असावा, अशी शंका येण्यास जागा आहे.

एकनाथी भागवतात ' नेवासा ' यासंबंधी उल्लेख येतो. इथेही ' मोहिनीराज ' ऐवजी एकनाथ ' म्हाळसा ' असा उल्लेख करतात, याची नोंद घेणे महत्त्वाचे ठरावे.

समुद्रमंथनाचे शेवटीं । क्षीरसागराचे तटीं ।
सुरां असुरा कळी मोठी । अमृतासाठी मांडली ।। २३२ ।।
तेव्हा अमृत विटे जें देखोनी । तो अवतारु घेतला मोहिनी ।
तेणें असुरां सुरापानीं । अमृतदानी देवांसी ।। २३३ ।।
तेथें चोरूनि घेतां अमृतग्रासा । निवाटीला राहूचा घसा ।
त्याच्या कबंधावरी म्हाळसा । वास नेवासा स्वयें केला ।। २३४ ।।

एकनाथांच्या काळात ' म्हाळसे 'चे रूपांतर मोहिनीराजात होऊ लागलेले दिसते. म्हाळसेला नवीन संदर्भ देण्यात येत असलेला दिसतो.[५]

पुढे पुरोहितवर्गाने स्वतःच्या चरितार्थासाठी या स्थानाचें माहात्म्य गायिलेले दिसते. उदा. गोपाळ कवीने गायिलेल्या महालयमाहात्म्यात अध्याय १८ मध्ये पुढील ओव्या लिहिल्या आहेत.

प्रवरेचि या दक्षिणतीरी । उभी लावण्यसिन्धुलहरी ।
जे प्रेमे भक्तकाजकैवारी । जगदेश्वरी मूळमाया । ।। ६२ ।।
यापरी सत्क्षेत्र निधिवास । पितरांलागी प्रिय विशेष ।
पिंडदानें कृते संतोष । अत्यंत तो होतसे ।। ६३ ।।
निश्चयें निधिवासापासोनी । पवित्र गंगा सुरवाहिनी ।
अमृतवाहा प्रवरा नाम्नी । गोदावरी जे ।। ६७ ।।


महानुभावांनी केलेल्या नेवाश्याच्या वास्तव भौगोलिक वर्णनाहून हे अतिरंजित व धर्मभोळ्यांसाठी लिहिलेले माहात्म्य वास्तवापासून दूर असले, तर काहीच नवल नाही. आपल्याकडील क्षेत्र-माहात्म्यांची सर्वत्र अशीच अवस्था आहे. असो.

नेवासे परिसरातील स्थाने

नेऊरगाव - नेवाश्याच्या उत्तरेस गोदावरीच्या काठावर वसलेले हे गाव असून उपर्युक्त शिलालेख खोदला गेला, तेव्हा ते नेवासे खंपणकात होते.

---

५. एकनाथी भागवत, सरकारी प्रत, अध्याय ४, ओव्या २३२-२३४.



तेराव्या शतकातील नेवासें

चक्रधरांचा मुक्काम नेऊरगावात होता. त्यासंबंधी थोडक्यात माहिती अशी :
'चक्रधर नेऊरगावी आले; त्यावेळी त्यांनी इंद्रभटांना भेटायला बोलावले. इंद्रभटांना
गळू झालेले होते. तशा अवस्थेत ते चक्रधरांना भेटायला आले. चक्रधरांनी नेऊरगावास
राहावे, अशी त्यांनी विनवणी केली. 'गोसावी विनवणी न स्वीकारीती चिः' ते डोमे-
ग्रामला गेले (लीळाचरित्र, उत्त. भा. २, लीळा क्र. २३८).

दुसरी एक लीळा : गदोनायक हे यादवराजाचे भांडारी होते. त्यांच्यावर आरोप
येऊन त्यांना अटक झाली होती. चक्रधरांच्या कृपेने ते वाचले होते. या काळात
चक्रधर डोमेग्रामात होते. त्यांना गदोनायकांनी नेऊरगावला येऊन भेटावे, असा निरोप
पाठविला. त्यानुसार एक महिना नेऊरगावात 'पश्चिमाभिमुख देव्हार चौकीत' चक्रधर
राहिले होते.

सुरेगाव – वरील शिलालेखातील 'सुरिएगांव' म्हणजे नेऊरगावच्या ऐल बाजूला
वसलेले आजचे 'सुरेगाव.' लीळा चरित्रात सुरेगावचा उल्लेख पुढीलप्रमाणे येतो—

'गोसावी डोंबेग्रामासी बीजे केले : मग डोंबेग्रामुनि नेऊरगावा न रीगतीचि :
सुरेगावी बीजे केले : गंगे आंतु लींग तेयापासी खडक : तेया खडकावरी गोसावियासी
आसन :' (लीळाचरित्र, उत्तरार्ध भाग–२, लीळा क्र. २४३).

स्थानपोथी सुरेगावची माहिती सांगताना म्हणते–'सुरेगांवी मढी वसति : गंगेमधि
लींगापासी गोसावीयांसी आसन : गांवा सत्तरें काटी : गंगेचे तडीस तेथ आसन : मढ
पूर्वामुखः तेथ वसती : गांवा उत्तरे सूराईचे देऊळ : तेथ वसती :'

बेलपांढरी – शिलालेखातील 'बिल्वग्राम' म्हणजे आजचे बेलपांढरी. हे नेऊर-
गावापासून दक्षिणेस एक मैल आहे.

बेलपिंपळगाव – शिलालेखातील 'पिप्पलग्राम' म्हणजे आजचे बेलपिंपळगाव.
हे नेऊरगावपासून दक्षिणेस चार मैलांवर आहे.

डोमेग्राम–डोमगाव – डोंबगाव म्हणजे सध्याचे कमालपूर. महानुभाव आचार्य
या स्थळाच्या संदर्भात पूजावसरात लिहितो–

"नित्यदीनी लीळा डोंबेग्रामी बोलेती : डोंबेग्रामी तीनि मढुः एकू पूर्वाभिमुखूः
एकू उत्तराभिमुखूः एकू दक्षिणाभिमुखूः ती ए दक्षिणाभिमुखे राममठी सर्वज्ञ अवस्थानुः"

दृष्टांत पाठातील दृष्टांत क्रमांक १६, २७, ३०, ४३, ४८, ५२, ५३, ६०,
७३, ८६, ९४, ९५ हे दृष्टांत डोंबेग्रामात सांगितले गेलेले दिसतात. ('दृष्टांतपाठ
संपादक–तुळपुळे). लीळा चरित्रावरून (पूर्वार्ध भाग १, लीळा क्रमांक ११४) चक्र-
धरांचा मुक्काम सात दिवस डोंबेग्रामात होता असे दिसते. 'सात दिवस डोंबेग्रामी अव-
स्थानः' त्या वेळी दाई भागवतास ताप आला होता. तो चक्रधरांनी नाहीसा केला. याच
डोंबेग्रामात छिन्नपाणी वा छिन्नस्थली हे स्थळ होते. डोंबेग्राम येथील गोदावरीच्या
तीरावर खडक फोडून तयार केलेले हे स्थान होते (लीळाचरित्र, पूर्वार्ध भाग १, लीळा

२४६). लीळाचरित्रलेखक–माहिंभट व चक्रधर, यांची भेट डोंबेग्रामी झाली. (लीळा चरित्र, उत्त. लीळा क्र. १०६, १११, ४७१).

टाकळीभान – शिलालेखातील टाकळी म्हणजे आजचे टाकळीभान. हे नेऊर-गावापासून सहा मैलांवर आहे. केशीराजव्यासाच्या ' रत्नमाल स्तोत्रा ' त ह्या गावाचा उल्लेख राजटाकळी असा आहे. (भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, वर्ष १९ पृ. ५३)

पेहरासंगम–प्रवरासंगम–टोके–गव्हाण – डांगरेश या स्वामिभक्त कुत्र्याने चक्र-धरांचा प्रसाद घेतल्याशिवाय अन्नग्रहण केले नाही, ही घटना पेहेरासंगमावर घडली. (लीळाचरित्र, उत्त. लीळा क्रमांक २४५).

काऊळगाव – नेवाश्याच्या दक्षिणेकडील कारेगाव म्हणजेच काऊळगाव. काऊळ-गावी काळेश्वरी वस्ती : तेथौनि गोसावी काऊळगावी बीजे केले : तेथ गंगेचिए थडिएसि टेकावरी पूर्वामूख लींगाचे देऊळ : तेथ वस्ती जाली : (लीळाचरित्र, उत्त. भा. २, लीळा क्र. २३६).

गळनिंबा–गोर्लनिंबा – स्थानपोथीत या गावाचा उल्लेख सापडतो तो असा–गळनिंबा महालक्ष्मीचे वसति : महालक्ष्मीचे देऊळ पूर्वामूख : आंगणी निंब : या निंबावर ग्रह होते, ते माणसांना त्रास देत. चक्रधरांनी भूतानंदाकडून त्यांना हाकलले. (लीळा-चरित्र, उत्त. लीळा क्र. २५२, २५३).

सोनई – नेवाश्यापासून जवळच असलेले हे गाव. सोनये वनदेवी वसती : असा उल्लेख लीळाचरित्र, पूर्वार्ध भाग–१ लीळा क्र. १७१ मध्ये येतो.

तेराव्या शतकातील साहित्य निर्मितीत नेवासे हे महत्त्वाचे केंद्र मानले, तर त्याच्या परिसरातील केंद्रांनी कोणता हातभार लावला, हे यावरून लक्षात येईल. आज साखर-कारखाने व अन्य औद्योगिक केंद्रे ही स्थळे पुढे आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

चवदाव्या शतकातील ' अज्ञानसिद्ध ' व ' बहिरा पिसा ' विरचित

दोन पोवाडे*

चरित्रे राजयाची जे पवाडे म्हणिजे ते ॥[1]

भाषा प्रकाश-कर्ता रामकवि ' पोवाडा ' शब्दाचा अर्थ असा देतो. तसेच सांप्रत रूढार्थाने पोवाडा शब्द ' ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रप्रसंगांवरील पद्य-रचना ' या अर्थाने वापरला जातो. मराठी शाहिरी वाङ्मयात उपलब्ध असलेला जुन्यात जुना पवाडा म्हटला म्हणजे अग्निदासाचा होय. हा अग्निदास किंवा अज्ञानदास पुण्याचा रहाणारा होता. शिवकालातील हा शाहीर आहे. शिवकालात पोवाडयांच्या रचनेला सुरुवात झाली, अशी आपली समजूत आहे. त्या दृष्टिकोणांतून या पोवाडयासंबंधी ' सारस्वत ' कार लिहितात, " हा पवाडे रचण्याच्या अगदी प्रथम प्रथमच्या प्रकारचा नमुना आहे. नावाला मात्र हा पद्य आहे, परंतु याची सर्व रचना एकतारी तुणतुण्यावर सहज सुराने म्हणता येईल अशी गद्याचीच आहे. "[2] या रचनेला स्वतः अज्ञानदास ' कडाका ' असे म्हणतो.

या पोवाडयानंतर उपलब्ध झालेल्या पोवाडयांचे संग्रह प्रसिद्ध केले गेले आहेत. पोवाडयांचा विवेचक अभ्यास करून पोवाडयांची सर्वसामान्य वैशिष्टयेही सांगितली गेली आहेत. या वैशिष्टयांपैकी काही अशी आहेत—

(१) पोवाडा हे केवळ श्राव्य नव्हे, काव्य. ते दृश्य काव्यही आहे. पोवाडा हे एक प्रकारचे नाटक आहे.[3]

[* भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे या संस्थेच्या अठ्ठावन्नाव्या वाढदिवसानिमित्त दि. १६ जून १९६८ या दिवशी वाचलेला निबंध]

१. **रामकविकृत भाषाप्रकाश**, ५-५३ संपा. शं. गो. तुळपुळे, पुणे, १९६२, पृ. १३.

२. वि. ल. भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, आ. ५ वी, मुंबई, १९६३, पृ. ५४९.

३. वि. का. राजवाडे (संपा.) **केशवाचार्यादिकृत महिकावतींची ऊर्फ माहीमची बखर**, पुणे, शके १८४६, " प्रस्तावना " पृ. ३८.

(२) (पोवाड्यात) वीरमरणाच्या सोहळ्याचे वर्णन असते.[४]

(३) पोवाडा हे जुन्या काळी देशात बातमी पसरविण्याचे एकमेव साधन होते.[५] ऐतिहासिक साधन म्हणून पोवाडा काही कमी विश्वसनीय नसतो.[६]

(४) या वैशिष्ट्यांवरून 'पोवाडा ही ऐतिहासिक काळाशी व ऐतिहासिक व्यक्ति-जीवन-चरित्रप्रसंगाशी संबंधित असलेली रचना असते, असा आज आपला समज आहे हे स्पष्ट व्हावे.

आज आपणासमोर १४ व्या शतकातील जें दोन पोवाडे सादर केले जात आहेत ते या कसोट्यांना सर्वस्वी उतरणारे नाहीत. पोवाड्यांना वरील रूढ अर्थ प्राप्त झाला असेल, तर तो शिवकालानंतर. त्या पूर्वी ' पवाड ' किंवा पवाडा हा शब्द मोठे-पणा, सामर्थ्य, पराक्रम, स्तुतिकाव्य, चमत्कार या अर्थांनी वापरला गेलेला दिसतो. त्याचे साभार विवेचन पुढे येईलच.

प्रस्तुतचे दोन्ही पवाडे लेखकास सुप्रसिद्ध संशोधक श्री. ना. ब. जोशी यांचे-कडून मिळाले. विजापूरच्या मुक्कामांत श्री. जोशी यांनी उदार मनाने हस्तलिखित पाहण्यास दिले. त्यानंतर आपुलकीने दोन्ही पवाड्यांच्या नकला पाठविल्या व पवाडे प्रसिद्ध करण्यास आपली परवानगी दिली, त्याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. सदरचे हस्तलिखित श्री. ना. ब. जोशी यांच्या संग्रहात आहे. वहीचा आकार ९"×७" असा आहे. वहीच्या अंतर्गत पुराव्यावरून ती कमीत कमी २०० ते २५० वर्षांइतकी जुनी असावी असे दिसते. ती वही श्री. जोशी यांना संगमनेर भागात नागेशसंप्रदायी अनंत फंदी आदि कवींच्या हस्तलिखित रचनांच्या बाडांबरोबर उपलब्ध झालेली आहे, असे त्यांनी सांगितले.

दोन्ही पोवाडे पुढे मुळातून दिलेले आहेत.

त्यांचा आशय व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

(१) अज्ञान-सिद्धाचा पोवाडा

अज्ञानसिद्ध हा वडवाळसिद्ध नागेशाचा प्रमुख शिष्य. याने आपला " संकट-हरणी " ऊर्फ " संकटहरणी शिवग्रंथ " शके १३१३ साली लिहिल्याचे त्याच ग्रंथांत नमूद केलेले आहे. या अज्ञानसिद्धाने याशिवाय वरदनागेश, गुरुशिष्य-संवाद (तत्त्वबोध), जीवब्रह्माभेदलक्षण, पृच्छापत्र, अविंध भाषेतील पंचीकरण प्रमेय इ. प्रकरणे, अभंग व

४. दुर्गा भागवत, **लोकसाहित्याची रूपरेखा**, मुंबई, १९५६, पृ. ३८२-८४.

५. म. वा. धोंड, ' महाराष्ट्राची शाहिरी परंपरा. ' **लोकराज्य**, १ मे १९६५, पृ. ४१.

६. वि. ल. भावे, **उ. नि.**, पुरवणी, पृ. ९६७.

पदे लिहिली आहेत.[७] त्याने पोवाडे-रचना केल्याचे मात्र अजून कोणी सांगितलेले नाही. प्रस्तुत निबंधाद्वारे आज त्याचा एक पवाडा प्रथमच उजेडात येत आहे. अज्ञानसिद्धाचा शिष्य मन्मथशिवलिंग याने शाहिरी गाजविली असे त्याचे शिष्य सांगतात.[८] त्यावरून अज्ञानसिद्धानेही बरीच पोवाडेरचना केली असावी असा तर्क संभवतो. आज आपणाला अज्ञानसिद्धाचा हा एकच पोवाडा उपलब्ध होत आहे. त्यावरून तत्कालीन पोवाड्याची स्थूल मानाने कल्पना करता येणे शक्य आहे.

मूळ हस्तलिखितामध्ये ती रचना, " श्री पीडा लीखितं " या मथळ्याखालीं लिहिलेली आहे. या पोवाड्याचा विषय गुरुस्तुती, गुरूचे अलौकिक सामर्थ्य वर्णन करणे असा आहे. आपल्या गुरूचे कीर्तिकाव्य वा सामर्थ्य गाणे ही अज्ञानसिद्धाची भूमिका आहे. या पोवाड्यात कथानकाचा भाग आलेला दिसत नाही. रचना दीर्घ स्वरूपाची आहे. पद्यरचनेपेक्षा गद्याकडे अधिक झुकणारी आहे. ' नागनाथ ' व्यक्ती ऐतिहासिक असली तरी पोवाड्यांच्या वरील वैशिष्ट्यांत अभिप्रेत असलेली वीर योद्धा वा राज्यकर्ती नाही. तसेच पोवाड्यात येणारे वर्णन ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवनातील समर प्रसंगाचे नाही. संतांच्या साक्षात्काराच्या व गुरुकृपेच्या अभंग रचनेशी वा ओवीरचनेशी आशयदृष्ट्या ती अधिक जवळची आहे. वीरमरणाचेही वर्णन अज्ञानसिद्ध या पोवाड्यात करीत नाही. अज्ञानसिद्ध आपला उल्लेख रचनाकार म्हणून करतो. तो असा.

" ईती श्री वडवाळसीध पुत्र आज्ञानसीध वीरचीत श्री गुरुप्रताप

(५) वाड संपूर्णमस्तु ॥

इथें ' वडवाळसीध पुत्र आज्ञानसीध ' म्हणजे वडवाळसिद्ध नागेश-शिष्य अज्ञानसिद्ध हा अर्थ आहे हे उघडच आहे. तसेच गुरुप्रताप सांगणारी, कीर्ति-काव्य किंवा स्तोत्र-स्वरूपाची ही रचना असल्याचे प्रत्यक्ष अज्ञानसिद्धच कबूल करतो आहे. पोवाडा रचनेचा हेतू सांगताना अज्ञानसिद्ध ऋषीने सर्व पापक्षयार्थ ही रचना केल्याचे सूचित केलेले आहे. संतांच्या रचनेप्रमाणे आपल्या पोवाड्याच्या प्रारंभी गणेश, सरस्वती, गुरु, सज्जन व संतांना नमन केलेले आहे. पोवाड्यात वरदमूर्ती बतळेश्वर असा नागेशाचा उल्लेख येतो. त्याचा संदर्भ नागेशामृतांतील १९ व्या अध्यायांतील नागेशाच्या बतकेश्वर लिंगाच्या स्थापनेशी असावा असे दिसते. अज्ञानसिद्ध आपल्या पोवाड्यात आपला गुरु नागेश याचा निरनिराळ्या नावांनी उल्लेख करतो तो असा (१) वडवाळसिद्ध नागनाथ (२) गुरुनागनाथ (३) वडवाळसीध नागेस्वरू (४) गुरु नागनाथ देव (५) नागनाथ नीरंजन, (६) आजीउ लींग नागनाथ, (७) नागेश श्रीगुरु, (८) नागेश्वर,

---

७. यू. म. पठाण, **नागेश संप्रदाय** औरंगाबाद १९६३, पृ. १४

८. बाळपणी दांडु डफाचा धुन्धकार जिंकिले शाहीर नेणे किती
श्री शिवसंप्रदायी मन्मथगाथा भाग १ अभंग ५४
(बसवलिंगाचा अभंग)

(९) सीधनाथ, (१०) पूर्णधन नागेश, (११) नागा भुजेंग, (१२) लींग नागनाथ, (१३) सीधेश ईशनागेश, (१४) नीत्यलींग, (१५) सीधदेही नागेस्वर, (१६) सीवसीधांत.

पवाडा शब्द : पवाडा, पवाडे गाण, श्रुज्ञान खर्ग पवाड, अशा प्रकारे स्तुति गीत, सामर्थ्य या अर्थांनी आलेला दिसतो.

स्तोत्र स्वरूपांतील ही रचना बरीच पाल्हाळिक आहे. अद्वैत स्वरूप असलेल्या गुरुनागनाथाचे सामर्थ्य किंवा प्रताप गाणे हे या रचनेचे कार्य आहे. भाषिक-दृष्टया पोवाडयाची रचना १४-१५ व्या शतकांतील असल्याचे दिसते. अधिक अभ्यासासाठी प्रत्यक्ष पोवाडा वाचणे योग्य ठरेल.

आता दुसरा पवाडा बहिरा पिसा याचा आहे. हा बहिरा पिसा अज्ञानसिद्धाचा गुरुबंधु होय. त्या पोवाडयाचे स्थूल स्वरूप असे सांगता येईल.

मूळ हस्तलिखितात सदरची रचना " श्री बहीरव पीसा पवाडा " या मथळया-खाली लिहिलेली आहे. प्रस्तुत पवाडयात स्वतः बहिरा पिसा, आपला गुरु नागनाथ असल्याचे अनेकदा सांगतो. या पोवाडयाचे आशयदृष्टया स्वरूप स्तोत्रकाव्य, कीर्तिकाव्य अशा प्रकारचे आहे. योग सामर्थ्याने गुरूने साक्षात्कार घडवून आपला उद्धार कसा केला ते बहिरा पिसाने वर्णन केलेले आहे. नागेशलीलामृताच्या पंचवीसाव्या अध्यायात नागनाथाने बहिरा पिसाचा उद्धार केल्याचा एक प्रसंग येतो. त्या संदर्भ " पुनी उठवील प्रेतासी " असा पोवाडयात येताना दिसतो. तसेच पोवाडयाच्या समाप्तीत

॥ पीसा बहिरा मुक्त केला, गुरुभला वडवाळसीध नागेशु ॥
॥ ईतीश्री पवाडा, पीसा बहीरो वीरचीते, पवाडा संपूर्णमस्तु ॥

गुरु वडवाळसिद्ध नागेशाने आपणास मुक्त केले असे तो सांगताना दिसतो. याचाच पुनरुच्चार महीपतीने आपल्या संतचरित्रात्मक ग्रंथात केलेला दिसतो.

नागनाथासि कृपा होताचि जाण
बहिऱ्या पिशास झाले ज्ञान ॥ ९४ ॥

दशमस्कंधावरील भैरवी टीका लिहिणाऱ्या बहिरा जातवेदाच्या गुरूचे नाव ' चिंतामणी ' होते. त्यावरून ज्याने नागनाथाचे शिष्यत्व पत्करले तो बहिरा पिसा किंवा बहिरंभट नावाचा कुणी अन्य संत तर नसावा ना, अशी शंका डॉ. यू. म. पठाण घेतात[९] ती अधिक बरोबर वाटते. बहिरा पिसाच्या सदर पोवाडयात ' चिंतामणी ' चे नाव कुठेही येत नाही. तसेच आपला स्वतःचा बहिरा जातवेद असा उल्लेखहि करताना तो दिसत नाही. अर्थात् एका पोवाडयावरून विशिष्ट निर्णय घेणे चुकीचे ठरेल. तेव्हा भक्कम पुराव्याच्या अभावी भैरवी टीकेच्या लेखनानंतर बहिरा जातवेद ह्याने नागनाथाचे

९. यू. म. पठाण उ. नि., पृ. २२.

शिष्यत्व पत्करले असावे, असेहि काही विद्वानांचे मत आहे.[१७] त्या मताची स्मरण-पूर्वक नोंद घेणे आवश्यक ठरावे.

चवदाव्या शतकातील या दोन पोवाड्यांचे स्वरूप पाहिल्यावर शिवकालापर्यंत 'पवाडा' शब्द कोणत्या अर्थाने वापरला जात होता हे पाहणे उचित ठरेल.

स्तुतिकाव्य, पराक्रम, स्तोत्र, लीला, ख्याति या अर्थांनी तो पुढील संदर्भात वापरलेला दिसतो.

(१) तुवा संग्रामी हरु जीतला, निवात कवचांचा ठावो
फोडिला पवाडा तुवा केला, गंधर्वांसी ॥ – ज्ञाने. २.१०

(२) आणिके काव्ये नाटके कथा आख्याने प्रबंध चित्र गाथा परि
परी न पवेति सर्वथा : देवाचे या पवाडेयासी – १७

(३) लोकपाळां जयाचा पवाडा : तो दंतवक्रू कैसा साधो बळियाडा
कोपे काळाचा सवंगडा : भोगे इंद्रकारका देसी – २२८
प्रभू अनंतरौनि कोडे जे जे केले पवाडे
ते बोलता परब्रह्म जोडे : म्हणौनि भक्त वानिती – ३१६

(नरेंद्र : रुक्मिणी स्वयंवर)

(४) पठतां श्रीकृष्ण पवाडे : ठिकसा बोलां घोसू पडे
रसरंगाचे पाहाळ उघडे : श्रोतेयांसी – २०
बाउलायाचीया सांगडे : घरी कीजति पवाडे
ते मज चैद्यापुढे : बोलो न एति – ८६६

(भास्कर : शिशुपालवध)

(५) उपमा-श्लेख वर्णक : एहि रंजौ सकलै लोक
किं पवाडे संसारमोचक : वानूं मुकुंदाचे – १४

(दामोदर-वछाहरण)

(६) पढतां श्री प्रभूचे पवाडे : पशु फळानंदु जाडे
भोजे नाचवीन कोडे : व्रीक्ष लतावळी – ३०

(केसोबास : मूर्तिप्रकाश)

वरील 'पवाडा' शब्द ऐतिहासिक वीरपुरुषांच्या जीवन-प्रसंगातील पराक्रम, सामर्थ्य, लीला या संदर्भात वापरला गेलेला नाही. त्याचा संदर्भ पौराणिक व्यक्ति वा देवता-स्तुति यांच्याशी असलेला दिसतो. महिकावतीच्या बखरीत

---

१०. **तत्रैव**, पृ. २२.

मंत्रविद्या संपूर्ण ॥ युद्धी महादारुण
पवाडे वंदिजन ॥ म्हणती ज्याचे[११] ॥ २७ ॥

यात जो 'पवाडे' शब्द येतो तो पराक्रम या अर्थाने. पण ज्या राजाचे हे वर्णन आहे तो पौराणिक राजा आहे. अदितीपासून सूर्यापर्यंत चौविसावा राजा जो 'श्रावण,' त्याच्या पराक्रमाची गाणी, स्तुतिकाव्ये म्हणजे पोवाडे असा तिथे अर्थ आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी पोवाड्यांची चर्चा ज्या केशवदेवाच्या संदर्भात केली आहे, तो मूळ संदर्भ असा आहे.

" तेधवा धारेसि भोज या जवळ गेला ॥
राजा केशवदेवाची पदे वाखाणिली ॥
पितामोहो यैसि गद्यपद्य म्हणता जाला[१२] ॥ "

या ऐतिहासिक राजांच्या पराक्रमगीतास पदे, किंवा गद्यपद्य असे म्हटलेले दिसते, 'पवाडा' शब्द वापरलेला नाही. लौकिक राजांच्या पराक्रमगीताला या काळात 'पवाडा' शब्द वापरत नसावेत असे दिसते. म्हणजेच आजच्या अर्थाने त्या काळात 'पवाडा' शब्द वापरलेला दिसत नाही.

एकनाथहि 'पवाड' शब्द देव किंवा पौराणिक व्यक्तीचे सामर्थ्य, पराक्रम' लीला याच अर्थाने वापरताना दिसतात.

त्याचिया परमचरित्रा; तुज सांगेन परमपवित्रा
परी निज बोधाचा खरा, या अवतारी पुरा पवाडा केला[१३]

वरील पवाडा शब्द संस्कृतमधील प्रवाद किंवा प्र+वद या शब्दापासून आलेला आहे असे दिसते.

दुसरा पवाड शब्द संस्कृतमधील प्रवृद्ध या शब्दापासून आलेला दिसतो. त्याचा मराठीतील अर्थ, विस्तार, व्यापकत्व असा आहे. बऱ्याच वेळा या दोन्ही शब्दांची गल्लत केली जाते.

विस्तार किंवा व्यापकत्व या अर्थांनी पुढील ठिकाणी हा शब्द वापरलेला दिसतो.

हे मारिले ते वर थोडे । आणीकही साधीन गाढे ॥
मग नांदेन पवाडे । येकलाचि मी ॥ ज्ञाने. १६.३५२
की हा ईश्वराचा पवाड – दासबोध १.७

तेव्हा मराठीतील पवाड, पवाडू, पवाडा शब्द दोन भिन्न संस्कृत शब्दांपासून मराठीत आलेला दिसतो. उच्चारदृष्ट्या सारखा असला तरी अर्थदृष्ट्या तो भिन्न आहे याची नोंद घेणे आवश्यक आहे.

११. वि. का. राजवाडे, **उ. नि.** पृ. ९
१२. वि. का. राजवाडे, **ट. नि.** पृ. ३९.
१३. **एकनाथी भागवत.** अ. १, ओ. १९६.

प्राचीन मराठी वाङ्‌मयात 'पवाड' किंवा 'पवाडा' या शब्दाचा उपयोग प्राधान्याने अद्‌भुत कृत्य, लीला, चमत्कार, विक्रम, ख्याती या अर्थांनी केलेला आढळतो हे आपण पाहिले. एकनाथाच्या काळापर्यंत तो त्याच अर्थाने वापरलेला आढळतो. शिवकालापासून तो ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवन-प्रसंगाच्या वर्णनास वापरण्यात येऊ लागलेला दिसतो. अज्ञानदासानेही पोवाडा शब्द वापरलेला नाही. तो म्हणतो, "अग्नी-दास कवीश्वरा त्याने कडाका गाईला." तेव्हा आजच्या अर्थाने त्याला तरी पोवाडा अभिप्रेत होता का ?

पवाडा शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधी विचार करताना श्री. शं. बा. जोशी यांचे पुढील मत ढेरे यांच्या पुस्तकात उद्‌धृत केले आहे, ते असे :—

"पोवाडा या शब्दाचा अर्थ करण्यास 'पवाड'चा कानडीतील प्राचीन प्रयोग सहाय्यक होणार आहे. 'पवाड'ला चमत्कार, दिव्य, अतिमानुषी कृति असे अर्थ संभवतात. यावरून कोण्या व्यक्तीचा महिमा गाण्याला पवाडे–पोवाडे हा अर्थ [शब्द ?] रूढ झालेला आहे. ही परंपरा माहीत नसल्याने मराठीत या शब्दाचे औचित्य कळे-नासे झाले आहे." [१४]

कानडीतून आपण पवाडा शब्द घेतला असे त्यांचे मत असलेले दिसते. पण अधिक शोधांती ते मत योग्य असल्याचे दिसत नाही. कसे ते पहा.

पाडु (जुने कानडी) गीत गाणे (To sing)
हाडु (आधुनिक कानडी) गीत गाणे (To song)
पाडु (तामीळ) गीत गाणे (To sing)
पाटु (तामीळ) गीत (song)
पाडु (तुळू) गीत गाणे (To sing)

पाड्दन (तुळू) (Paddana) Folk songs related to devils, heroic persons, divine personalities etc. या द्राविडीयन।शब्दापासून 'पवाडा' शब्द सिद्ध होणे शक्य नाही कारण शब्दाच्या मध्येच दुसरा वर्ण शिरणे संभवत नाही. म्हणजेच Lexical borrowing मध्ये infixation ची प्रक्रिया संभवत नाही. त्यामुळे 'पा' आणि 'डु'च्या मध्ये 'व' येणे शक्य दिसत नाही. 'पवाड' असा शब्द सिद्ध होत नाही. पवाड या शब्दाचा कानडीमध्ये आणखी एक अर्थ दिलेला आढळतो. तो असा 'कर्नाटकांत वीर आपल्या उपास्यदेवतेच्या उत्सवात जी कायाक्लेशाची व शरीर–बल निदर्शक अशी अद्‌भुत कृत्ये करून दाखवितात, त्यांना कानडीत पवाड असा अर्थ [शब्द ?] आहे. तो लक्षात घेऊन श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात 'पवाडा' हा शब्द मूलतः विक्रमाचा गौरव करणाऱ्या गीताचा वाचक नसून

१४. रा. चिं. ढेरे, **मराठी लोकसंस्कृतीचे उपासक**, पुणे १९६४ पृ. १६३.

विक्रमवाचक आहे. पुढे लक्षणेने ज्या गीतांत ‘ पवाड ’ वर्णिलेले आहेत, त्या गीतालाच पवाडा अशी संज्ञा प्राप्त झाली.[१५]

श्री. ढेरे यांचे हे स्पष्टीकरण मान्य होण्यासारखे नाही. कारण संस्कृत प्र+वद म्हणजे प्रकर्षाने बोलणे, सांगणे या अर्थाने हा शब्द आर्य भारतीय भाषांमध्ये असलेला दिसतो. कानडीतील ‘ पवाडा ’ हा द्रविडियन भाषेतील शब्द, अनेक आर्य–भारतीय भाषेत समाविष्ट होणे कठीण दिसते. पुढील आर्य भारतीय भाषांत पवाडा शब्द दिसतो.

पंवारा (हिंदी) दीर्घगीत,

पवारो (गुजराती) महाकाव्य (epic poem)
पवाया (प्राकृत) निवेदन (report)
पमारा (व्रज) लोकछंद (गीत प्रकार)
पँवारा (माळवा) लोकछंद (गीत प्रकार)

तेव्हा कानडी पवाडयावरून पवाडा शब्द आला हे म्हणणे इतकेसे सयुक्तिक दिसत नाही.

संस्कृत प्र + वद–सांगणे, बोलणे, उद्देशून बोलणे, या शब्दापासून पवाडा शब्द आला असावा. यातील अडचण एवढीच की अंत्य द चा ड कसा झाला असेल? याला हेमचंद्राच्या अपभ्रंश व्याकरणातील सूत्र ४०७ मार्गदर्शक ठरते. अपभ्रंशात यद् आणि तद् यापासून बनणाऱ्या अनुप्रत्ययान्त यावद् व तावद् यांच्या वकारादि अवयवाचा डित् एवड असा आदेश विकल्पाने होतो. (सूत्र ४०७) या नियमाने प्र +वद–चे प्रवड, पवाड होणे शक्य आहे. तरीही ही व्युत्पत्ती इतकीशी समाधानकारक नाही. ज्ञानकोशकारांनी पवाडा शब्द मूळ प्राकृतात आहे असें म्हटले आहे, त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. लोकगीताशी परंपरेने संबंधित असलेला हा शब्द देशी भाषेत सापडणे शक्य आहे असे वाटते.[१६]

॥ श्री पवाडा लीखितं ॥

श्री गणशाये नमाः । श्री सुरश्वतेन[१७] नमाः
श्री गुरुभ्यो नमाः । श्री संत सज्जनाये नमाः
अश्ये श्री पोवाडा माला मंत्रश्या अग्न्यांनसीधरुशीः[१८]
श्री सर्व पापक्षयार्थे पूर्वाराधीस्वरं ॥

---

१५. रा. चिं. ढेरे, **उ. नि.**, पृ. १६६.

१६. **हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण** (मराठी भाषांतर) संपा. के. वा. आपटे, मुंबई, १९६३, पृ. ४४.

१७. सरस्वतेन,

१८. अज्ञानसिद्ध ऋषी.

वरदमुर्ती बतलेस्वर। श्री सद्‌गुरु कर्तकर्तरि
त्याग रक्षोगचा (?) गोसावी। सीध विचारे वीर ॥
शांतीस नीजचेंद्र। प्रपंच भारासी नीज वडवानळ[19] ॥
त्रीलोक्यासी ज्ञानांकुश। ळोहारी (?) पानी। मोक्षासी ज्वाळ ॥
आरत्र परत्रासी ध्यानं। गो गोपाळ, भु भुपाळ ॥
देव देवाचा देव खी गुरु मागत्याचा दानी ॥
कल्पीत्याचा कल्पतरु। देवधर्मासी द्रष्टा ॥
ते भारे दाटली मेदनी। पृथ्वीशी घातली ज्ञान खीळ ॥
मेरुसी स्थापीला नीज महामेरु ॥
कळयुगी देववीरासी वीरभद्र ॥
बुडते भवसमुद्रीचे तारू लोटले तैसा तो नव्हेची ॥
वीस्वरूप वडवाळ सीध नागनाथ न
बुडते भवसमुद्रीचे तारू। बुडते जगा तारी ॥
शेरंणागतासी उधरी ॥ तत्वार्थ पुर्ण करी ॥
सद्‌भावीकासी सावरी। परचीत[20] प्रकाश चराचरी ॥
नीत्त नेमावरी। दंड सुदंड येम कीळावरी। पाताळ सांवरी।
मही लोक संच करी स्वर्गलोक सत्वधरी ॥
प्रणव ॐकार सत्ता वर्तवी। संसारी रवीसो प्रकाशता ॥
चेंद्रासी सीळंता। अग्नीसी। उष्टता। उपाधीसी नीरउपाधी ।;
तो सीधांतासी स्वयं सीधांत सत्ये गुरु नागनाथं ॥
सत्य सीधांतांसीं। श्रुसंत (?) दुशतदुसीकासी धुमकेत ॥
आनात्मीक नींदी नींदीत नानींदकासी (?) आवज्र वज्रघात।
आपे ज्ञान वीज्ञान करीत। पवाडे गाण[21] कण पाववी ॥
बंदीजना करवी वर्णची। तेतीस कोटी देव वर्णीती!
कळीमाजी। देव अणी भक्त नाहि म्हणति ॥
त्या आदिरायासी दीक्षा गुरु
ऐसा तो वीस्वरूप वडवाळसीध नागेस्वरू ॥
आनांदी परतरु कळीचा कर्तारू ॥
शेशाचा अवतारू ॥ भंडारेवीण उदारु ॥
सेखेवीण जुझार। मने श्रस्टी मने संहार ॥

---

१९. वडवानल अग्नी,
२०. परचित.
२१. गाण–पवाडे गाणे,

भक्त पुरधर । वीवेहि वीस्वरु । वीवर्ण प्रभाकरू
आनंत कोटी ब्रह्मांडासी आधारू ॥
सुप्रभा आपरोक्षे समुद्र । सर्व जीवनासी आधारू ॥
बहू जग जगद्‌गुरु ॥
मानीत्यासी वीभुतीचा पाट । न मानीयासी स्वर्गाचा घाट ॥
रूपे आरूपे आचाट । स्वरूपे श्रुप्रभा घनवट ॥
बहरुपेसी येकट । कृदांत कळीकाळासी आलोट ॥
प्रलया-ग्नी (ग्नी) अतीधीट, सुदर्थ (?) श्रुभटा ॥
आपरोक्षत्व आचाट । नीट ज्ञान दृष्टीसी ॥
सादृश्ये परब्रह्मं घनवट, गुरुनाथ देव आचाट ॥
प्रतापपुर्ण सीधवंन[22] ॥
परम नीर्वाण । उत्पती चैतन्ये वृधीसी जीवन ॥
क्षेयेसी प्रलयाग्न । येम काळासी हनन ॥
[23]अपृमृत्यासी नीर्दाळण । सुमृत्यासी बोळवण ॥
बळीवंतासी । बळीवंतपण । मोह-नासी नीज मोहन ॥
जम्नासी[24] नीवारण, देहे दोशासी दंडन ॥
ज्ञानासी वीज्ञान तो ॥
वीस्वरूप वडवाळसीध नागनाथ नीरंजन ॥
दुसीत दशकासी धुमकेत ॥
आनात्मीक नीदी नींदीती नीदंकासी ॥
वज्रआ वज्रघात, सीधांतासी स्वयें सीधांत
चेतनेसी । सीध चेतन । आगेनी जगे करीत ॥
प्रज्ञेसी प्रज्ञा भरीत । तो ॥
श्री गुरू वीस्वरूप वडवाळ सीध नागनाथ ॥
श्रुज्ञान स्वर्ग पवाड । देव दानवासी सुखधाम वाड ॥
आसुर सुरासी नीज सुर । अन उदेशासी आवघड
सत्सीश्यासी सीवयोग सीध सुख गोड ॥
आनुपम्यें आगायेन[25] गाववी ॥
आजीउ लींग नागनाथ नमो देव नमो ॥

---

२२. सिद्धघन (मेघ),
२३. अपमृत्यूला.
२४. जन्मासी.
२५. तारस्वरांत, मोठयाने गाणे.

सीध नमो । गुरु नमो । नीज लींग नमो ॥
आगोचर आगोचर पदवी । आब (वं) दीजना सुब (वं) दी जना करवी ॥
आवर्ण वर्णना वर्णवी । आनंत कोटी ब्रह्मांड पदवी ॥
रूपे स्वरूपे धरीता तो श्री गुरू वीस्वरूप
वडवाळ सीध नागनाथ ॥
मनपती प्राणपती । आनं(द)पती । प्रजापती ॥
वीस्वपती । सर्वपती । मायापती । माहादेव माहासीध ॥
महानुभव माहा महीम माहा शेशा । नीज शेश ॥
नागेश श्रीगुरु शेरणं शेरणं ॥
आवीद्या दाढे वीशये वीसे । न भरूनी भारी ॥
वीद्या दाढे आमृते तरुनी तारी ॥
या दोन्ही पक्षांतरी । आगंम्ये नीरंतरी ॥
नीगमने ती नीर्धारी । सुगम सुप्रभ भरीत चौमेरी ॥
आ वीरळलींग । आगम्यें लींग । आगोचर लींग ॥
श्रीगुरु वीस्वरूप वडवाळसीध नागेश्वरा ॥
त्राहे त्राहे आनाथ बंधु । सीस्यालागी गुरु आवतारु ॥
वीवेक वारुवरि सोहंस्वारु ।
पवाडा पाव सोहं[२६] ब्रह्मवीद्येचा उपदेश[२७] ॥
भासासी नीराभास । वीकाशासी नीज वीकास ॥
वीपरीतो[२८] । श्रुपरीतो[२९] । श्रुपरातो वीपरातो ॥
पापाचे पुन्ये पुन्याचा पाप करूनी । सर्व देवेसी ॥
तेतीस कोटी देवाचे माथे लाजवी ॥
तो गुरु वीस्वरुप वडवाळसीध नागनाथ ॥ छ ॥
वेदांत वीण वेद पदवी । शास्त्रवीण शास्त्र नीती जाणवी ।
पुराणे-वीण पुराण पढवी । वीवळार्थ वीण सीधार्थ प्रकटवी ॥
तो देव नागनाथ । तो देव सीधनाथ ॥
तो देव जग जीवीता जीवन प्रणम्ये । प्रणम्ये ॥
प्राण जीवन प्रणम्ये[३०] । प्रणम्ये । ज्ञान जीवन प्रणम्ये प्रणम्ये ॥

२६. पवाड्याला पाव, जसे नवसाला पाव,
२७. उपदेश
२८. उलट
२९. सुलट, सुपरीतः सु+परी+ईत (क. भू. धा. वि.) ?
३०. नमस्कार करतो, (सं. प्र+नम् ल्यबंत, अपूर्ण क्रियापद, त्याचे भ्रष्ट रूप प्रणम्ये ?)

चैतन्ये जीवन प्रणम्ये प्रणम्ये ॥
श्रीगुरु नागेस्वरा प्रणम्ये प्रणम्ये ॥
आतर्क लींग। शास्त्र तर्क। काव्येकर्म। थोडे पुराण ॥
छेद (छंद), (?) संगीत। कवीत। कथीत। कथा बोबड ॥
वेद उपनीशधं, । श्रृतीसार। बरळ वाकुडे नीवशब्द ॥
आगोचर। श्रीगुरु प्रसाद। प्राप्ती। धडफुडा ॥
आंगा वस्ती येतो। श्रीगुरु वीस्वरुप वडवाळसीध नागनाथ ॥ छ ॥
मी नव्हे भव स्छळ। जयाते तेजाळ करी। हनन ॥
जळ स्छळासी। मी आढळ। अखिल स्छळ। नीज शेरण छळ ॥
मी नव्हे शोकाव-जळ, (?) जयाते तेज करी नीर्मुळ ॥
तेंज जळाते। नीज जळ। नीत्ये साहोजळ (?) ॥
आशोशत्व जळ। न द्रवत्व जळ। न रसोकत्व जळ ॥
नीज रस नीर्जळ। आ-प्रळंयेक जळ ॥
तो मी नीर्जळ सुजळ। पुर्ण घन नागेश स्वरुपं ॥ छ ॥
मी नव्हे तेज प्रकुर्तीक। जयाते पवन करी नास्तीकं ॥
पवंन तेजाचे। जे आस्तीक। तेज नीजतेज ॥
नीशकळंक[31] तेज। आढळ तेज। आक्षई तेज ॥
आमळ[32] तेज। सीधांत तेज। वीस्वतेज ॥
स्वीत[33] तेज। ती नीज तेज, नागनाथ प्रणीतं प्रणीतं ॥ छछ ॥
मो नव्हे पवंन। जो खगामांजी होय लीन ॥
खंग पवंनासी जे नीज पवंन। नीत्ये नीरंजन ॥
सीतंळ-तेसी जीवन। चंचळ-पणासी, आचळपण ॥
आकाज काज। आकाश पोटी समावी ॥
पवंत[34] पोटी। समाधी। जंळ पोटी समावी ॥
मही सर्व-भेसी समावी ॥
तो गुरू वीस्वरूप वडवाळसीध नागेश ॥ छ ॥
मी नव्हे गगन जयाते तंम करी हनन ॥
तम गगनासी जे कारणं। ते नागे स्वरूपं ॥
मी पूर्ण खंग। आखंग। सीध खंग। शाश्वीत खंग ॥

३१. निष्कलक
३२. मळवहित (अमल-मळरहित खं.)
३३. स्फति-पांढरा (?)
३४. पवन (?)

आस्तीक खंग। भरीत खंग॥
नाना भुजेंग भुवंन लींग नमो नमो॥ छछ॥
सद्‌भाव नमस्कारु। सत्सीस्ये नमस्कारु॥
नीर्वीकारु नमस्कारु। नीसंग नमस्कारु॥
श्री नागेस्वरु। नीरंजन नमो नमो॥ छ॥
नी नव्हे तमं। जे रजी होये शमं॥
रज तमासी जे उत्तम। ते सीध सुंगमं॥
सीधं स्वरुपं। आतम तम। सीधांत तमं॥
रज वीहीन तमं। उष्ट वीन तमं। भ्रांती वीहीन तमं॥
नीज तमं। नीज धामं। नोत्योतम, सदाशम
सोहं ब्रह्मं। सुंगम॥
लींग नागनाथ, वीस्वरूप वडवाळ सीध नागेश॥ छ॥
मी नव्हे रज। जे सत्वी होये आकाज॥
सर्व रजतमासी सुभोज। मी सीधांत॥
मी नीज रज। सर्व रज। सते रज॥
श्वानंद रज। दीव्ये रज। नीजलींग रज। नागेस्वर देव देव छ॥
मी नव्हे सत्व। जे ज्ञान ग्रंथामाजो होई आसत्व॥
सत्वं सत्वासी नीज सत्व। ज्ञान सत्वासी। नीज सत्वे॥
नीज सीधांत सत्व। सदासत्व। सदा आजत्व॥
आसंगत्व। आरुपत्व। आनाम्येत्व। आदेहत्व
आनंगत्व। आभेदत्व नीत्येत्व। शास्वीतत्व॥
श्रीगुरुत्व। सीधेश ईश नागेश वीदत वीदतं॥ छ॥
मी नव्हे ज्ञान। जे ॐकारी होयें क्षीण॥
ॐ कार ज्ञानासी अधिष्ठान। घन तो सहज सीधांत॥
वीज्ञान जीवन। जगजीत नीरंजेन॥
सधिराज। सेखराज। नीधानं तो नागनाथ॥
नीत्यें लींग। नमो नमो नागेस्वरा। –छ॥
मी नव्हे ॐ कार। जो औट मात्रसी माहातत्वी होय नीर्विकार॥
माहातत्व ॐ कारासी आधार। श्रुंधार वीरधर।
वीर रुद्रादी रुद्र। नागा भुजेंग सीध सीधांत॥
सीखर चुडामणी। नीज ॐकार॥
नीज लींग नमो नमो। नागेस्वरा। छ॥
मी नव्हे माहातत्व। जो गुण सामी पाव शंमंत्वे॥
गुणसाम्ये माहातत्वासी, आजत्व तो नीज तत्व॥

नीज शेशे । आधारांतर । आधार । प्रकाशता संमन ॥
सुधिरं । सीधं संकेत आवतारु ॥
आमरोक्ष दीव्ये सागरु ।
आ बींब आनांदी प्रभाकरू ॥
आगम्ये आंगवीहीन आगोचर । विपरीत देह्या-कारवेणि सुंदरु ॥
आकपृनीस्वळतां (?) । आव्येहारु ॥
आनाक्षर आनुपम्ये ईश्वरु । वाचा प्रणम पदापरतरु ॥
आसंताचे सुभासीत भास्करु ॥
तो नीत्येवेक्त परतरु । न लीपे त्रीमीरंधकारु ॥
ब्रह्मंपद नीर्वीकारु । नीज नागेश्वर नमो नमो । छ ॥
मी नव्हे गुणसाम्ये । जे सुध सत्वी होये आसाम्यें ॥
गुणसाम्ये शुध सत्वासी नीज वर्म ॥
नीजधर्म ते घनं नागेश स्वरूपं ॥
मी नव्हे संत आसंत । सदासंत । सदा लक्षणे ॥
साम्ये मी नव्हे सावेव ना नीरावेव ॥
उभये वीलक्षेण । साम्यासी नव्हे मीनामीन भीन वीलक्षेण ॥
साम्या मी नव्हे कर्म जीव माया ॥
ब्रह्मं सीवशेक्ती मी सर्वात्मा । सकळ आर्या मी ॥
आछेद्य । आक्लेदे । आसाध्ये । आदाह्ये । आशेशये ।
आनाश्रीये । आमंप[35] । आजर । अक्षये आद्वये ॥
आनांमये । नीशेब्द आखंड । परीपुर्ण ॥
सर्वसता वेदधर ॥
श्रीगुरु वीस्वरूप वडवाळसीध नागेश, वीदीत वीवात । -छ ॥
मी नव्हे सुध सत्व माया । जे उन्मेसी होये आमाया ॥
उन्मेशासी । नीजमाया । तो श्रीगुरुसीधांत सीवयौगीया ॥
आकाये काया । आमाये माया । आछाये छयाया ॥
आदेहे देह्या । आगेहे गेह्या । आताळ तळातळ ॥
आस्थळ । स्थळास्छळा । आलोक लोका लोकं ॥
आचंद्र चेंद्रासी नीजचेंद्र । आसुर्य सुर्यासी नीजसुर्य ॥
आतार तारासी (?) नीजतारा । आदेव देवासी नीजदेव ॥
आदान्व दान्वासी । नीज दान्व[36] ॥

३५. अमुप,
३६. दानवास.

आसुर सुरासी नीजसुर ॥
आधृवं धृवासी नीज्वळ (?) धृवं । आमंडळ ॥
मंडलासी । नीज मंडल । अस्थळ नीराळ ॥
औशधी नाराळ । आधान्ये धान्ये । सुधान्ये धान्ये ॥
आफळ फळ । सुफळ फळ । आसींधु सीधुसीं नीज सींधु ॥
आनांद उदार । सुबोधे बोधे । आनाडये (?) नाडये ॥
आगात्र गात्र । आत्वचा त्वचा । आरोम रोम
आमाउश माउश (?) । आदेहे देहे । आरस रस ॥
आनं आनं (?) । असैल सैल । आरुशी रुशी ॥
आसीधी सोधी । आनांग नांग । आगंगं गंगा ॥
नीज लींग नागेश्वरू नमो नमो ॥
मी नव्हे उन्मेश । जे सुध स्वरुपी होये नीराभास ।
उन्मेशासी नीजशेश परब्रंह्म नागनाथ ॥
आकल्प कल्पनेसी (नी) वींकल्पतरु ॥
आकामधेनुसी । नीजकामधेनु ॥
आचींत चींतामणीसी नीज चींतामणी ॥
आनीधी नीधीसी नीजनीधी ॥
आसीधी सीधीसी नीजसीधी ॥
आपरीस परीसासी नीज परीस ॥
आवस्तु वस्तुसी नीजवस्तु ॥
आसीत चेंद्र । आवर्ण नक्षेत्र । आउष्टण दीनकरं ॥
नीर्जळ सागर । नीरावये मेरू । आकार नीर्वीकार ॥
आतेज वैश्वांनर । आमळ धुम्र । वीभा प्रती । भास्कर ॥
स्वसता[३७] वेदधर । नीजांग तनु । आधारे सतेवीण ॥
सावरी (?) मेरू । आकार नीर्वीकार ॥
देहा वीण धरीता वीस्वाकार । द्वेतेवीण उपचार ॥
पीडेवीण आकारे । लावण्येवीण सुंदर ॥
तो सीध देही नागेस्वरू । आनांदी परतरू ॥
सीवसीधांत नमो नमो ॥
वेदवीद्या कारण ॥
सीधवीद्या गणेस्वर । ब्रह्मवीद्या दीवाकरं ॥
नीभाग्यांचा[३८] वीश्राम श्रीगुरु ॥

३७. स्वसत्ता
३८. अभाग्याचा

वीश्वरूप वडवाळसीध नागेश ।'
स्वये प्रकाश परंम प्रकाश । ईश प्रकाश '।
आचळ प्रकाश । आढळ प्रकांश । आमंळ प्रकांश ।
आगम्ये प्रकाश । नीगम प्रकाश । सुगम प्रकांश ।।
नीजलींग प्रकाश ।। आमग प्रकांश । आफुट प्रकांश ।।
आतुर प्रकांश । सुध प्रकांश । सीव प्रकाश ।।
सुदीन प्रकांश । सुध मंडळं प्रकाश । नीकळक[३९] प्रकांश ।।
सर्व प्रकांश । सर्वाकार प्रकाश । आपार प्रकाश ।।
पूर्व प्रकांश । पुरातन प्रकांश । पूर्वाचार्य प्रकाश ।।
आनांग प्रकांश नीरंजन प्रकाश । सर्वत्र प्रकांश ।।
शेश सीधेश ईश आज्ञानी (न ?) विमोचन श्रीगुरु ।।
वीस्वरूप वडवाळसीध नागेस्वर ।।
न गुरोरधीकं । न गुरोरधीकं ।।
इतीश्री वडवाळसीध पुत्र आज्ञानसीध वीरचीत '।
श्री गुरुप्रताप (प) वाड सपुर्णमस्तु ।।
श्रीगुरु नागनाथार्पण मस्तु । शुभं भवतु ।।
इति मंगळ माहेस्वरी । छछछ ।।

श्री बहीरव पीसा ।। पवाड ।।

ॐनमो नीर्वीघ्ना आनांदी बीजा ।।
चतुर्नायेका जी चतुर्भुजा ।।
आता श्री मी चतुर्दळी रहीवस (?) तु सहजा ।।
नमस्कारु माझा तु सकारु । – १ ।।
आता नमु चेतुर्वंद[४०] जननी, गमानांदी (?) कोटी
माया भ (ग) वती । संत स्वरूप जननी ।।
ते सादक संताची । –२ ।।

---

३९. निष्कलंक.
४०. चारवेद (चतुर्वेद)

त्या दीधले नीज स्छनपान[४१] ॥
तेणे उलीले[४२] अपरोक्ष ज्ञान ॥
मग झाले नीधान । श्री गुरु स्वरूप । –३ ॥
तो देव सीधं गुरू । जो परब्रह्म नागेस्वरू ॥
जेणे चुकवीला दुर्धरु । भवसागरु भवसींधु । –४ ॥
प्रकट केलं सीधपथु । ऐसा आनांदी सीधांतु ॥
जाणता अ (आ ?) दिनाथु । परसीव सीधां । –५ ॥
युग परत्वाची पाहता । माया मायाची प्रबळता ॥
त्या आशंका आदिनाथा । जाती जीव । –६ ॥
या सीध ज्ञान दीवाकरू । जरी प्रकटे नागेश्वरु ॥
तस (री) तुटे आधंकारू । त्रीमीरांचा[४३] । –७ ।
त्रीमीर भंजन नागेशु । चैतन्ये घन स्वयें प्रकाशु ॥
परब्रह्म नीज शेशु । प्रकट पंथी जी आनंता ॥ ८ ॥
त्यामाजी यौग साधन । दावील आळंकृत वज्रासन ॥
नीर्वीकारी आकार खुण । धरुनी ज्ञान उजळीत ॥ ९ ॥
प्रेत पीसा बहीरोचा द्वारी । शीर छेदवीले एक लींगाच्या करी ॥
ते आसता प्रेत प्राण शेरीर । गुरुचेतना (क)री आंतराक्षी ॥ १० ॥
चतुर्दळाच्या उपकळी । की शेडा दळाच्या तळवटी ।
वामचरण दीजे नेहटी । वरी ठेवीजे दु (स ?) री ॥ ११ ॥
गुद्गु आकोचन[४४] कीजे । आष्ट....याणा दीजे ॥
नाशाग्री दृष्टी ठेवीजे । कंठी लावीजे घटीका ॥ १२ ॥
नाभी सूर्य राखावा । नेटें स्वास उस्वास न सांडावा ॥
तळीचा आपान जाउ नेंदावा । तो राखावा हळू हळु ॥ १३ ॥
पुष्टी दडू कीजे । मेरू वाकुडा होऊ नेदीजें ॥
सद्गुरु स्मरण चींतन कीजें । बैसे बैसीजें आसनी ॥ १४ ॥
ऐंसीया परी यें....नें । आत्मा ध्याना माजी समाधी लक्षण ॥
होती लोचन व्येंहाळा (?) । –१५ ॥
....टे चीदकळा उर्धगती होये बुबुळा ॥
जोंती दीसे दोही डोळा । परत्या द्वीदळा माझारी ॥ १६ ॥

४१. स्तनपान
४२. प्रकट
४३. तिमीर, काळोख.
४४. आकुंचन

तव ज्ञान चेक्षी (क्षू) ची रचना। ते वोळखे आवघ्याची मते।
ऐसा पाहे त्रीकुट ज्ञान। यौगीराणा तो साधु ।। १७ ।।
घटी बाहे आमृत पाट। अंतरी जाणावा काया पालट ।।
मग उठे घडघडाटे। शेशचेका भीतरा ।। १८ ।।
तव आवचीती आंतराळी। कैसा ओ ईडा पीगळा म....दसा ।।
वायो संचरे सविणीसी। मग भेदुनी मनी कुळासी ।।
ते अकासी समावे ।। १९ ।।
तेथ मुद्रा लागे खेचरी.। तीचा रहीचा सुजी आंबरी ।।
आवघे येकवट दशवेद्वारी। मग परोपरी परीचो (जो) दाखवी ।। २० ।।
तेथुनी पुढे आवघड जाणा,। ते न कळे वेद पुराणा ।।
वेवादु लागला साही दरुषणा। परी त्या खुणा ना कळती ।। २१ ।।
लळी जा....न नीळी। रोमहमाचा तळमळी ।।
साहंसोहं शेब्द बहुली। जीवन बोळावे ।। २२ ।।
नौनानी सोळा सादी। बाहत्री कोट व्यापक व्याधी
ऐसे ठाकीले श्रुष्ट वुधी। तो यौगीराणा ।। २३ ।।
तेणे पूर्वील पथु कर्मीला। नीघोनी पश्चमेसी गेला ।।
क्षुधा त्र्युशा वाटुन मेला। आवस्छा। नीद्रा जींतीली ।। २४ ।।
तव ईतक एकूनी चौबळी कुडलणी (कुंडलिनी ?) जागी जाली ।।
उठोनी गोल्हाटी बैसली। वरी हवली सत्रांवी ।। २५ ।।
उंकार मात्रका। जये नांव संत्रावी लंबीकां ।।
आया गमन आली देखा।....वी ।। २६ ।।
तेणे पूर्वील वळवुधी....। जी जाग शेवती ।।
नवी उटे ज्ञान....। स्फुरती आपेआप ।। २७ ।।
कष्टत देव द्वारी। ईतुस्म्यान (?) भीतरी ।।
नागेस्वरी। उपदेसीले ।। २८ ।।
आगम निगम दावीले। यौगमार्ग सर्वही वहीले ।।
वेदशास्त्र वोळगो आले। जीव्हा गर्भी ।। २९ ।।
आनंत खंडज्ञाने। भीतरीच दावील गुप्तपण ।।
मग आखंड ज्ञान नीरंजन। स्वये शांती ।। ३० ।।
शांती पाठाचा घोरी। ते सुख सुरआसुरावरी ।।
ते नीत्येसुख नागेस्वरी। तत्व निर्धारी नीज बोधु ।। ३१ ।।
ते नीज बोधाचे फळी। जे आखंड ब्रह्म आमळ ।।
तोची नागेश नीर्मळ। करी नीर्मळ आशेका ।। ३२ ।।

परा पर सीवंतत्व। क्षेमक्षेम कारणे आमरत्व
श्रीगुरुराव।। ३३ ।।
श्रीगुरूसीधराज सी....रा। आनादी माया वर्णपरा।।
सीधशं....नागेस्वरा। निर्वीकारा। नीजरमा ।। ३४ ।।
आमृत स्वरूपेसी गाळी....। वे घालुनी गोमटी।।
मरा अनु... टी। गुरूसीस्ये आभेदता।। ३५ ।।
....पुनी उटवील प्रेतासी। पवाडा....लोक्यासी ।।
ते नीज मानसी। मानला ।। ३६ ।।
तेणे काम काळ जातील। जन्म मरणाचा घोट भरीला।।
पीसा बहिरो मुक्त केला। श्रीगुरू भला वडवाळ सीध नागेशु ।। ३७ ।।
ईती श्री पवाडा, पीसा बहीरो वीरचीते ।।
पवाडा संपुर्णमस्तु
श्री गुरू नागनाथार्पण मस्तु ।। छ छ छ ।।

माणकोजी बोधले यांचा निर्याणकाल

माणकोजी बोधले हा बालेघाटातील 'धामणगाव'चा संतकवी. त्याचे चरित्र महिपतीने 'भक्तविजय' व 'संतलीलामृत' या दोन ग्रंथांत वर्णिलेले आहे. तसेच माणकोजीचा सत्शिष्य जोतिराम याने लिहिलेले 'बोधाख्यान' हे अकरा अध्यायांचे चरित्र व 'बोधकीर्ति' नावाचे बोधले चरित्रपर प्रकरण हस्तलिखित स्वरूपात भा. इ सं. मंडळात बाड क्रमांक २८३ मध्ये आहे.

महाराष्ट्र सारस्वतकारांनी "सोळाव्या शतकातील आणखी काही कवि" या प्रकरणात या कवीचा समावेश केलेला आहे.

फलटणचे श्री. अ. ना. पंडित यांनी इतर संतकवींच्या उक्तीच्या आधारे व हनुमंतस्वामीच्या बखरीतील संतमेळाव्याच्या उल्लेखाधारे माणकोजी व तुकाराम हे समकालीन असल्याचे ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.[२] पण निश्चितपणे ते कालनिर्णय ठरवू शकलेले नाहीत.

जस्टीन इ. ॲबट यांनी "शिवकालांतील संतकवी" या आपल्या लेखात "माणकोजी बोधला शूद्र जातीचा होता. त्याचा नेमका काळ माहीत नाही. पण तो शिवकालीन असावा." असे म्हटले आहे.[३]

ॲबट याचा मुख्य आधार महिपतीबावा आहे असे दिसते. कारण 'भक्त-विजया'च्या त्रेपन्नाव्या अध्यायांत माणकोजीचे जे चरित्र आलेले आहे त्यात–

प्रेमळ भक्त माणकोजी बोधला ॥
शूद्रयातीत उपनाम त्याला ॥
जगताप ऐसे म्हणती ॥ १३ ॥

असा उल्लेख आलेला आहे. (माणकोजी जातीने शूद्र नव्हता. मराठा होता. पण त्या काळात ब्राह्मण सोडून इतरांचा शूद्र म्हणून उल्लेख करण्याचा प्रघात दिसतो.)

'भक्तविजय' ग्रंथ इ. स. १७६२ साली लिहिला गेला आहे. त्यात माणकोजी बोधले याची पंढरपूर यात्रा, त्याचा दानधर्म, यात्रेकरूंकडून कणसे लुटण्याचा प्रसंग, वगैरे बोधल्याच्या जीवनातील घटना दिलेल्या आहेत. भक्तिविजयातील घटनांची पुनरुक्ती 'संतलीलामृता' होत नाही. संतलीलामृत ग्रंथ इ. स. १७७४ साली लिहिला गेला. त्यात माणकोजीच्या तीन मुलांची माहिती, अविंधाने माणकोजीस मांस खाऊ

घालणे व माणकोजीच्या दैवी शक्तीने त्याची फुले होणे, फकिराच्या वेशाने विठ्ठलाने येणे व माणकोजीची सून भागीरथी हिला नेणे, या घटना येतात. माणकोजीबद्दलची ही अधिक माहिती महिपतीला 'भक्तिविजया'च्या नंतर मिळालेली दिसते. संतलीलामृताच्या एकावन्नाव्या अध्यायात महिपतीबाबा एक महत्त्वाची माहिती देतो. त्याचा गद्य आशय असा :

"भगवंतबाबाचा पुत्र भोजबाबा (भानजी) सध्या (इ. स. १७७४) धामणगावात आहे." इ. स. १७७४ साली माणकोजीचा पणतू "भोज" हा धामणगावात माणकोजीची परंपरा चालवीत होता. तोच येथे अभिप्रेत दिसतो.

महिपती तिथीवार घटना देऊन चरित्र सांगत नाही, हे खरे असले तरी तो ऐतिहासिक कालानुक्रम पाळताना दिसतो. बोधल्याच्याबाबत ते कितपत खरे ठरते ते पाहू.

माणकोजी बोधल्याचे धामणगाव बार्शी–सोलापूर रस्त्यावर आहे. ते बार्शीपासून चौदा मैलांवर आहे. बार्शीहून सोलापुरास जाताना राळेरास स्थानकावर उतरावे लागते. राळेरासपासून दोन मैलांवर धामणगाव आहे. राळेरासवरून माणकोजीच्या समाधीचा घुमट दिसतो. माणकोजीच्या चरित्रात येणारे शंकराचे देऊळ, विहीर, शेत अजूनही या गावात आहेत. तसेच माणकोजीची पत्नी ममताई, मुलगा धर्मदास ऊर्फ यमाजी यांच्या समाध्याही तिथे आहेत. माणकोजीचे सध्याचे वंशज श्री. भाऊसाहेब बोधले हे आहेत. त्यांची शेती धामणगावात असून ते माढा तालुक्यातील 'वाकाव' या गावी राहतात. धामणगावात माणकोजीची जी समाधीची जागा आहे, त्या जागेच्या खोलीत काही हस्तलिखिते होती. ती त्यांच्या वंशजाकडून मला मिळाली. त्यात एक जुन बाड सापडले. या बाडात निरनिराळ्या हस्ताक्षरांत ज्ञानेश्वर, नामदेव, शेखमहंमद, त्रिंबक, मुकुंद, तुकारामादी कवींच्या रचना लिहून ठेवलेल्या आहेत. आज त्या बाडाची २७८ पृष्ठे उपलब्ध आहेत. बाडाचा कागद जुना देशी आहे. बाडाच्या कडा व कोपरे झिजून गलेले आहेत. बाडाच्या एका पृष्ठावर पुढील नोंदी केलेल्या आढळल्या—

"सके १६१६ भावानाम सवत्सरे जेष्ट मास वदेव पक्षी त्रितिया गुरुवारी ते दिनी बोधराज समाप्त"

[खरे जंत्रीप्रमाणे हा काळ गुरुवार दि. ३१ मे १६९४ असा येतो]

"सके १६४५ सुभानुनाम संवत्सरे श्रावणमासी वदे पक्षी द्वितीया सोमवारी ते दिनी यमाजीबाबा समाप्त"

[शके १६४५ या वर्षी 'सुभानु' संवत्सर येत नाही. "शोभन" संवत्सर येतो. 'शोभन' संवत्सराची श्रावण वद्य द्वितीया, सोमवार दि. १९ जुलै १७०३ (शके १६२५) रोजी येते. संवत्सराच्या नावाच्या चुकीमुळे २० वर्षांचा फरक पडलेला दिसतो.]

"सके १६९१ सौम्य नाम संवत्सरे भाद्रपद वदे १० रविवारी भगवंतबाबा समाप्त."

[इथे सौम्य संवत्सराऐवजी ' विरोधी ' संवत्सर पाहिजे. रविवार दि. २४ सप्टेंबर १७६९ रोजी भाद्रपद वद्य नवमी आहे, पण ती आठ घटका असल्यामुळे त्या दिवशी दशमी म्हटल्यास चूक ठरणार नाही.]

इ. स. १७७४ साली लिहिल्या गेलेल्या ' संतलीलामृतात ' भोजाचा उल्लेख सध्याचा वारस म्हणून येतो. कालदृष्ट्या अगदी बरोबर आहे हे आपणास मान्य करावे लागेल.

माणकोजी बोधल्यांच्या सध्याच्या वंशजाकडून मला " बोधलीलांबरी " नावाचे माणकोजी बोधल्याचे हस्तलिखित चरित्र मिळाले आहे. ते पंचवीस अध्यायांचे असून, ओवी संख्या ५२४६ इतकी आहे. त्याचा लेखक ' शिवरामात्मज ' असून शके १७७३ साली ते लिहिलेले आहे. त्यात माणकोजी शंभर वर्षे जगला व शके १६१६ च्या ज्येष्ठात समाधिस्थ झाला असे तो म्हणतो. बोधल्यांच्या वंशजात हा ग्रंथ प्रमाण मानला जातो. यावरून माणकोजीचा निर्याणकाल ३१ मे १६९४ व जन्मकाळ इ. स. १५९४ च्या जवळपास मानायला हरकत नसावी.

✦ ✦ ✦

संदर्भ

१. वि. ल. भावे, **महाराष्ट्र सारस्वत**, आवृत्ति ५ पृ. ८०५.

२. विविधज्ञानविस्तार आणि महाराष्ट्र साहित्यपत्रिका, पृ. ५० अं. ६ पृ. ८९.

३. The Poet saints of Maharastra during the life time of Shiwaji, शिवाजी निबंधावली, खंड पहिला. पुणे १९३०.

✦ ✦ ✦

महाभारतकार–जिवाशिवाचा कालनिर्णय

मराठी भाषेत ' महाभारत ' निर्मिती करणारे कमीत कमी वीस ते पंचवीस कवी आहेत. कै. चांदोरकर यांनी आपल्या ' कविकाव्यसूचीत ' ' भारतअवतारक ' कवींची नावे दिलेली आहेत. श्री. ल. रा. पांगारकर यांनी शके १८२६ मध्ये सरस्वती मंदिराच्या द्वैमासिकात ' महाभारताचे मराठी अवतार ' या लेखात ' जिवाशिवाचे ' महाभारत असल्याची माहिती दिली आहे. त्यात ' जिवाशिवा ' कोणी बंधू होते असे ऐकण्यात असल्याचे ते सांगतात. महाराष्ट्र सारस्वतकार जिवाशिवाची माहिती, त्याने महाभारत लिहिले होते एवढीच देतात. पुढे सारस्वताच्या पाचव्या आवृत्तीच्या पुरवणीमध्ये कवीची माहिती दिलेली दिसते. अर्थात् ती माहिती म. म. पोतदारांच्या ' जिवाशिवाचे मराठी महाभारत '[1] या लेखाच्या आधारे.

म. म. पोतदारांचा वरील लेख चाळीस वर्षांपूर्वी लिहिलेला आहे. त्यावेळी त्यांना श्री. आवटे यांचेकडून काही हस्तलिखिते मिळाली. त्यात जिवाशिवाच्या महाभारताचे हस्तलिखित होते. त्या आधारे काही माहिती सदर लेखात मांडलेली आहे. चरित्र निर्णयाच्या बाबतीत काही निश्चित माहिती त्यांनी पुरविली आहे तसेच काही शंकाही उपस्थित केलेल्या आहेत. साधार पुराव्याअभावी काही निर्णय घेणे अवघड असल्याचेही त्यांनी मान्य केले आहे. मला शिवकालातील एक संतकवी ' माणकोजी बोधले ' यांचे ' बोधलीलांबरी ' नामक ओवीबद्ध चरित्र उपलब्ध झाले आहे. ते हस्तलिखित स्वरूपात आहे. त्याचा कर्ता ' शिवरामात्मज ', अर्थात ' जिवाशिवा ' हा आहे. त्या ग्रंथाच्या आधारे म. म. पोतदारांनी ' जिवाशिवा ' संबंधी मांडलेले निर्णय तपासून घेणे शक्य झाले आहे.

सदर स्फुट, म. म. पोतदारांचा वरील लेख व बोधलीलांबरी या हस्तलिखितात शिवरामात्मजाने स्वतःसंबंधी जी माहिती दिली आहे त्यावर आधारलेले आहे.

कवीच्या नावासंबंधी चर्चा करीत असताना श्री. पोतदार लिहितात, " जिवाशिवा भाऊ भाऊ होते ही कल्पना कोण्या चतुराने मनातूनच काढली असली पाहिजे. आता ती थाप समजून जिवा हे कवीचे नाव आणि शिवा हे त्याच्या गुरूचे नाव, आणि गुरूचा

१. द. वा. पोतदार, " जिवाशिवाचे मराठी महाभारत, " भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ११ अं. १ ला. (मार्च ते जून इ. स. १९३०) पृ. २१ ते २५.

अंकित म्हणून जिवाशिवा हे गुरुभक्तिसूचक वा गुरुवंशसूचक असे कवीचे नाव "[२] श्री. पोतदारांचे वरील मत, ' जिवाशिवाच्या महाभारत ' हस्तलिखितातील

" शिवयोगी सद्गुरु दयाळ । पुरविली जिव अज्ञानाचि आळ "
ग्रंथ वोलविला रसाळ । भोळे अवाळ तारावया ॥ ९५ ॥

या आधारावर उभे केलेले आहे. याच संदर्भात " बोधलीलांवरीचा " कर्ता शिवरामात्मज बोधलीलांवरीत आपल्या चरित्रासंबंधी माहिती, पहिल्या अध्यायात देतो ती अशी—

" कस्यपाचा वंशधारी। परंपरा चालली खरी।
तया पितराते निर्धारी। मानसोपचारी वंदिले ॥ २९ ॥
वंशपरंपरा नेमस्त। सिवराय पिता समर्थ।
जेणे जाणुन मतितार्थ। प्रपंच परमार्थ जाणिला ॥ ३० ॥
तो महाराज माझा पिता। चिदाकाशी बोध सविता।
उमा नामे माझी माता। उपमा सिता द्रौपदी ॥ ३१ ॥
अनन्य केले पति भजन। भेद नेणे मनी आन।
ग्रंथारंभी नमिता पूर्ण। आशीर्वचन दिधले ॥ ३२ ॥

बोधलीलांवरी हा २५ अध्यायांचा ओवीबद्ध ग्रंथ आहे. सुमारे पाच हजार ओव्या त्यात आहेत. २५ व्या अध्यायात ग्रंथसमाप्ती करीत असता प्रस्तुत कवी म्हणतो,

पांच योजने पश्चिम दिशा। कर्मापूर नामे ग्रामेशा।
तेथे ग्रामलेखणी वंश असा। भोगिता कलेशा न सोडवे ॥ २८९ ॥
तर्कस्य उपनाम कश्यप गोत्री। अश्वलायनशाखा परमसुत्री।
शिवरामात्मज अहोरात्री। पुत्रपौत्री तव कृपे ॥ २९० ॥
जीव नामाचा जगी बोभाट। शब्दवाणीचा तुमचा भाट।
गुरुपरंपरा ज्याची अचाट। शिवरामी वाट दाविली ॥ २९१ ॥
जो पिता तोचि श्रीगुरुनाथ। दत्तपरंपरा आली चालत।
चैतन्य मुद्रांकितशांत। झाला परमार्थ बाळपणीं ॥ २९२ ॥
तुका विप्र प्रसाद शिवरायी। तेथूनि जीव झाला बिरायी।
तो माझा शिवस्वामी। हृदयधामी रेखिला ॥ २९३ ॥
बाळपणी केला बोध। त्याचा न लागला शोध।
कैलासी गेला प्रबुद्ध। मग सिवराम सिद्ध अर्चिला ॥ २९४ ॥
ते भजलिंग बाबाचे सोबती। योग केला यथा निगुती।
तेणे साधुन नाना युक्ति। गायिली भक्ति तव कथा ॥ २९५ ॥
शके सत्राशे चौऱ्याहत्तर। शरदऋतु मास आश्विनीकुमार।
शुद्ध नवमी सोमवार। तिसरा प्रहर संपता ॥ २९६ ॥

---

२. तत्रैव पृ. २२

लेखन आले समाप्तीस। शोधा संन्निध गुंडिदास।
तेणेच बोलविला इतिहास। नवा हुंकारास देवोनी ॥ २९७ ॥

वरील ओव्याच्या आशयावरून म. म. पोतदारांच्या विधानांची दुरुस्ती आपणास करता येईल.

'जिवाशिवा' या नावात 'शिवा' हे जिवाच्या गुरूचे नाव व गुरूचा अंकित म्हणून तो "जिवाशिवा" असे नाव धारण करतो. पण "शिवराम" अर्थात् "शिवा" हा जिवाचा पिता आहे. म्हणजे पिता हाच गुरु (ओवी २९२) म्हणून तो "जिवाशिवा." तेव्हा म. म. पोतदार म्हणतात तशी एका अर्थाने 'जिवाशिवा' नावात 'शिवा' गुरुपरंपरा सूचित करतो आणि दुसऱ्या अर्थाने वंशपरंपराही सांगतो. म. म. पोतदार "जिवाशिवाचे" गोत्र 'कश्यप' असल्याची माहिती देतात. बोधलीलांबरीकार तीच माहिती अधिक विस्ताराने देतात (अध्याय २५-२९०) त्यावरून जिवाशिवाचे गोत्र 'कश्यप' व अश्वलायनशाखा' असल्याचे स्पष्ट होते. शाखेसंबंधी अधिक माहिती आपणास मिळते. म. म. पोतदार 'जिवाशिवा' असे ज्या कवीस म्हणत आहेत तोच आपले नाव 'शिवरामात्मज' असेही सांगताना दिसतो, (अध्याय २५-२९०) त्याच्या आईचे नाव उमा आहे. त्याच्या घराण्यात दत्तपरंपरा चालू होती. तो चैतन्यसंप्रदायी होता. 'शिवाला' म्हणजे 'शिवरामाला' तुका विप्रचा प्रसाद होता अशीही माहिती मिळते. (अध्याय २५-२९३)

'जिवाशिवाची' ही घरगुती माहिती मिळाल्यावर तो कुठला असावा यासंबंधी उत्सुकता निर्माण होणे सहज शक्य आहे. म. म. पोतदार त्यासंबंधी लिहितात,

पंढरिपासून योजने चारी।
उत्तरे क्षेमावति क्षेत्र अवधारी।
सप्त शिवलिंगे तीर्थ भारी।
तेथे अधिकारी कुळवृत्ति ॥ ९६ ॥[1]

"पंढरपुरापासून उत्तरेस चार योजनांवर ही कोणती 'क्षेमावती' आहे ते अद्यापि माझ्या ध्यानात आले नाही. लवकरच उलगडा होईल असे वाटते.[2] म. म. पोतदारांना 'या क्षेमावतीचा' उलगडा झाला किंवा काय हे प्रस्तुत लेखकाला माहीत नाही. पण बोधलीलांबरीतील माहितीच्या आधारे जो उलगडा होतो तो असा. बोधलीलांबरी अध्याय २५-२८९ मध्ये तो

पांच योजने पश्चिम दिशा। कर्मापूर नामे ग्रामेशा
तेथे ग्रामलेखणी वंश असा। भोगिता कलेशा न सोडवे'

असा स्पष्ट उल्लेख करतो. म. म. पोतदारांच्या माहितीप्रमाणे 'क्षेमावती'

१. तत्रैव पृ. २२ २. तत्रैव पृ. २२

पंढरपूरच्या उत्तरेस असायला हवी. बोधलोलांबरीच्या माहितीप्रमाणे ती पश्चिमेस पाच योजने आहे. पण कुठल्या गावच्या पश्चिमेस याचे स्पष्टीकरण नाही. बोधलीलांबरीचा चरित्रनायक "माणकोजी बोधला" हा आहे. याचे गाव धामणगाव बोधल्यांचे धामणगाव या नावाने प्रसिद्ध आहे. हे गाव बार्शी-सोलापूर रस्त्यावर वैरागच्या पुढे आहे. बोधलीलांबरी हा ग्रंथ धामणगावात लिहिला असावा असे दिसते. तसे गृहीत धरले तर त्या गावाच्या पश्चिमेस 'कर्मापूर' अगर 'क्षेमवती' हे गाव असायला हवे. सोलापूर जिल्ह्यात सध्या 'कर्मापूर' किंवा 'क्षेमावती' असे गाव नाही. पण मद्रास-मुंबई रेल्वे मार्गावर कुर्डुवाडीहून पुण्यास जाताना किंवा पुण्याहून कुडुवाडीस येताना 'केम' नावाचे एक छोटे रेल्वे स्टेशन लागते. तेच क्षेमावती, किंवा 'कर्मापूर' होय असे दिसते. भौगोलिकदृष्ट्या, उपलब्ध पुराव्यांच्या आधारे ते पंढरपूरच्या उत्तरेस असून धामणगावच्या पश्चिमेस आहे हे स्पष्ट होण्यासारखे आहे. जुन्या लेखकात शब्दांचे संस्कृतीकरण करण्याची कृती दिसते. जसे आळंदीचे अलंकापुरी, धामणगावचे-धार्मण्यनगरी तसेच केमचे क्षेम-कर्म अशी रूपे झालेली दिसतात. तेव्हा सध्याचे सोलापूर जिल्ह्यातील "केम" म्हणजेच जिवा-शिवाची 'क्षेमावती' किंवा शिवरामात्मजाचे कर्मापूर होय.

'जिवाशिवाच्या' व्यवसायानिमित्त माहिती देताना म. म. पोतदार लिहितात–

"कवि वरील क्षेमावतीचा एक वृत्तिवंत होता. वृत्ति कुळकर्ण्याची किंवा जोसकीची की आणखी कसली ते स्पष्ट नाही. परंतु जोसकीचीच असावी."[1]

बोधलीलांबरीवरून "ग्रामलेखणी वंश असा" हे स्पष्ट दिसते व त्या आधारे "जिवाशिवा" वृत्तीने कुलकर्णी होता. त्याची वृत्ती जोसकीची नव्हती हे उघड सत्य दिसते. म. म. पोतदारांचा तर्क दुरुस्त करून घ्यायला हवा.

जिवाशिवाच्या कालासंबंधी निर्णय करताना म. म. पोतदार म्हणतात. "हा कवी मुक्तेश्वर–गोपाळ–श्रीधरांच्या नंतरचा हे अगदी ठाम होय" बोधलीलांबरीच्या आधारे–म. म. पोतदारांचे मत अधिक तपशिलाने मांडता येईलच पण "जिवाशिवा" श्रीधरानंतरचाच नव्हे तर महिपतीच्या नंतरचा असल्याचे सिद्ध करता येईल; कसे ते पाहा.

श्रीधराचा जन्म शके १५८० व मृत्यू १६५१ असा आहे.

महिपतीचा भक्तिविजय ग्रंथ शके १६८४ चित्रभानु संवत्सरी वैशाख वद्य द्वितीयेस पूर्ण झाला. बोधलीलांबरीकर्ता 'जिवाशिवा' महिपतीच्या भक्तिविजयाचा उल्लेख बोधलीलांबरीत करताना म्हणतो,

'ते अवतार लीला अद्भुत । भक्तिविजय वर्णिला ग्रंथ ।
महिपतीबाबा वरदाईत । तेणे कथार्थ वर्णिले ॥ १३६ ॥
(बोधलीलांबरी अध्याय १.१३६)

१. तत्रैव पृ. २२. २. तत्रैव पृ. २५.

यांवरून शके १६८४ नंतरचा हा कवी आहे. पर्यायाने महिपतीच्या नंतरचा हा 'जिवाशिवा' आहे, हे स्पष्ट होईल.

बोधलीलांबरी ग्रंथ केव्हा समाप्त झाला हे सांगताना कवी म्हणतो,

शके सत्राशें चौऱ्याहत्तर। शरदृऋतु मास आश्विनीकुमार।
शुद्ध नवमी सोमवार। तिसरा प्रहर संपता ॥ (२५.२९६ ॥)

म्हणजे बोधलीलांबरी ग्रंथ इ. स. १८५२ साली लिहिला गेला. या संपूर्ण ग्रंथात जिवाशिवाने आपण महाभारत लिहिल्याचा उल्लेख कुठेही चुकून केलेला नाही. या ग्रंथात अध्यायाच्या अखेरीस

जीव शिवाचे चरणी। शब्दसुमनी अर्पीत ॥ अध्याय १.२०१
जीव सीव एकाकार। कैचा नमस्कार कवणाते ॥ अध्याय २.१९७
जीवा लावुन ध्यानधंदा। मिळवी आनंदा सिवासी ॥ अध्याय ३.२०५

असा "जिवाशिवाचा" नामोल्लेख येतो. बोधलीलांबरी हा या ग्रंथकाराचा पहिलाच ग्रंथ असावा असे दिसते. तो स्वतःसंबंधी ग्रंथारंभी म्हणतो–

"तेथे मी अत्यंत दीन। नाही व्याकर्ण शब्दज्ञान।
पद्यरचनादि गण, लघु गुरु खुण नेणे मी ॥ ४ ॥
ऐसा असोनि मती मंद। मनी लागलासे छंद।
गावे तव गुण विषय। परी शब्दावोध कळेना ॥ ५ ॥

महाभारताची जिवाशिवाने केलेली रचना बोधलीलांबरीच्या नंतरची असावी. म. म. पोतदारांना शके १७८८ ची उपलब्ध पोथी नक्कल असावी अशी शंका येते. पण जिवाशिवाचे महाभारत इ. स. १८५२ नंतरचे आहे या बद्दल शंका नाही. तेव्हा महाभारतकार 'जिवाशिवा'ने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपले 'महाभारत' लिहिले असावे असे निश्चितपणे म्हणता येते.

✦ ✦ ✦

जोतिरामरचित 'बोधराजाख्यान' आणि इतर रचना

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांच्या संग्रहातील बाड क्रमांक २८३ मध्ये प्रस्तुत रचना उपलब्ध झाली. सदर बाडासंबंधी कै. वि. का. राजवाडे यांनी भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तात (शके १८३७ पृ. १३) नोंदलेली माहिती अशी—

" (माणकोजी बोधले) याचा ज्योतिराम किंवा जोतिराम या नावाचा एक शिष्य होता. त्याने त्याचे (माणकोजीचे) आख्यान, कीर्ती वगैरे लिहिल्या आहेत. ज्योतिराम लावण्या, कटाव, अभंग वगैरे करीत असे. कराडास एका बाडात जोतिरामकृत बोधल्याचे आख्यान व कीर्ती लिहिलेली आढळली. सदर बाड भा. इ. सं. मंडळात आहे. "

कै. राजवाडे यांनी याच अंकात जोतिरामकृत बोधल्याची कीर्ती नमुन्यादाखल दिलेली आहे. तसेच बोधराजाख्यानाचे अकरा लहान अध्याय असल्याची नोंद घेतलेली आहे. महाराष्ट्र सारस्वतकार यांनी याच लेखाच्या आधारावर "या बोधलेबुवांचे **जोतिराम** व **गोपाळनाथ** या नावाचे दोन शिष्य होते, व त्यांची काही रचना आढळते " असा उल्लेख केला असावा (५ वी आ. पृ. ८०५). त्यांत जोतिरामाच्या लावण्यांसंबंधी विशेष उल्लेख नाही.

सदर बाडाचा आकार ६" – ४½" असून अक्षर बाळबोध आहे. सबंध बाड एकाच हस्ताक्षरात पाठोपाठ लिहिलेले असून अक्षर चांगले वळणदार आहे. प्रत्येक पृष्ठावर साधारणपणे तेरा ओळी लिहिलेल्या आहेत. बाडासाठी वापरलेला कागद परदेशी असून त्यावर उदकचिन्ह आहे. अक्षराच्या मोडणीवरून व भाषेवरून लेखनकाळ अठराव्या शतकाच्या अखेरीस किंवा एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी असावा असे दिसते.

कै. राजवाडे यांच्या लेखावरून सदर बाड जोतिरामाचे असावे असा समज होणे शक्य आहे. परंतु वस्तुस्थिती लक्षात घेता ते संपूर्णपणे जोतिरामाच्या लिखाणाचे नाही. या बाडामध्ये ७ ते १४ लावण्या जोतिरामाच्या आहेत. त्या संपादून आधीच प्रसिद्ध केल्या आहेत. लावणी क्रमांक १५–१६ शंभुराजाची व लावणी क्रमांक १७ ही रामा शिंपी याची आहे. त्यातील शंभुराज हा जोतिरामाचा पुत्र असून रामा शिंपी हा शिष्य आहे. तेव्हा जोतिराम, शंभुराज व रामा शिंपी यांच्या रचनांचा एकत्र संग्रह

म्हणजे वाड होय याची नोंद घ्यायला हवी.

जोतिराम आपल्या लावण्यांच्या अखेरीस माणकोजी बोधल्याचा आपला ' गुरु ' म्हणून उल्लेख करतो. लावणी क्रमांक ११ मध्ये " करि घेउनि पादुका स्वामिच्या सन्निध सेवेला " असे तो म्हणतो. शके १७७३ मध्ये शिवरामात्मजाने लिहिलेले " बोधलीलांबरी " नावाचे माणकोजी बोधल्याचे ओवीबद्ध हस्तलिखित चरित्र उपलब्ध आहे. त्यात पंचवीस अध्याय असून ५२४६ ओव्या आहेत. त्यात धर्मदास, भजलिंग-बाबा, लाडी यांसारख्या प्रमुख शिष्यांची नावे सापडतात. अर्थात हे चरित्र महिपतीकृत संतचरित्रांच्या आधारे लिहिले आहे, याची कबुली शिवरामात्मजाने दिली आहे. माणकोजी बोधल्याचा समाधी काळ ३१ मे १६९४ असा आहे. यावरून जोतिराम सतराव्या शतकाच्या अखेरीस किंवा अठराव्या शतकाच्या आरंभी होऊन गेला असावा. त्याच्या उपलब्ध असलेल्या सर्व रचनेत ' बोधले ' याचा ' गुरु ' म्हणूनच उल्लेख येतो. जोतिरामाच्या लावण्या गुरुस्तुतीपर आणि अध्यात्मपर आहेत. प्रस्तुत प्रकाशित होणारे बोधराजाख्यान व कीर्ती व अष्टक ही रचना याच स्वरूपाची आहे.

बोधराजाख्यान : यात माणकोजी बोधले याच्या जीवनातील अकरा घटना छोटया छोटया अकरा (प्रकरणात) आख्यानांत सांगितलेल्या आहेत. एकूण ओवीसंख्या ३४४ इतकी आहे. हे माणकोजी बोधले याचे ऐतिहासिक चरित्र नव्हे. कदाचित कीर्तनात उत्तररंगासाठी रचलेली बोधपर, भाविक, नीतीपर कथानके आहेत. बहुधा ही एकतारीवर गायिली जात असावीत. पहिल्या आख्यानात विठ्ठल रुक्मिणीने पंढरपूर क्षेत्री ब्राह्मण रूपाने बोधल्याबरोबर सहभोजन केल्याची कथा येते. दुसऱ्या आख्यानात धनवंत असूनही दयावंत नसलेल्याची काय कथा होते ते पांडुरंगाने बोधल्यास प्रत्यक्ष दाखविल्याचे जोतिराम सांगतो. तिसऱ्यात ओस रानात वृक्षफळांनी बहरलेला मळा निर्माण करून पांडुरंगाने बोधल्याला व इतर यात्रेकरूंना आपले मायाजाल दाखविल्याचे निवेदन येते. " पांडुरंग भक्ता अर्पिलिया अन्न । देतो लक्ष गुणे तया लागी " ही बोधल्याची भावना व प्रत्यक्ष आचरण सांगण्यासाठी त्यांनी उदारपणे वाटलेला ज्वारीचा हुरडा आणि थोटया ताटास, पाच सात कणसांचा आलेला बहर ही कथा चवथ्यात येते. विठ्ठल भक्ताचा सहाय्यकारी कसा होतो ही परंपरेने आलेली कथा— विठनाक महाराच्या वेशात येऊन बोधल्याचा कर सरकार दरबारात भरल्याचा कथाभाग पाचव्या आख्यानात येतो—तर सहाव्यात " हासी " कुणबीण बोधल्यावर भक्ती ठेवून असते. ती दासी असल्यामुळे तिचे मालक तिला विकायला काढतात— तिची सोडवणूक विठ्ठल करतो. म्हणजे भक्तांच्या कठीण प्रसंगी त्यांना सहाय्यकारी होणे ही परमेश्वरी कृपा या कथाभागात येते. सातव्यात सर्व संतांच्या बाबत येणारी सर्वसाधारण भाविक श्रद्धाळू कथा येते ती मेलेल्या माणसाला माणकोजी बोधले आपल्या सामर्थ्याने-विठ्ठलकृपेने जिवंत करतो ती कथा. ज्याची आपणावर पूर्ण श्रद्धा आहे असा शिष्य करावा हा नीतीविचार, एका गावच्या महाराला शिष्यत्व दिल्याने कोणती

परिस्थिती निर्माण झाली या कथेच्या आधारे आठव्या आख्यानात निवेदन केलेले आहे. नवव्या आख्यानाची कथावस्तू परंपरेने चालत आलेली दिसते. नामदेव महाराजांच्या गाथेत "कबीराच्या चरित्रात तो आपली पत्नी वाण्याकडे वाण्याचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी रात्री घेऊन जातो" असा कथाभाग येतो. तशा प्रकारे गोसाव्याला आपली सून 'भागीरथी' अर्पण केल्याची कथा इथे येते. हा गोसावी प्रत्यक्ष विठ्ठल असतो आणि तिचे 'शील' शुद्ध रहाते. विठ्ठलाने घेतलेली ती सत्त्वपरीक्षा असते. दहाव्या आख्यानात दुष्काळात शेतात पेरायला 'बी' नाही, 'बी' साठी बोधल्याला कुणी 'कर्जि' देईना म्हणून त्याने भोपळे पेरले. त्यातून गहू, हरभऱ्याचे पीक आले ही अद्भुत कथा येते. अकराव्या आख्यानात अविंधाने गोमांसाहार व मद्य पिण्याची सक्ती बोधल्यावर केली. पण तो परमेश्वराचा भक्त असल्यामुळे त्या गोमांसाची तुळसीची फुले व मद्याचे दूध झाल्याची परंपरागत कथा येते. नामदेव चरित्रातपण ही कथा येते.

ओवीबद्ध असलेली ही आख्यानरचना पंडित कवींच्या आख्यानरचनेहून वेगळी जाणवते. पंडितकवी नळदमयंती आख्यान, हरिश्चंद्राख्यान, श्रीयाळाख्यान अशी महाभारत, रामायण अगर पुराणकथाधारित 'आख्याने' रचताना दिसतात, जोतिराम एका संताचे – लौकिक जीवनात – वावरलेल्या आपल्याच काळातील व्यक्तींच्या चरित्राचे 'आख्यान' गातो आहे. (२) चरित्रात ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ लक्षात घ्यायचा असतो याचे त्याच्या काळानुसार त्याला भान नाही म्हणा किंवा 'माणकोजी' बोधल्याचे ऐहिक, ऐतिहासिक चरित्र गाण्याचा हेतू नसावा, त्यामुळे फारशा ऐतिहासिक तपशिलात तो शिरत नाही. (३) त्याला उत्तररंगासाठी 'बोधकथा' हवी आहे. ती एकतारीवर म्हणण्याच्या दृष्टीने केलेली रचना आहे. ती संतपरंपरेतील स्फुट व दीर्घ रचनेप्रमाणे प्रासादिक ओघवती आहे. कुठल्याही प्रकारचे संस्कृत साहित्याच्या अनुकरणातून आलेले अलंकरण त्याच्या रचनेत नाही (४) पंडित कवीप्रमाणे रसानुकूल वृत्तरचना तो करीत नाही. एकच शांत किंवा भक्तीरस त्याला अभिप्रेत आहे, त्यामुळे रचना एकसुरी आहे. काव्यनिर्मितीच्या लौकिक जाणिवा त्याला नाहीत. गुरुमाहात्म्य गाऊन परमार्थ साधावा व इतरांना त्यात वाटेकरी करून घ्यावे एवढीच मर्यादित अपेक्षा त्याची होती (५) त्याच्या ध्यानी मनी आपला गुरू 'माणकोजी बोधला आहे. आपणाला बोधल्याने कृपाप्रसादे तारावे यासाठी हे गुणगान आहे. ही रचना सर्वसामान्यांसाठी असल्यामुळे सर्वसामान्य लोक 'कथाविनोदे' रमतात हे लक्षात घेऊन त्याने ही रचना केलेली दिसते. (६) आख्यान कवितेच्या पंडिती रचनेतील संस्कृत शब्दांच्या प्रमाणाचा विचार करता याच्या कवितेत संस्कृत शब्द अभावानेच दिसतात.

विठ्ठल "विठनाकाच्या" (महाराच्या) स्वरूपात येणे, गोसाव्याला आपली सून (भागीरथी) देणे, गोमांस व मद्य याचे तुळशीपत्र व दूध यांत रूपांतर होणे, या 'कथांचे बीज' लोकजीवनातील कथातून आणि लोकसाहित्यातून आलेले असणे शक्य

आहे. परमेश्वराच्या ठिकाणी उच्चनीचता नाही. भक्ती जातीभेदातीत असून तिथे जाती 'अप्रमाण' या विचारकल्पनेतून व सर्वसामान्य लोकजीवनातील संदर्भ लक्षात घेऊन हे 'कथाबीज' आले असावे. (२) नामदेव गाथ्यातील 'कबीर' चरित्राच्या कथेशी 'बीजरूपाने' साम्य असलेली 'कथा' स्त्रीपातिव्रत्याची महती सांगणारी आहे. तसेच लोकजीवनातील 'नीतिविचार' स्पष्ट करणारी आहे. हा 'कथाबंध' रामायणातून आला, मुसलमानी संस्कृतीतून आला की जगात तो सर्वत्र असाच आहे याचा शोध घेणे बोधपर ठरेल. 'गोमांस व मद्य' यासंबंधीचे आख्यान हे उघड उघड यावनी सत्ता, धर्म यातून झालेल्या प्रतिक्रियेचे चित्र आहे. हिंदूंना जे निषिद्ध ते राजसत्तेने करायला सांगितले तरी संत त्यावरही मात करतात (आध्यात्मिकरीत्या) हे सिद्ध करण्याची ही वृत्ती इथे वास्तव वा तर्कदृष्टी नाही. ही भाविकांची श्रद्धा आहे.

'जोतिराम' हा माणकोजी बोधल्याचा निकटवर्ती शिष्य असावा असे वरती अनुमान केले आहे. त्यावरून महीपतीबुवा ताहराबादकर आणि त्यांचे संतचरित्रपर लिखाण या आधीची 'जोतिरामची' ही रचना असावी. 'बोधलीलांबरी'कार शिवरामात्मज महीपतीचा ऋणनिर्देश करतो आणि तिचा रचनाकाल शके १७७३ (इ. स. १८५१) असल्याचे स्पष्ट आहे.

बोधराजर्षी अष्टक व बोधराजकीर्ती – या दोनही रचना करण्यामागे जोतिरामाचा हेतू "आपल्या गुरूचे स्तवन करण्यासाठी सुटसुटीत रचना करणे" असा असावा. बोधराजाख्यान नाही म्हटले तरी काहीसे दीर्घ आहे. त्या मानाने 'अष्टक' आठ कडव्यांचे अधिक नववे 'आत्मबोध' सांगणारे इतकेच. बोधराजकीर्ती-तेरा कडव्यांची. या दोन्ही रचना संस्कृतातील स्तोत्र किंवा लोकसाहित्यातील 'पवाड' रचनेची परंपरा दाखविणाऱ्या आहेत. "आर्या" वृत्ताचा वापर जोतिरामाने समर्थपणे केलेला दिसतो. 'अष्टका' मध्ये सद्गुरूने कृपाप्रसादे मुक्ति नको भक्ति, सुमती सत्संगाला द्यावे ही प्रार्थना आहे. जोतिरामाने 'अष्टकाची' फलश्रुती सांगताना म्हटले आहे "अष्टकध्याता सद्गुरूचे पद जोडती ।। संशय नाही करुनि पहावी हे भक्ति ।।"

"श्री बोधराज" कीर्ती या रचनेत बोधल्याच्या जीवनातील विविध घटनांचा गौरवोल्लेख भक्तीभावे केलेला आहे. "बोधराज महाराज छत्रपति गरीबनवाज (कनवाळू) धणी असून त्याच्या चरित्राने तुमची मने प्रसन्न होतील" अशी ग्वाही तो देतो. कदाचित या दोनही रचना कीर्तनाच्या अखेरीस गाण्यासाठी वापरल्या जात असाव्यात असे "पाय नमूनि विनंती मम हे कीर्तन रंग अपार करा" या बोधराज – कीर्तीतील निवेदनावरून वाटते.

जोतिरामाची लावणी रचना या आधी संपादून प्रसिद्ध केल्याचा मागे उल्लेख केला आहे. त्याच्या इतर रचनांचा उल्लेख पूर्वी कसा झाला हे स्पष्ट केले आहे. त्याच्या या रचना संपादून प्रथमच प्रकाशात येत आहेत. संतपरंपरेतील एक शिवकालीन शाहीर व 'आख्यानकर्ता' या दृष्टीने मराठी वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकास या

कामाने काही सहाय्य व्हावे ही नम्र अपेक्षा.

॥ श्री बोधराजाख्यान ॥ (पहिले)

श्री बोधराजाय नमः। सद्‌गुरु अवतार जन तारावयाला ॥
बोधराज जाला धामणगावी ॥ १ ॥
नाम माणकोजी पाटिलकी वतन।
ग्रही,[1] धनधान्य गाइ म्हैशी ॥ २ ॥
कांता ममताइं यमाजी नंदन।
भागीरथी सुन तया लागी ॥ ३ ॥
चवघे येकचित करिति संसार।
वाचे निरंतर पांडुरंग ॥ ४ ॥
पंढरा[2] दिवसी पंढरीची वारी।
हरिदिनी करी जागरण ॥ ५ ॥
द्वादसी दिवसी द्विज संतर्पण।
धनधान्य प्रावर्ण वोपी दिना ॥ ६ ॥
त्रयोदसी दिन धामण – गावा जावे।
स्वकर्म करात्रे कृषि कृत्य ॥ ७ ॥
अैसा नेम तिन वर्षे चालवितां।
दुःकाळ आवचिता पडलासे ॥ ८ ॥
ममतेसि सांगे बोधराज स्वामी।
अन्न घाला तुह्मी अन्नार्थिया ॥ ९ ॥
देशातिल जन दुर्बल भिक्षुक।
येति बहुतेक अन्नालागी ॥ १० ॥
धान्य सरतां वस्त्रे भुषणे मोडुन।
घालताती अन्न मागति या ॥ ११ ॥
अैसे चालविता संपदा सरली।
गोरुपे[3] वाटिली तृणाविणे ॥ १२ ॥
मजुरी करुनी कुटुंबा रक्षावे।
त्यातही पाळावे अनाथासी ॥ १३ ॥
पंढरी जावया निघाला ते वेळे।
तिरुका[4] जवळ नाही जाला ॥ १४ ॥
फाटके चवाले[5] डोइला चिंदोटी।
कुठार सह काठी घेतलिसे ॥ १५ ॥

मार्गि जाता मुखें वदे रामकृष्ण ।
भासे जनवन पांडुरंग ॥ १६ ॥
काष्टे तोडुनिया मस्तकी घेतली ।
पंढरिसी नेली विकावया ॥ १७ ॥
ति पैशा देउनी चंद्रभागे स्नान ।
करिता पैसा दान दिला द्विजा ॥ १८ ॥
खार्का माळाबुका पैशात घेउन ।
केलें समर्पण पांडुरंगा ॥ १९ ॥
तिरुक्याचे पिट घेउनिया वोटी ।
बैसे वाळुवंटी द्वादसिसी ॥ २० ॥
ब्राह्मणा अर्पण करावे म्हणुन ।
करित भजन विठलाचे ॥ २१ ॥
सर्वसाक्षी पांडुरंग तेथ आला ।
द्विजरुप जाला बद्ध बहु ॥ २२ ॥
आसिर्वाद म्हणे माणकु पाटिला ।
काही अन्न मला द्यावे आजी ॥ २३ ॥
येरे पिट तया घातले पदरी ।
तो म्हणे भाकरी करु यथ[६] ॥ २४ ॥
श्रुभा[७] वेचुनिया आणि बोधराज ।
त्रै-लोक्य महाराज पिट मळी ॥ २५ ॥
रुक्माबाइ लागीं समजलें मनी ।
ते आली धावोनी तया ठाया ॥ २६ ॥
कुंकुम गळसरी विरोधा[८] जोडवी ।
म्हणे भट गोसावी आला येथ ॥ २७ ॥
बोधला यजमान पाहुनिया भोळा ।
गिळु म्हणता गोळामी ना सोडी ॥ २८ ॥
विमानी बैसोनी विबुध[९] हासती ।
भाविका श्रीपती साहे सदा ॥ २९ ॥
रुक्माबाई म्हणे उठा भटजी तुम्ही ।
स्वयंपाक आम्ही करितसो ॥ ३० ॥
बोधराज ह्मणे पिट अर्धसेर ।
कैसे नि हे पुरे दोघा जणा ॥ ३१ ॥
विश्वाची जननो भाकरी करित ॥
आली बरकत[१०] पिटालागी ॥ ३२ ॥

पात्रें केली तिन म्हणताति बोधल्या ।
उठा जेवायाला तुह्मी आता ॥ ३३ ॥
तुमचे उचिष्ट[11] सेवटी सेविन ।
ह्मणतां सुवासिन ब्राह्मण बैसे ॥ ३४ ॥
नाही भाजी डाळ मिठाचा दुष्काळ ।
तुकडे पुष्कळ भक्षिताती ॥ ३५ ॥
जेउनि उठता न सरती भाकरी ।
बोधराज करी प्रसाद तो ॥ ३६ ॥
मागे पुढें पाहातां गुप्त जाली दोघे ।
ह्मणे पांडुरंग आला होता ॥ ३७ ॥
आचवोनि गेला देउळा लगबगा ।
ह्मणे पांडुरंगा कृपा केली ॥ ३८ ॥
भक्षिल्या भाकरी अनाथाच्या नाथा ।
रुक्मिणिच्या कांता आळंगिले ॥ ३९ ॥
धामणगावासी निघाला पुसोनि ।
जोतिराम मनीं ध्यातो तया ॥ ४० ॥
इति श्री बोधराजाख्यान संपूर्णमस्तु शुभंभवतु ॥ छ ॥

---

(१) गृही (२) पंधरा (३) गुरे (४) नाणेविशेष (५) वस्त्रविशेष (६) येथें (७) शेणी, गोवऱ्या (८) विरवदी-स्त्रियांच्या पायांच्या बोटातील चांदीचा दागिना (९) देव (१०) भरभराट (११) उष्टे

श्री बोधराजाख्यान (दुसरें)

॥ सद्गुरु बोधराजायनमः ॥
बोधल्याचि वारी पंधरा दिसाची ।
हरी-दिनी[1] त्याची पंढरीसी ॥ १ ॥
दरिद्र पातल्या नेमांत[2] न सोडी ।
किर्त्तन आवडी करीतसे ॥ २ ॥
येक हरिदिनी बोधला पंढरी ।
नाम-घोष करी जागरण ॥ ३ ॥
भाकरीचे पीठ घेउनिया वोटी ।
बैसे वाळुवंटी द्वादसिसी ॥ ४ ॥
विठ्ठलरुक्माई आली विप्रवेशे ।
पीठ दिल्हे त्यास बोधराज[3] ॥ ५ ॥

करोनिया भाकरी उठलि जेउन।
प्रसाद सेउन बोधराज ॥ ६ ॥
उठल्या भाकरी अनार्थिया देइ।
विठल रुक्माई गुप्त जाली ॥ ७ ॥
बोधराजा मनी समजली खुण।
तो जाय धाउन देउळासी ॥ ८ ॥
पांडुरंगे कृपा केली मजवरी।
करोनि भाकरी भक्षियेल्या ॥ ९ ॥
वाढिता मिष्टान्न न घेसी येराचे।
पिट बोधल्याचें अवडलें ॥ १० ॥
पांडुरंग ह्मणे बोधराज ऐक।
दुर्बल भाविक आवडतो ॥ ११ ॥
धनवंतामाजी दयावंत थोडे।
पाहातोसि कोडें बोधराजा ॥ १२ ॥
पांडुरंग तया धरी मणगटी।
आले वाळुवंटी दोघे जणे ॥ १३ ॥
सावकारे येका समाराधनेसी।
सहस्त्र द्विजासी नेमी सांगे ॥ १४ ॥
मंडपा बाहेरी कनाता चिरोन।
आणिले ब्राह्मण पात्रे केली ॥ १५ ॥
पांडुरंग वृद्ध द्विजरुपें गेला।
कौतुक बोधला पाहातसे ॥ १६ ॥
हा हो आगांतुक काशा सहस्त्रागळा।
पात्रावरून त्याला उठविती ॥ १७ ॥
हातपाय सेंडी धरुनि दुर्जन।
दिल्हे झुगारून चौघाजणी ॥ १८ ॥
वाढोनिया तुप संकल्प सोडिला।
द्विज जेवायाला बैसलेती ॥ १९ ॥
पांडुरंग बोधराजापासी गेले।
अरिष्ट निर्मिले तये क्षणी ॥ २० ॥
प्रभंज तेव्हा सुटला अपार।
धुळिनें अंबर कोंदाटले ॥ २१ ॥
मंडप कनाता[४] पात्रे ही उडाली।
मृतिका भरली अन्नामाजी ॥ २२ ॥

अतृप्त ब्राह्मण सकळ पळाले ।
कौतुक दाविलें बोधल्यासि ।। २३ ।।
मिष्टान्नाची गती देखिली बोधल्या ।
तुझे पीट मला आवडत ।। २४ ।।
आज पासोनिया तुह्मी यकादसी ।
धामणगावासी करितसा ।। २५ ।।
बोधराजमनी आनंद वाटला ।।
पुसोनी निघाला गावा लागी ।। २६ ।।
धामणगावासि आले बोधराज ।।
ह्मणे तारी मज **जोतिराम** ।। २७ ।।
इति श्री बोधराजाख्यान संपूर्णमस्तु ।।
श्रुभंभवतु ।। छ । छ । छ ।

---

(१) एकादशी दिवशी. (२) नेमाते – नियमाळा. (३) बोधराजे (४) तंबू किंवा डेरा यांची कापडी भिंत.

बोधराजाख्यान (तिसरे)

।। श्री सद्‌गुरु बोधराजाय नमः ।।
धामणगाविचा सद्‌गुरु बोधला ।
जगताप त्याला उपनाम ।। १ ।।
पंढरिची वारी धरियेला नेम ।
किर्त्तन सप्रेमे करितसे ।। २ ।।
हरिदिनी येकें पंढरिसी गेले ।
जागरण केले नामघोषें ।। ३ ।।
द्वादसी भोजन द्विजासी घातलें ।
पुसोनि निघाले त्रयोदसी ।। ४ ।।
मार्गि जाता वन वोस मागे पुढे ।
क्षुधा त्रशा[1] गाढ लागलिसे ।। ५ ।।
पांडुरंगे मेळा निर्मिला रसाळ ।
केळे सिताफळें द्राक्षे युक्षः (?) ।। ६ ।।
धरोनिया मोट पाणी फिरवित ।
मळा टवटवित च्यारी कोन ।। ७ ।।
न जाय मळ्यात सितोह्ल (?) समान ।
तो आली माळीण रुक्माबाई ।। ८ ।।

भाकरीची पाटी हाती ताक लोटी[२] ।
धरी मनगटी बोधराजा ॥ ९ ॥
पंढरीचे वारकरी तुह्मी संत ।
माळी मळियात बोलावितो ॥ १० ॥
बैलात होकरी[३] चाबुक खांद्यावरी ।
या हो वारकरी ह्मणतसे ॥ ११ ॥
मळयांत जाउनि उदक सेविलें ।
भक्षी कंदमुळें केळे फळें ॥ १२ ॥
तेथुनि निघाला माघारें न्याहळी ॥
नाही मळा माळी माळिण तें ॥ १३ ॥
पांडुरंगे माव[४] केली मजसाठी ।
समजले पोटी बोधराजा ॥ १४ ॥
धामण गावासी बोधराजा आला ।
सेवा मागे त्याला **जोतिराम** ॥ १५ ॥
इति श्री बोधराजाख्यान संपूर्णमस्तु
श्रुभंभवतु ॥ छ ॥

(१) भूक तहान. (२) ताक लोटी. (३) 'हो 'कार घाली, हाका मारी. (४) माया निर्माण केली.

बोधराजाख्यान (चवथे)

॥ श्री सद्गुरु बोधराजाय नमः ॥

पतीत ताराया अवतार जगीं ।
धन्य राजयोगी बोधराज ॥ १ ॥
यके दिनी सेता बोधराज गेला ।
बैसोनिया माळा पक्षि हाकी ॥ २ ॥
पाषाण घालुनी गोफण फेरिता[१] ।
भुतदया चित्ता उपजली ॥ ३ ॥
पक्षी वनचर जंगमस्थावर ।
रुक्मिणिचा वर × × कोणा ॥ ४ ॥
टाकोनि गोफण × × भजन ।
तो आणि जेवण ममताई ॥ ५ ॥
यता[२]-जाता लोक कणसे नेताती ।
तया न वारिती बोधराज ॥ ६ ॥

कांता ह्मणे स्वामी केले जरि ऐसे ।
दिवाण साऱ्यास वारि कोण ।। ७ ।।
उरी द्याल कणसे स्व-हाते काढून ।
विठोबाची आण तुह्मा लागीं ।। ८ ।।
भोजन घालोनी स्वामि बोधल्याला ।
पातलि घराला ममताई ।। ९ ।।
पंढरिची यात्रा आली तया वाटे ।
स्मरताति नेटे पांडुरंग ।। १० ।।
बोधराज तया नमस्कारि वेगे ।
ह्मणे पांडुरंग भेटलासे ।। ११ ।।
ह्मणती यात्रकरी[3] कणस द्या हो आह्मा ।
पांडुरंग तुह्मा कृपा करी ।। १२ ।।
येरु ह्मणे आन[4] कांतेन घातली ।
तुह्मीच घेतली पाहिजेसें[5] ।। १३ ।।
यक वेळें यात्रा सिरली सेतांत ।
कणसें समस्त मोडियेली ।। १४ ।।
यात्रा गेल्या सेती बैसोनि बोधला ।
ह्मणे श्री विठ्ठला कृपा केली ।। १५ ।।
गावी जमेदारा[6] कळला वृत्तांत ।
बोधल्याने सेत लुटविलें ।। १६ ।।
यमाजी[7] नंदन सेतासि पातला ।
तो देखे बोधला नाम स्मरे ।। १७ ।।
बैसता जवळी सांगे बोधराज ।
आईकावे गुज धर्मराया ।। १८ ।।
पांडुरंगभक्ता अर्पिलिया अन्न ।
देतो लक्षगुणे[8] तयालागी ।। १९ ।।
यमाजि विनवी स्वामि भले केले ।
मनोरथ जाले पुर्ण माझे ।। २० ।।
मिळोनिया दोघे पातले घरासी ।
आनंद कांतेसी सुनेसि ही ।। २१ ।।
दुजे दिनी थोटी ताटे आणायासी ।
पातलि सेतासी चौघेजणे ।। २२ ।।
पाचसात कणसे येकेका ताटाला ।
देखोनि बोधला नाचे प्रेमे ।। २३ ।।

यत[9]–जात्या लोका भागीरथी सांगे।
बहुताच्या भाग्ये पीक आले ॥ २४ ॥
मळणि घालिता गावातिले[10] लोक।
आले सकळिक पाहावया ॥ २५ ॥
अनाथासी धान्य देती वाहाती वाटा।
चौघी चार मोटा घरा नेल्या ॥ २६ ॥
भजन करिती आनंदे चवघे।
जोतिराम मागे सेवा त्याची ॥ २७ ॥
इति श्री बोधराजाख्यान संपूर्णमस्तु।
श्रुभंभवतु ॥ छ। छ।

(१) गरगर फिरवणे. (२) येता. (३) यात्रेकरी. (४) आण, शपथ (५) पाहिजे तर (६) जमादारा. (७) माणकोजी बोधल्याचा मुलगा **यमाजी.** (८) अनेक पटीनी. (९) येत्याजात्या. (१०) गावातले.

॥ श्री बोधराजाख्यान ॥ (पाचवे)

श्री सद्गुरु बोधराजाय नमः ॥
धामणगाविचा सद्गुरु बोधला।
पांडुरंग त्याला मागे पुढें ॥ १ ॥
उघड समाधी भजनि असावें।
स्वकर्म करावें कृषिकृत्य ॥ २ ॥
येक दिनी पट्टी[1] मांडिली गावांत।
बोधल्यासि सात होन लिहिले ॥ ३ ॥
लोक ह्मणे सेत यानं[2] वाटिलें।
कोटोनि[3] देईल द्रव्य आता ॥ ४ ॥
यके ह्मणे त्याचा सखा पांडुरंग।
पडो नेद वेंग[4] रतिभार ॥ ५ ॥
यक ह्मणति ती तो दिवाळखोर।
लावा हुलदार[5] पाटिमागे ॥ ६ ॥
घेउनिया रोखा गेला हुलदार।
दिसाचा करार केला दुज्या ॥ ७ ॥
नागाइ[6] नावाची करी सावकारी।
गेले तिचे घरी बोधराज ॥ ८ ॥

सांगे तिसी चार होन द्या आह्मासी।
व्याज तुह्मापासी आधि ठेवा ॥ ९ ॥
दुजे दिनी द्यावे ऐसा नेम केला।
घरासी पातला बोधराज ॥ १० ॥
प्रातःकाळी नागाइसी हे कळलें॥
सेत वाटियलें बोधल्याने ॥ ११ ॥
विचारिलें मनी गाविचा पाटिल।
होन बुडतिल दरिद्रि हा ॥ १२ ॥
बोधराज तिसी मागावया गेला।
नाही ह्मणे त्याला नागाइने ॥ १३ ॥
दुज्याच्या भर्वशा तुह्मा सांगितलें।
नाही ह्मणितलें त्याहि आतां ॥ १४ ॥
बोधराज तेव्हा फिरला मागुता।
करी मनी चिंता होय कैसे ॥ १५ ॥
राळेरासी होन आणावया गेला।
हुलदार आला मागावया ॥ १६ ॥
पांडुरंग सांगे रुक्माइ कारणे।
सेत बोधल्यानं वाटियेले ॥ १७ ॥
सारियाची तस्ती[७] तयासी लाविली।
रसद गुदरिली पाहिजे ते ॥ १८ ॥
पांडुरंग जाला गाविचा विठनाक।
ज्वाहार सकळिक आइकावें ॥ १९ ॥
पाटलानी होन पाटविले सात।
घेउनी हुजत[८] (?) द्यावी आम्हा ॥ २० ॥
हासती सकळ बोधल्यासि होन।
आले हे कोटून न कळेची ॥ २१ ॥
पावतिची चिटी लिहुन दिधली।
त्याही गुदरिली ममतेसी ॥ २२ ॥
बोधल्यान होन आणिलें सावकारी।
बोभाट तिळभरी गांवी नाही ॥ २३ ॥
चावडिस होन चार गुदरिले।
पेव सापडले म्हणताती ॥ २४ ॥
गाविच्या ह्मारानं देउनिया होन।
हुजत घेऊन गेला काली ॥ २५ ॥

येउनिया पुसे कांतिसी ते बोले।
विठनाके आणिलें हुजतिसी ॥ २६ ॥
आणोनि विठनाक तया विचारिलें।
कसे होन दिल्हे आमुचे त्वा ॥ २७ ॥
माझे घरी नाही भाकरिचे पीट।
होनाचा बोभाट करु नका ॥ २८ ॥
तेव्हा कळलें पांडुरंगे गुदरिलें।
भजन मांडिले कुटुंबानीं ॥ २९ ॥
पितांबरधारी कुंडले वनमाला।
नटला सावळा × × × ॥ ३० ॥
कोठोनिया होन आणोनि दिधलें।
हे नाही कळलें पांडुरंगा ॥ ३१ ॥
घरातिले तिन नागाइचे च्यार।
मि तव चाकर बोधल्याचा ॥ ३२ ॥
नागाइसी देवा काहो नागविलें।
होन आणिल्याले[९] देतो तिसी ॥ ३३ ॥
देसी जरी होन तरी चलवितो।
नेदि मीसाची गोष्टी कळो ॥ ३४ ॥
देउनिया भेटी अद्रक्ष्य[१०] तो जाला।
स्मरे बोधला **जोतिराम** ॥ ३५ ॥
इति श्री बोधराजाख्यान ॥ छ ॥

---

(१) कर (२) याने (३) कोठोनि (४) व्यंग, त्रुटी (५) हवालदार (६) गावची धनिक स्त्री (७) तसदी, निकड (८) रुजुवात, कबुली, सत्यता (९) आणलेले (१०) अदृश्य.

श्री बोधराजाख्यान (सहावे)

श्री सद्गुरु बोधराजाय नमः।
बोधराजस्वामी धामणगावांत।
तारिले पतित बहुतेक ॥ १ ॥
गावातिले लोक ह्मणती सकळ।
बोधला केवळ पांडुरंग ॥ २ ॥
मातुल पाटिल राळेरासी त्याचे।
बंधु ममतेचे दोघे जणें ॥ ३ ॥

त्याचे याचे सेत सेजारासी होतं ।
बोधराज तेथ नाम स्मरें ॥ ४ ॥
त्याची कुणबिण हासी[1] येइ तेथ ।
श्रवण करित वारंवार ॥ ५ ॥
तराया उपाय तिणे विचारिला ।
तो म्हणे विठला भजा तुम्ही ॥ ६ ॥
यकादसी यावे धामणगावासी ।
द्वादसी घरासी जावें तुह्मी ॥ ७ ॥
तोचि नेम तिणें धरिला अंतरी ।
यकादसी वारी करितसे ॥ ८ ॥
लोट झाड सडा पाणिही आणावें ।
द्वादसिसी जावें राळेरासी ॥ ९ ॥
भोवर[2] गाविचे यताति किर्त्तना ।
तारिल हा जना ह्मणताती ॥ १० ॥
हासी कुणबिण तिचा द्रढभाव ।
सेवा कृत्या हाव धरितसे ॥ ११ ॥
मुखी नाम काम धरातिले करी ।
तिन वर्षें वरी जाले अैसें ॥ १२ ॥
राळेरासकर पाटिल विभक्त ।
होता, हासी तेथ विकु म्हणती ॥ १३ ॥
हासी येउनियां सांगे बोधल्यासी ।
मज विकायास काढियलें ॥ १४ ॥
अंतरले पाय ह्मणें रडे तसें ।
पांडुरंगा कैसे केलें तुवा ॥ १५ ॥
ममतेसी सांगे चरणी लोळत ।
ह्मणे घ्या विकत मजलागी ॥ १६ ॥
यकादसी वारी राहिल जेधवा ।
प्राण हा तेधवा न राहे जी ॥ १७ ॥
ममता पतिवृता सांगे बोधल्यासी ।
भावार्थाची रासी हासी दासी ॥ १८ ॥
न पाहाता तुह्मा देइल तें प्राण ।
घ्यावी तरी धन नाही हाती ॥ १९ ॥
विकोनि वतन द्यावे भावा धन ।
हासी कुणबिण घ्यावी स्वामी ॥ २० ॥

हर्षे बोधराजे गेले राळेरासी ।
म्हणे सोयऱ्यासी हासी द्या हो ॥ २१ ॥
सांगाल ते द्रव्य देउनि तुम्हासी ।
हासी भक्तिनिसी नेहु आम्ही ॥ २२ ॥
त्याही विचारिलें आपुलें मनुष्य ।
कदा सोयऱ्यास देउ नये ॥ २३ ॥
हासी तळमळ करी तये वेळें ।
बोधला कृपाळ म्हणे तये ॥ २४ ॥
पांडुरंग तुज येवोनि नेइल ।
म्हणोनी चालिले धामणगावा ॥ २५ ॥
तये वेळें आलें ग्राहिक दुरुन ।
पंचविस होन दिल्हे त्यासी ॥ २६ ॥
खत खरेदिचे दिधलें लेहुन ।
हासी कुणबिण आक्रंदळी ॥ २७ ॥
धाव पांडुरंगा जाहाली निराशा ।
मज दुरी देशा नेती आता ॥ २८ ॥
पांडुरंग आला द्विजरुपे तेथ ।
हासिला स्वहातें धरियलें ॥ २९ ॥
बोधराज तुज बोलावितो तेथ ।
म्हणोनिया गुप्त जाली दोघें ॥ ३० ॥
तिची × × तिसी वैकुंठासी नेलें ।
दासासी विठ्ठल सांभाळिता ॥ ३१ ॥
गावातिले लोक खवंद (?) ग्राहिक ।
पाहाती कौतुक सकळहि ॥ ३२ ॥
ग्राहिक तो म्हणे द्या आमुचे होन ।
तुझी कुणबिण येथं गुप्त ॥ ३३ ॥
बोधल्याचे नांव सांगितलें द्विजें ।
होन माग तुझें तया पासी ॥ ३४ ॥
बोधराज पूर्वी हासी मागितली ।
ते वार्ता कळली ग्राहिकासी ॥ ३५ ॥
बोधराज जातां हासिसी बोलला ।
पांडुरंग तुला नेइल हे ॥ ३६ ॥
तयाकडे वाद आमुचा तो नाही ।
होन ये समइ घेउ तुह्मा ॥ ३७ ॥

ऐसा वाद आहे अद्यापी तिवासी।
साक्ष राळेरासी धामणगावा ॥ ३८ ॥
हासी वैकुंठासी नेली बोधल्यान।
जोतिराम ह्मणे तारी आह्मा ॥ ३९ ॥
॥ इति श्री बोधराजाख्यानं ॥ ॥ छ। छ। छ॥

(१) माणकोजीं बोधले याची शिष्या. (२) आसपासचे.

श्री बोधराज आख्यान (सातवे)

॥ श्री सद्गुरु बोधराजाय नमः॥
बोधल्यान जन बहु बोधिले।
लोक देशातिले येती जाती ॥ १ ॥
सकळ ते जन आनंद पावले।
निंदक पडले संशयात ॥ २ ॥
राळेरासिकर मिळोनि कुटिल।
बोधला प्रेमळ पाहु ह्मणती ॥ ३ ॥
निंदकाचा मेळा निंदित चालिला।
सर्पदंश जाला येकालागी ॥ ४ ॥
दाटुनिया झेंडु पडले[1] शरीर।
जीव येमपुर प्रवेशला ॥ ५ ॥
जेउनि तया बैसवा किर्तना।
जालें वृत कोणा सांगु नका ॥ ६ ॥
नामाचा महिमा वर्णितो उदंड।
तो आजी पाषा (?) करु चला ॥ ७ ॥
नेमुनिया ऐसे किर्तनासि आलें।
श्रवणी बैसलें शव पुढें ॥ ८ ॥
टाळी नामघोष गर्जती सकळ।
नाही चळवळ प्रेता आंगी ॥ ९ ॥
सेजारी ह्मणती हा ग्रहस्त कां मौन।
टाळीनाम स्मरण न करिची ॥ १० ॥
बोधराज तया विजवी (?) शवात।
तुह्मी कां निवांत बैसला हो ॥ ११ ॥
बोधराज ह्मणे स्वामी पांडुरंगा।
किर्त्तनिच्या रंगा भंगविसी ॥ १२ ॥

मेलिया किर्त्तनी निमित्य आह्मासी ।
तुझिया त्रिदासी बोल लागे ॥ १३ ॥
पांडुरंगे यमधर्म आज्ञापिला ।
शरिरी फिरला जिव तेव्हा ॥ १४ ॥
पिटोनिया टाळी गर्जे नाम स्मरणी ।
विठल ह्मणोनी सकळिक ॥ १५ ॥
विठल वाजवी बोधल्याचा टाळ ।
देखती प्रेमळ साधु तेथ ॥ १६ ॥
विमानी गर्जती विबुध अंबरी ।
पुष्पे जयकारी वर्षताती ॥ १७ ॥
उठविले प्रेत प्रगटली मात ।
जोतिराम गात गुण त्याचे ॥ १८ ॥
इति श्री बोधराजाख्यान सप्तमं ॥

शुभंभवतु ॥ छ । छ । छ ॥

---

(१) झेंडू फुटणे-झेंडू पडणे = जहरी साप चावल्यावर तोंडातून येणारा फेस.

बोधराजाख्यान (आठवें)

॥ श्री सद्गुरु बोधराजाय नमः ॥

विश्वाचा उद्धार केला बोधल्यान ।
बोधियले जन नाम घोषे ॥ १ ॥
येके दिनी ह्मार धामणगाविचा ।
शिष्य बोधल्याचा व्हावे ह्मणे ॥ २ ॥
येउनिया नित्य विनविती बोधल्याला ।
ह्मणे शिष्य मला करा स्वामी ॥ ३ ॥
बोधराज ह्मणे पांडुरंगा ऐक ।
शिष्य अनामिक होउ ह्मणें ॥ ४ ॥
पांडुरंग ह्मणे अविस्वोसीतय (!)[१] ।
शिष्य बोधराया करु नये ॥ ५ ॥
याचा परिचय तुम्ही जरी पाहाल ।
तरी मारा बैल बस्त[२] ह्मणा ॥ ६ ॥
हिंसा दोष नाही आणि आणा रिस[३] ।
शिष्याचा विश्वास पाहावया ॥ ७ ॥

दुजे दिनी रासी नेम वकऱ्याचा ।
कापवि बैलाचा गळा ह्मारा ॥ ८ ॥
तृणामाजी शिर ठेविले झाकुन ।
सोइरे सज्जन मेळविलें ॥ ९ ॥
बस्त ह्मणोनिया सजेविले सकळ ।
आपुल्याला गेलें घराप्रति ॥ १० ॥
अनामिका अज्ञा करी बोधराज ।
सांगता हे गुज शिष्य न तु ॥ ११ ॥
दुजे दिनी गेला अंत्यज गावात ।
भाकरी मागत सिरे घरी ॥ १२ ॥
कुणवी ह्मणती कारे मातलासी ।
आह्मास घरसी दुर होइ ॥ १३ ॥
ह्मार ह्मणे मांस बैंलाचे जेविता ।
आह्मां का वाळितां[४] सांगा स्वामी ॥ १४ ॥
ऐसे घरोघरी सांगत फिरता ।
निश्चय समस्ता जाला तोची ॥ १५ ॥
मिळोनि सकळ ह्मणताती ह्मारा ।
मुद्याविण खरा नव्हेसि तु ॥ ४६ ॥
येरु ह्मणे शिर दाविन बैंलाचे ।
तृणामाजि साच लपविले ॥ १७ ॥
सांगाडांगा[५] करी घेउनि या क्रोधी ।
मारु ह्मणति आधी बोधल्यासी ॥ १८ ॥
मिळोनिया आलें बोधल्याच्या घरा ।
ह्मणताति धरा मारा बरा ॥ १९ ॥
कारे ह्मारा पंक्ती बैल जेवविला ।
भोंदु हा बोधला बाटविलें ॥ २० ॥
बोधराज ह्मणे आतां पांडुरंगे ।
निमित्याचा डाग लागतसे ॥ २१ ॥
बोधराज ह्मणे × × × ।
ह्मार म्हणे शिर आणि तो मी ॥ २२ ॥
आणिता ते शिर बोकडाचे जालें ।
अत्यंज ठाकले अधोमुखें ॥ २३ ॥
माणकोजी गोरा कोठे आहे सांग ।
तेथ पांडुरंग बैल जाला ॥ २४ ॥

ह्मणती या ह्मारानं घेतले वाल्ट[6] ।
करा याचे पीट मारुनिया ॥ २५ ॥
बोधराजें तेव्हा ह्मारा सोडविलें ।
विठल बोलिले सकळही ॥ २६ ॥
ह्मणति बोधला कोमल अंतरी ।
सेखी दुराच्यारी वाचविला ॥ २७ ॥
धन्य बोधराजा वंदिताति पाया ।
जग उद्धराया अवतार ॥ २८ ॥
अज्ञानासी बोध करितो ज्ञानाचा ॥
जोतिराम त्याचा दास ह्मणे ॥ २९ ॥
इति श्री बोधे राजाख्यान अष्टम ॥

(१) अविश्वासी तया (?) (१) बोकड (३) अस्वल (४) दूर करता, बाजूला सारता, (५) काठी, दंडुका, (६) आगळिक,

बोधराजाख्यान (नववें)

॥ श्री सद्‌गुरु बोधाराजाय नमः ॥
बोधराज स्वामी सद्‌बोधी[1] निमग्न ।
राजयोगी धन्य समद्रष्टा ॥ १ ॥
समाधिस्त सदा स्वरुपि रहिवास ।
मनन निजध्यास साक्षात्कार ॥ २ ॥
यके दिनी घरा आला पांडुरंग ।
धरोनिया सोंग गोसाव्याचे ॥ ३ ॥
भोपळा निकठी काखे धरी झोळी ।
विभुत[2] चर्चिली सर्वांगासी ॥ ४ ॥
धान्य देता मागे फिरवोनी तया ।
ह्मणे बोधराया मागणे हे ॥ ५ ॥
भागिरथी सुन द्याल जरी आह्मा ।
पांडुरंग तुह्मा कृपा करी ॥ ६ ॥
बोधराज सांगे जाउनि कांतेसी ।
गोसावी सुनेसी भागतोया ॥ ७ ॥
ममताइ ह्मणे सुनेच्या विभागा ।
मज काय सांगा आज्ञा स्वामी ॥ ८ ॥

यमाजि नंदन सेता होता गेला ।
धावत बोधला गेला तेथ ॥ ९ ॥
यमाजी नंदना घरी आला गोसावी ।
भागीरथी व्हावी ह्मणतसें ॥ १० ॥
पुत्र ह्मणे ताता हें कां विचारावें ।
मार्गस्त करावे अतितासी ॥ ११ ॥
येवोनि बोधला ह्मणे भागिरथी ।
पतिवृता सती आहेस तु ॥ १२ ॥
गोसावी तिष्टतो द्वारि तुह्मासाठी ।
ह्मणे आडमुटि (?) आहे × × ॥ १३ ॥
सांगाल वचन ते मज प्रमाण ।
यमाजि नंदन आला तेव्हां ॥ १४ ॥
अतुबाई[3] मामाजी वंदिला भ्रतार ।
पातली बाहिर घरातुनी ॥ १५ ॥
अतितासी[4] सती घाली नमस्कार ।
स्वामी कृपा कर चला ह्मणे ॥ १६ ॥
बोधराज ह्मणे सुने भागिरथी ।
कदापि मागुती येउ नका ॥ १७ ॥
अवस्य ह्मणोनी निघालि ती दोघें ।
पंढरिच्या मार्गे जाती जाली ॥ १८ ॥
पावकोश आलें गावा आलिकडे ।
विठल रूपडे जाला बावा ॥ १९ ॥
बिद्रावली पाइं पितांबर नेसलें ।
वनमाला कुंडले हस्यानजी (?) ॥ २० ॥
भागिरथी आतां फिरोनिया जाय ।
येरी धरी पाय विठोबाचे ॥ २१ ॥
पांडुरंगा धाले तुझिया दर्शन ।
आता परतुन न जाय मी ॥ २२ ॥
तुह्मी आइकिले मामाजि बोलिले ।
म्याहि ह्मणितले नये नाही आतां ॥ २३ ॥
गेल्यावरी आता लावितिल शब्द ।
तु आह्मी प्रसिद्ध जाउ चला ॥ २४ ॥
गावामध्ये निंदा करोनि हासती ।
चळला ह्मणती बोधराज ॥ २५ ॥

बोधल्याचे घरी आनंदात सारी।
काम धाम करी नाम स्मरणें॥ २६॥
आकस्मात आली भागिरथी सुन।
विठल निधान समागमें॥ २७॥
आलींगुनी सर्वा विनवी बोधराजा।
टाळ धरी तुझा जालो आजी॥ २८॥
चिंतितां किर्तनी सन्निध मी आहे।
टाळधरी राहे कैसा सांग॥ २९॥
बोलोनिया गेले विठल पंढरी।
बोधराज करी भजनात॥ ३०॥
लोकासी कळले भागिरथी आली।
घेउनि माउली पांडुरंग॥ ३१॥
धन्य धन्य दुष्ट सज्जन ह्मणती।
तारिल हा क्षिती बोधराज॥ ३२॥
ग्रामस्त येउनी वंदिताती सारे।
जोतिराम स्मरे बोधराज॥ ३३॥
॥ इति श्री बोधराजाख्यान नवमं॥ ९॥ ६॥

---

(१) सदोदी-सदोदित, दररोज. (२) भस्म. (३) सासूबाई-आत्याबाई (४) अतिथीसी;

॥ **श्री बोधराज्याख्यान** ॥ ((दहावें)

॥ श्री सद्गुरु बोधराजाय नमः
बोधराज करी किर्तन गजर।
पातकि अपार तारियले॥ १॥
यके वर्षि अवर्षण पडलेसे।
जाल्या आश्विनास मेघ नाही॥ २॥
स्वातिच्या पर्जन्य अग्रधान्य पेरा।
करिता तिवरा[1] कृषिवल॥ ३॥
सवा मण कर्जी घेउनिया बिज।
गेला बोधराज पेरणीला॥ ४॥
कांतसुत सुन पेरणिसी गेली।
मजुरिणे केली आणिक ही॥ ५॥

चाडयावरी[२] मुट ठेउनि सकळ ।
विठल विठल × × × ॥ ६ ॥
तये वेळे यात्रा पंढरिची आली ।
पाटिलें देखिली नाम स्मरें ॥ ७ ॥
बोधराज आधी वंदुनिया सारी ।
ह्मणति यात्र-करी जेउ घाला ॥ ८ ॥
बोधराज सांगे यमाजिचे कानी ।
निर्जिव मेदिनी पिक देती ॥ ९ ॥
संत हे सजिव यासि देता अन्न ।
न होति उतिर्ण केवि घडें ॥ १० ॥
पुत्रासि आनंद त्याहुनि आगळा ।
मजुरदाराला आज्ञा दिली ॥ ११ ॥
कांता ममताइं भागिरथी पुत्रा ।
धान्यासहित यात्रा घरा नेली ॥ १२ ॥
दळोनिया धान्य पिट दिली पानं ।
भाकरि करुनि भक्षियेल्या ॥ १३ ॥
आसिर्वादानंदे चालिलें गजरें ।
कांता सुन पुत्र नामस्मरणी ॥ १४ ॥
कर्जि[३] धान्य यात्राकऱ्यासी वाटिले ।
गावात कळलें सकळासी ॥ १५ ॥
धान्याचा दुष्काळ कर्जिही मिळेना ।
बोधराजा जाणा बुद्धिहिना ॥ १६ ॥
मागे तोंडावरी निंदिताति जाणा ।
त्याचिया भजना खंड नाही ॥ १७ ॥
निर्वाळिले सेत पडता हे रित[४] ।
काही तरी त्यात पेरु आता ॥ १८ ॥
भोपळयाचे बीज घेउनि × × ।
बोधराज सेती पेरितसे ॥ १९ ॥
लोक ह्मणताती विपरित जालें ।
भोपळे पेरिले सेतामाजी ॥ २० ॥
निंदक ह्मणती यकेक भोपळा ।
देइल सकला भिक्षाटणा ॥ २१ ॥
यता जाता लोक हासति सकळ ।
अचाट भोपळे लागलेती ॥ २२ ॥

मळोनिया धान्य आपापुल्या घरा।
नेतो लोक सारा गावा-तिला ॥ २३ ॥
भोपळयाची रासी केली बोधल्यान।
मिळाले दुर्जन हासताती ॥ २४ ॥
यकानं भोपळा घेउनि फोडिला।
घउ[५] पसरला चहुकडे ॥ २५ ॥
दुसरा फोडिता हरबरे जोंधळे।
ऐसे बहु जाले धान्य तेव्हा ॥ २६ ॥
वेगळथाल्या रासी केल्या थोरथोर।
पाहावया सारे लोक आले ॥ २७ ॥
कांतासुन पुत्रा कळता वृतांत।
ति आली धावत रासीपासी ॥ २८ ॥
भागिरथी ह्मणे विनंती मामाजी।
धान्य वाटा आजी लोका लागी ॥ २९ ॥
हर्षे बोधराज पिटोनि टाळिसी।
धान्याचिया रासी लुटविल्या ॥ ३० ॥
शेष धान्य घरा घेउनिया गेलें।
किर्त्तनि ठाकलें आनंदात ॥ ३१ ॥
शरिर समंधी गावातले लोक।
ठेविति मस्तक पदावरी ॥ ३२ ॥
धन्य बोधराज तारिले पतित।
जोतिराम त्यात उद्‌दरावें ॥ ३३ ॥
॥ इति श्री बोधराजाख्यान दशनं ॥ १० ॥ ६ ॥ ६ ॥

---

(१) अभिमान (!) (२) बी पेरण्यासाठी केलेली पाभरीवरची मूठ (३) कर्ज (४) रिते (५) घउ-गहू.

बोधराजाख्यान (अकरावें)

॥ श्री सद्‌गुरु बोधराजाय नमः ।

बालेघाटी बोधराज अवतार।
व्हावया उद्धार पतिताचा ॥ १ ॥
आविंदाची आज्ञा दो मुखाचे वाद्य।
वाजविता छेद शिर होय ॥ २ ॥

तारावया जन अवतार ज्यांचें ।
तो काय वनाचें भय धरी ॥ ३ ॥
बोधला किर्त्तन करी तये वेळे ।
प्रेमाचें कल्लोळ येती जना ॥ ४ ॥
ताळ मृदांगादी नामाचा गजर ।
कापे थरथर × × × ॥ ५ ॥
शतावधी पेवे होती रिती जाली ।
धान्यानें भरली पांडुरंगे ॥ ६ ॥
थोटिया ताटासी लागली कणस ।
जना मिळालेसे पाहावया ॥ ७ ॥
भोपळे पेरिले त्यांत धान्य जालें ।
वृत्त हे कळले हुलदारा ॥ ८ ॥
हुलदारे पत्र अविंदासी लिहिले ।
वृत्त सुचविले जाले तैसें ॥ ९ ॥
वाचिता यवन कृत्रिम हे ह्मणे ।
आणा बोलाउन बोधल्यासी ॥ १० ॥
ढालाइत आले धामणगावासी ।
पाहातां बोधल्यासी नामस्मरे ॥ ११ ॥
उठा चाला ऐसें बोलती दुर्जन ।
तुह्मा पाछायानें बोलाविले ॥ १२ ॥
विणे टाळचाळ मृदांग गजरे ।
शिष्य गावकर आले तेथ ॥ १३ ॥
टाळिनाम (?) घोषे आनंदे गर्जती ।
पताक चाळती अगाडिसी ॥ १४ ॥
बेदरासि गेले रात्रि बाजारात ।
किर्त्तन करित बोधराज ॥ १५ ॥
लोक ह्मणताती बाटविती याला ।
ज्याच्या किर्तनाला प्रेमाद्‌भुत ॥ १६ ॥
काजी यवोनिया ऐकिले किर्त्तन ।
परि तो दुर्जन न बोधेचि ॥ १७ ॥
दुजे दिनी काजी बाछायासी बोले ।
मृदांगाणी टाळ भोंदु आले ॥ १८ ॥
अविंदाने त्यासी बोलाउनी नेलें ।
सन्निध बैसले बोधराज ॥ १९ ॥

भोपळ्यात धान्य कैशापरी पिके ।
बोधराजा ठिक सांग आह्मा ॥ २० ॥
यरु वदे पांडुरंगाची करणी ।
हात ठेवी कानी नेणे ह्मणें ॥ २१ ॥
काजी म्हणे यासी मद्यमांस द्यावे ।
यवन करावे आह्मा असे ॥ २२ ॥
मांस पात्र मद्य आणिता घे हाती ।
समजले चित्ती बोधराजा ॥ २३ ॥
विठ्ठल ह्मणोनि काढिता सर्पोस[२] ।
जाल्या तुळसि पुष्पे पाहाती सर्व ॥ २४ ८
मद्याचे ते दुध पाहोनी अविंद ।
वंदितसे पद बोधल्याचे ॥ २५ ॥
आज्ञापि काजिला करी × × ऐसें ।
काही केल्या त्यास न होयची ॥ २६ ॥
काजी प्रांतातुनी दिधला लाउन ।
आणिले लुटुन घर त्याचें ॥ २७ ॥
बोधराजा मज मागावे इछित ।
तुझे मनोरथ पुरविन ॥ २८ ॥
नाहि मी दुर्बळ त्रैलोक्य भुपाळ ।
तुं दिन केवळ काय मागु ॥ २९ ॥
टाळ मृदंगादी न वाजति जे का ।
आज्ञा सकळिका द्यावी आतां ॥ ३० ॥
अवस्य ह्मणता निघाले तेथुन ।
करित भजन गांवा आले ॥ ३१ ॥
टाळमृदांगादी वाजवा सकळ ।
जन अज्ञापिले बोधराज ॥ ३२ ॥
बोधराज मग बोधिले कित्तॅन ॥
× × × ठेगणे केले आसे ॥ ३३ ॥
संतमहंत येती किर्तन गजरी ।
केलीस पंढरी धामणगाव ॥ ३४ ॥
चौदा सतत ये संधी अवतरला ।
सद्गुरु बोधला तयामाजी ॥ ३५ ॥
बोधला किर्त्तनी गर्जताचि नाम ।
संतजन प्रेमें डोलताती ॥ ३६ ॥

पांडुरंग टाळ वाजवितो मागें ।
बोधराज सांगे तयाप्रती ॥ ३७ ॥
जातो समाधित कृपा असो देणें ।
पांडुरंग म्हणे काहि मागा ॥ ३८ ॥
केलिस पंढरी धामणगावाची ।
आता मागायची आस नाही ॥ ३८ ॥
पांडुरंग ह्मणे राहिलो जी येथ ।
परी सेवा मातें कांहि सांगा ॥ ४० ॥
परंपरे टाळ वाजवावा मागे ।
ह्मणे पांडुरंग बहु वरें ॥ ४१ ॥
धनधान्य वस्त्रे संतति उदंड ।
वाढविन पुढे बोधराजा ॥ ४२ ॥
जगामध्ये किर्ती वाढेल सद्भक्ती ।
लक्ष कोटी होती शिष्य तुझे ॥ ४३ ॥
तुझे पायी देती तनमन धन ।
आह्मा तया देणे वैकुंठादी ॥ ४४ ॥
ऐकोनी समाधी बोधराज गेले ।
विठल बोलिले संतजन ॥ ४५ ॥
अद्यापी शरीरदेह आहे समाधिन ।
इछिल ते देत दासालागी ॥ ४६ ॥
प्रातःकाळीं जो का बोधराज स्मरे ।
गुरुबोध × × × तया देही ॥ ४७ ॥
उच्चारितो वाचे गुरुबोध नाम ।
ह्मणे **जोतिराम** दिना तारी ॥ ४८ ॥
इति श्री बोधराजाख्यान यकादश ११

---

(१) आघाडीसी (?) (२) आच्छादन

श्री बोधराजर्षी आर्या—

आष्टक

॥ श्री सद्गुरु बोधराजाय नमः ॥

सद्गुरुनाथा शरण मने काया वाचा ।
पति तो दरारा प्रताप तुझ्या बिरुदाचा ।

देउनी सेवा पदिची कीर्तन प्रेमाला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ १ ॥
माया उदधी दोषाचिच हे साटवण।
रिपु वर्गादी ग्राहात्रति मिन दारुण।
शोक मोहाच्या लाटा मन विटले त्याला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ २ ॥
त्रिविध तापे शरीर हे बहु तापलें।
नवद्वाराचे विकळ जातसे भासलें।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ३ ॥
ग्रहदारादी बंधु सुतक्ति (?) जायाचे।
× × × ब्रह्मांड तरि का हें साचे।
जाईल वाया ह्मणउनि ध्यातो पायाला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ४ ॥
देसि कराया विज्ञाप्ती मम परिसावी।
अभिमान ममता चिंता निरसावी।
मुक्ति नको दे भक्ति सुमती सत्संगाला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ५ ॥
नाम तुझे ते धाम सकळही योगाचें।
साधन सोपे पतिता तरणोपायाचें।
जपता तुतें मि माझे हाचि भ्रम गेला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ६ ॥
नसता मि तु येक विनंती परिसता।
करि निष्काम देसिल तरि दे हे आतां।
मी न तु सारा स्छावर जंगम थाटला।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ७ ॥
गुरुबोधाने अउम देवही मुंडिले।
ऋषि गंधर्वा शड्दर्शने मुनी बोधिलें ॥
तापसि योगी जप गुरु **जोतिरामाला**।
भावे नमितो बोधराज गुरु स्वामिला ॥ ८ ॥
अष्टक ध्याता सद्गुरुचे पद जोडती।
संशय नाही करुनि पाहावी हे भक्ति।
साक्षि मनाला गुरु जोवर **जोतिरामाला**।
॥ आनंद सारा सद्गुरु बोधचि दाटला ॥ ९ ॥
इति श्री बोधराजाष्टक संपूर्ण मस्तु। ॥ श्रुभंभवतु ॥

श्री बोधराज किर्ती आर्या ॥ ३१ ॥

श्री सद्गुरु बोधराजाय नमः
बोधराज महाराज छत्रपति गरिब नवाज[1] धणी गाजी ।
गाजीराजी आहो तुह्माजी चरित्रि त्याच्या मनराजी ॥ १ ॥
संतमहंत योगिराज न वर्णिति किर्ति अचाट चमत्कारा ।
पाय नमूनि विनंती मम हे किर्तन रंग अपार करा ॥ २ ॥
वाळुवंटि पिटवोटि बोधला काटिकरी दाटित भजल्या ।
विठल रुक्मिणि येउनि भाकरि करुनि भक्षुनी वाटियल्या ॥ ३ ॥
होउनि माळी विठल रुक्मिणि मार्गीसी मळा निर्मियला ।
बोधराज नेहुनियां तेथ फळें जळें संतोशविला ॥ ४ ॥
बोधराज पंढरीच्या यात्रकन्या हाती सेत लुटविलें ।
थोटिया ताटासी आणि तो कणसे तयासि आठविलें ॥ ५ ॥
धामणगांवीं पांडुरंग होउनि ह्मार चावडी गेला ।
सातवराइं रसद गुदरली नागाइ सावकार बुडला ॥ ६ ॥
राळेरासी कुणबिण हासी वारकरी धामणगावी ।
बोधराज उद्दारक करितो विठलरुपासि ते मिळवि ॥ ७ ॥
कुटिल मिळोनी किर्तनात शव बोधल्याचिया बैसविले ।
नामस्मरणें टाळी वाजवि विठल विठल गर्जिनलें ॥ ८ ॥
बोकडाचे शिर केलें मारुनि बैलासि बोधराजानं ।
ह्मार असत्सिष्य मारिताहि दे सोडिनी संत राजानं ॥ ९ ॥
दुफळी यात्राकन्या बिज वाटुनि कडु भोपळयासि पेरियले ।
पिकली अठरा धान्ये तयातहि बोधरायें कौतुक केलें ॥ १० ॥
पांडुरंग भिक्षुक सोंग धरि परोपरी वरि रंग बहु ।
बोधराज भागिरथि सुनेसि दानासि दिली ते गाउ ॥ ११ ॥
वेदरि स्वारी करी बोधला पादशाहा सन्निध बसलें ।
गोमांसाची फुले दारु वेचे दुध करुनि दाखविले ॥ १२ ॥
धन्य धन्य बहु धन्य बोधला अवतार सद्गुरुस्वामी ।
शड्गुण ऐश्वर्याचा टाळ धरी **जोतिराम** तो मी ॥ १३ ॥
इति श्री बोधराम किर्ती–शुभंभवतु ॥ ६ ॥ ६ ॥

✦ ✦ ✦

---

(१) कनवाळू, पोशिंदा (फा)

रामजोशींच्या दृष्टिकोनातून ‘ बार्शीचा भगवंत ’ : एक टिपण

मराठी साहित्याच्या भूगोलात, सोलापूरला एक ठळक स्थान आहे. संतकाव्य, पंडिती काव्य आणि शाहिरी वाङ्मय यांना जोडणारा दुवा निर्माण करणारा शाहीर रामजोशी (इ. स. १७६२ ते १८१२) या शहराने महाराष्ट्राला दिला. ‘ लावणी वाङ्मयाचे स्थान अभिजात काव्य व लोकसाहित्याच्या सीमेवर सदैवपणे उभे राहिलेले आहे. या संदर्भात रामजोशीचे कार्य मोठे लक्षणीय आहे. सर्वसामान्य तमासगिरांनी, लोककलाकारांनी, त्याच्या रचनांचा जसा आस्वाद घेतला व घेत आहेत, तशाच प्रकारचा आस्वाद अभिजात काव्याच्या रसिकांनीही घेतला आहे.

सर्वच शाहीर लौकिक जीवनाशी संपर्क साधून होते. रामजोशी त्याला अपवाद नव्हता. त्यामुळे त्याच्या लावणीतील प्रादेशिक वर्णने, स्थळवर्णने केवळ सांकेतिक, कल्पनारम्य, अवास्तव न बनता वास्तव, ऐतिहासिक व ऐहिक जीवनाला धरून आहेत. त्याच्या आणि इतर शाहिरांच्या रचनेत ध्वन्यर्थ, सूचकता यापेक्षा वाच्यार्थच अधिक प्राधान्याने आढळतो. नामदेवाच्या रचनेतील ‘ तीर्थावळी, ’ ‘ ज्ञानेश्वराच्या समाधी-प्रसंगीचे अभंग ’ काव्यमय, भावपूर्ण, असतीलही; पण ऐहिक वास्तवापासून दूर म्हणूनच संदिग्ध वाटतात. रामजोशीच्या क्षेत्रवर्णनपर लावण्यात तसे होत नाही. रामजोशीने बार्शी, पंढरपूर, तुळजापूर व तिरुपती या चार क्षेत्रांच्या वर्णनपर अशा चार लावण्या लिहिलेल्या आढळतात. यांपैकी तिरुपतीच्या व्यंकटेशावरील लावणी वगळता, बाकीची तीन क्षेत्रे रामजोशीच्या अतिशय परिचयाची. त्याने त्या क्षेत्रांना अनेकदा अनेक कारणांनी भेटी दिल्या असणे सहज शक्य आहे. मराठीतील पूर्वसूरींच्या क्षेत्रवर्णनाहून रामजोशीने या क्षेत्रांचे केलेले वर्णन अधिक वास्तव, ऐहिक, लौकिक पातळीवर आहे. इतकेच नव्हे तर विचारवंतांना या क्षेत्रातील देवतांच्या मूर्तींच्या मूळ उगमासंबंधी विचार करायला लावणारे आहे. बार्शीच्या ‘ भगवंता ’च्या संबंधीच, मी या टिपणात प्रामुख्याने विचार मांडत आहे.

खुद्द बार्शीत वा परिसरात अंबरीषाकारणे ‘ भगवंत ’ बार्शीत आला, अशी परंपरेने चालत आलेली कथा आहे; व तशी लोकांची श्रद्धा आहे. तसेच पंढरपुरात ‘ एकादशी ’चा उपवास करून द्वादशीला–बार्शीला त्या उपवासाचे पारणे करावे असा

वारकरी लोकांचा संकेत आहे. म्हणजे परंपरेने लोकश्रद्धांनी पंढरपूर-बार्शी यांचा संबंध मानलेला आहे, आणि आजवर ती लोकश्रद्धा चालत आहे. आज भगवंत मंदिरात ज्या ‘ भगवंत ’ मूर्तीची उपासना होते ती मूर्ती पंधराव्या–सोळाव्या शतकातील शिल्पाचा नमुना आहे असे मूर्तिविज्ञानकार सांगतात. म्हणजे भगवंत मंदिरातील मूर्ती फार प्राचीन नाही हेही लक्षात येईल.

शाहीर रामजोशी आपल्या बार्शीच्या भगवंतावरील लावणीत ‘ चार दिवस बाजार तेथिचा वार करुन लौकरी। आला हो बाइल पाठीवरी. ॥’

असा उल्लेख करतो. यावरून आज भगवंत मंदिरात उपासना केली जात असलेली भगवंताची मूर्ती त्याने पाहिलेली होती; व तिचे वर्णन तो आपल्या लावणीत करीत आहे. या बार्शीच्या भगवंतमूर्तीच्या शिल्पात मागेपुढे अशा दोन मूर्ती कोरलेल्या आहेत. पुढील दर्शनी भागात भगवंताची मूर्ती असून, पृष्ठभागी लक्ष्मीची मूर्ती कोरलेली आहे. भक्तांना लक्ष्मीचे दर्शन घडावे म्हणून मूर्तीच्या मागे उजव्या कोपऱ्यात आरसा लावलेला आहे. या आरशातून लक्ष्मीचे दर्शन घडते. भगवंताच्या पृष्ठभागी लक्ष्मीची मूर्ती आहे. म्हणून रामजोशी “ आला हो बाइल पाठीवरी ” असे भगवंताचे वर्णन करतो हे उघड आहे.

साधारणपणे पौराणिक देवतांच्या मंदिरात राम–सीता, शिव–पार्वती, कृष्ण–रुक्मिणी अशा दांपत्यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केलेली दिसते; पण भगवंताच्या मंदिरात असे चित्र दिसत नाही. ‘ भगवंत ’ हे दैवत मुळात विष्णूच्या अवतारातील वा अनेक रूपांतील एक असेल तर त्याची उपासनामूर्ती वामांगी रुक्मिणी वा लक्ष्मी अशा रूपात मंदिरात असायला हवी होती. ज्या अर्थी तसे इथे दिसत नाही, त्या अर्थी मुळात ही ‘ देवता ’ अन्य परंपरेतील असली पाहिजे आणि कालांतराने उन्नयन होऊन पौराणिक दैवतावर श्रद्धा असलेल्या भक्तांनी तिचा स्वीकार केला असला पाहिजे असे दिसते. पंढरपूरचा विठोबा आणि बार्शीचा भगवंत एकाच मूळ परंपरेतील असावेत असे वाटायला आधार आहे. रामजोशीनेच आपल्या पंढरपूर क्षेत्रावरील लावणीत–

पांडुरंग जगदंतरंग जीमाजी रंगाला धणी
पार्श्व रमा रखुमाई पृष्ठतो राहि जशी सुखाची खणी.

असे वर्णन दिले आहे. इथेही रमा, रखुमाई, राही पृष्ठभागी आहेत असे तो सांगतो. यावरून आपण असे अनुमान करू शकू की पंढरपूरचा ‘ विठ्ठल ’ वा बार्शीचा ‘ भगवंत ’ ही वारकरी संप्रदायाने स्वीकारलेली उपास्य दैवते असली तरी मुळात ती अन्य परंपरेतून आली असावीत, ही मूळची लोकपरंपरा शोधून काढायला हवी, रामजोशीच पुढे म्हणतो.

(हा भगवंत) ‘ हा जरा बाजरा घेऊन आला घरी,
नाही सुप टोपली वैकुंठीं तागडी.

श्री लपउनि मागे पांघरतो घोंगडी.

जनु वसन मिळेना कुसुमाची आंगडी,

लोकसाहित्यातील पंढरपूरच्या विठोबाची परंपरा आणि बार्शीच्या 'भगवंताची परंपरा' सारखी असलेली दिसते.

आणखी एक संदर्भ रामजोशीने या लावणीत (बार्शीच्या भगवंतावरील) दिलेला दिसतो. 'बसलिंग हा जंगम याण संगमसुखि लावला' यावरून भगवंताच्या भक्त परंपरेत नागेश संप्रदायी 'बसवलिंग' मान्यताप्राप्त भक्त दिसतो. उत्तरेश्वराच्या मंदिरात नामदेव आणि विसोबा खेचर यांची भेट झाली, असे परंपरा सांगते. थोडक्यात रामजोशीच्या या लावणीवरून बार्शीचा भगवंत, वारकरी, शैव, नागेश संप्रदायी या सर्वांचे उपास्य-दैवत होण्यापूर्वी मुळात विठ्ठलाप्रमाणे स्थानिक लोक-दैवत होते. कालांतराने उन्नयन होऊन विष्णूच्या रूपात भक्त त्याला पाहू लागले असे दिसते.

✦ ✦ ✦

परिशिष्ट

टिपण-भाषा–भक्तराज ग्रंथपरिचय

(एक टिपण)

लेखिका— प्रा. सौ. पद्मा मोरजे

'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी' अशा निश्चितपणे ज्ञानेश्वरकृत ग्रंथांखेरीज 'पंचीकरण, अर्जुनगीता, आज्ञापत्र, तत्त्वमसि' असे अनेक ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या नावावर मोडले जातात. अशा ग्रंथांची संख्या सुमारे ४० पर्यंतसुद्धा जाते. ज्ञानेश्वरांच्या नावावर मोडल्या जाणाऱ्या ग्रंथांपैकीच एक ग्रंथ 'भक्तराज' हा होय. या 'भक्तराज' ग्रंथावरील एक टिपण उपलब्ध झाले असून त्यातील निश्चित कालोल्लेखामुळे त्याचे महत्त्व मोठे आहे.

ज्ञानेश्वरी शब्दाचे विवरण। उगाउकर जगन्नाथ बालकृष्ण। केले यथामति ॥

या कोशकाराच्या उल्लेखावरून या टिपणाचा लेखनकाल 'शके सोळाशेसत्तर येक उणे।' म्हणजे शके १६६९ असल्याचे ज्ञानेश्वरी-टिपण या ग्रंथाचे संपादक सांगतात.[1]

भाषाप्रकाश या मराठीतील प्राचीन कोशाचा काल सांगताना संपादक लिहितात, 'कोशाच्या रचनाकालाविषयी फार तर त्याची रचना १८ व्या शतकाच्या अखेरीस-किंवा एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी झाली असावी असे म्हणता येईल.[2]

'मराठी भाषेचा तंजावरी कोश' या मराठीमधील आजवर आद्य मानल्या जाणाऱ्या कोशाचा काल संपादक डॉ. तुळपुळे यांनी इ. स. सतराव्या शतकाचा उत्तरार्ध ठरविला आहे.[3]

या सर्व उपलब्ध कोशांचा कालनिर्णय निश्चित नसल्याने, निश्चित कालाचा उल्लेख असणारा हा 'टिपण–भाषा–भक्तराज ग्रंथ' जरूर महत्त्वाचा ठरतो.

---

१. 'ज्ञानेश्वरी टिपण'–संपादक–कानडे आणि कुलकर्णी, पुणे विद्यापीठ, पुणे, पृष्ठ–३२.

२. 'भाषाप्रकाश' संपादक–शं. गो. तुळपुळे, पुणे विद्यापीठ, पुणे, पृष्ठ ८.

३. 'मराठी भाषेचा तंजावरी कोश–' संपादक शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन, पुणे.

हस्तलिखिताचे वर्णन

माणकोजी बोधले या शिवकालीन संताची समाधी बार्शी–सोलापूर मार्गावरील ' राळेरास ' या बसस्थानकापासून अंदाजे दीड–दोन मैल आहे. गावाचे नाव ' बोधल्यांचे धामणगाव ' असे आहे. समाधीच्या ठिकाणी उपलब्ध झालेल्या कागदपत्रांमध्ये प्रस्तुत ' टिपण–भाषा–भक्तराज ' उपलब्ध झाले. ही वही उभट शिवलेली, लहान आकाराची आहे. आकार ५½" × २½" असा आहे. वापरलेला कागद देशी आहे. प्रस्तुत वहीत भक्तराज ग्रंथातील पहिल्या नमनादी शेहेचाळीस ओव्यांपर्यंतची पाने काळाच्या भक्ष्यस्थानी पडलेली आहेत. भक्तराज ग्रंथाच्या ३०२ ओव्या असून लेखकाचे निवेदन ९ ओव्यांमध्ये आहे (३०२ + ९ = ३११) यांपैकी २२४ ओव्यांवरील शब्दांचे अर्थ टिपणात उपलब्ध आहेत. २२५ पासून पुढील ओव्यांचे अर्थ पुढील पाने नष्ट झाल्यामुळे उपलब्ध नाहीत. सध्या तरी ८२३ शब्दांचे अर्थच उपलब्ध आहेत. सर्व मिळून एक हजारावर शब्द असावेत असा तर्क करण्यास वाव आहे. टिपणात मूळ भक्तराज ग्रंथातील ओवींच्या अनुक्रमाने शब्दांचे अर्थ दिलेले आहेत.

टिपण लेखकासंबंधी : टिपणामध्ये लेखकाच्या निवेदनात आलेल्या उल्लेखावरून टिपणाच्या लेखकाचे निश्चित नाव काय समजावे याबाबत संदेह राहतो.

" येकावाचूनि येका । म्हणता न ये जालो मुका ।
मुकाचि जाला बाळक येका । लेखक येका त्याचेनी ॥ ६ ॥

यावरून टिपण लेखकाचे नाव ' येका '—' एका '—' एकनाथ ' असे मानता येते. पण हे जनार्दनी एकनाथ निश्चित नव्हेत. कारण टिपणकार ' गुरुज्ञानेश्वर । श्री येकनाथ ॥ श्री दत्तात्रय गुरवे नमः ॥ ' असे नमन करतो. जनार्दनी एकनाथ स्वतः स्वतःलाच नमन करील असे वाटत नाही. हा ' येका ' निश्चित कोण ? हे सांगता येत नाही. ज्ञानेश्वरांच्या नावावर मोडणाऱ्या लेखनी ग्रंथातही अशाच एका ' येकाचा ' उल्लेख सापडतो हे लक्षणीय आहे.

प्रस्तुत टिपण भक्तराज ग्रंथावरील असल्याचा उल्लेख मात्र ' अभिधान चतुराक्षरी । ग्रंथ भक्तसार ज्ञानेश्वरी । भक्तराजाची संपूर्णता । श्री ज्ञानेश्वर साह्य होता ॥ ९ ॥ ' अशा काही ओव्यांत आढळतो. तसेच मूळ ग्रंथाचे अखेरीस ' ग्रंथाचे अभिधान भक्तराज । महाराष्ट्र सुगम जाला सहज ॥ ' असा उल्लेख आढळतो. तेव्हा प्रस्तुत टिपण लेखकाचे नाव संदेहात्मक असले तरी ज्या ग्रंथावरील हे टिपण आहे त्या ग्रंथाचे नाव ' भक्तराज ' मात्र संदेहातीत आहे.

कालनिर्णय

' टिपण–भाषा भक्तराज ' यातील स्पष्ट कालोल्लेख असा—

" सार्द्धसोळाशते शालीवाहनी । संवत्सर किलकाभिधानी ॥ फाल्गूण त्रीतीया कृष्णी । गुरुवासरी ग्रंथ समाप्त ॥ ९ ॥ " फाल्गुन कृष्ण शके १६५०–किलक नाम-

संवत्सर रोजी ग्रंथ लिहून पुरा झाला. म्हणजे शक्रवार सात मार्च १७२९ होय. ओवीत गुरुवार उल्लेख असला तरी गुरुवारी प्रारंभी द्वितीया व सहा घटकांनंतर तृतीया लागते व म्हणून तृतीयेस शुक्रवार येतो. हा नेमकेपणा बाजूला ठेवला तरी शके १६५० म्हणजे इ. स. १७२९ हा निश्चित काळ सांगता येतो.

टिपणाचा मूळ ग्रंथ भक्तराज हा ज्ञानेश्वरांचे नावावर मोडतो असे महाराष्ट्र-सारस्वतकार नमूद करतात व त्याचा काळ "शके बाराशे बारोत्तरी" असल्याचे सांगतात.[४] तसेच डॉ. के. वा. आपटे हेही 'ज्ञानेश्वर महाराजांची ग्रंथसंपदा' या आपल्या लेखात तसाच उल्लेख करतात.[५] प्रस्तुत ग्रंथ रामतत्त्वप्रकाश बेळगाव (१८९८) याने मुद्रित केलेला आहे. तसेच ना. चि. केळकर संपादित अनेक कवीकृत भक्ती परमार्थ-पर कविता काव्यसंग्रह ४६ मुंबई १९०३ यामध्येही हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला आहे. यात ३०९ ओव्या आहेत.

भक्तराज ग्रंथ प्राचीन परंपरेप्रमाणे ब्रह्मस्वरूप स्पष्ट करणारा आहे. प्रारंभी सज्जनस्तवन, गुरुमाहात्म्य वर्णिले असून नंतर सामान्य मानव या ऐहिक जीवनात अडकलेला व गुरफटलेला असतो ते सोदाहरण निवेदन केले आहे. मनुष्यजन्म लाभूनही भक्ती व ज्ञान न साधल्यास जणू "कामधेनू गोठणामाजि आली" अशीच अवस्था होते. म्हणून दुर्लभ अशा मानव जीवनातच ज्ञानभक्तिसाधना करणेच इष्ट होय. ऐहिक जीवनात मानवी शरीराचे अस्तित्व हे अत्यंत अनित्य असल्याचे विविध उदाहरणांमधून सांगितले आहे. मानवी शरीर मलमूत्र दुर्गंधीचे साठवण, अविद्येचे मूळ, रोगाचे अधिष्ठान, काळाचा ग्रास, अनर्थाचा वसौटा, स्वप्नीचा मोघ भास, असत्याचे घर, वातपित्ताचे कोठार, एक्या दिवसाचा उखता पाहुणा....वगैरे असल्याचे सांगितल्यावर नंतर विविध अवतारी पुरुषांच्या अवतारी कृत्यांचे वर्णन आले आहे. त्याच अनुषंगात पारंपरिक पद्धतीचे देवांच्या आयुष्याचे निमिष, पळे, घटका इ. परिमाण दिले आहे. सामान्य माणसाच्या आयुष्याची मात्र वर्षे १००, त्यांतील वर्षे ५० जातात रात्रीचे काळात, उरल्या ५० वर्षांत २५ वर्षे जातात पराधीनपणे—उरल्या २५ वर्षांत काही काळ जातो व्याधी दुःखे यात, काही जातो उदरभरणास्तव, उरल्यासुरल्या काळात कित्येक मूर्ख कृतीत वेळ जातो. आयुष्य अशा प्रकारे फुकट जाते. म्हणून मग अखेरीस वेदादिकातील बोल खरे असल्याचा प्रत्यय येतो की सर्वांतून शेवटी उरते परात्पर ब्रह्म. मग या अनुषंगात परब्रह्मरूप लेख-काने विशद केले आहे. हे सर्व वर्णन प्राचीन अद्वैत तत्त्वज्ञानानुसार आहे. नानारूपी, नानायोनीत तो एकच आत्मा आहे. मूळ परब्रह्मरूप सदोदित, परिपूर्ण, चिरंतन, निरुपाधिक

४. 'महाराष्ट्र सारस्वत'–वि. ल. भावे, ५ वी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, पृष्ठ ११७–११८.

५. डॉ. के. वा. आपटे–'श्री ज्ञानेश्वर महाराजांची ग्रंथसंपदा'–मराठी संशोधन पत्रिका, वर्ष ११, अंक ४.

इ. असून सर्वब्रह्म हेच परब्रह्म होय. त्याभोवती माया, अविद्या यांची वलये असून परब्रह्मापासून विश्वपसारा निर्माण होतो. घट, मृत्तिका, सुवर्णालंकार इ. पारंपरिक व इतरही काही स्वयंप्रज्ञेची अनेक उदाहरणे या सर्व विवेचनात वेळोवेळी दिलेली आहेत व अखेरीस भक्तिज्ञानावाचून हे परब्रह्माचे गूढ रहस्य कळत नाही. शब्दभक्तिज्ञानाने द्वैतज्ञान नाहीसे होते. भ्रांतिनाश होतो व अभेदज्ञान प्राप्त होते, अशा आशयाचा हा भक्तराज ग्रंथ आहे.

टिपणाचे विशेष

(१) यातील प्रत्येक ओवीच्या अनुक्रमाने टिपणकाराने कठीण शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. उदाहरणार्थ, 'सम्येक' शब्द मुळातील ओवी क्रमांक २३, ४४, ४८, ६७, ७७, ८२, ८६ इत्यादी अनेक वेळा दिलेला आहे व त्याचा प्रत्येक वेळी 'संपूर्ण' असाच अर्थ दिलेला आहे. तसेच 'आळुमाळ, आमाळसे' हा शब्दार्थ ओवी क्रमांक २५, ३५, ३८, ५३, ७८, ८२, ८८, ९२, ९५ इत्यादी ओव्यांत अनेक वेळा आलेला आहे.

(२) एकच शब्द ओव्यांतून अनेक वेळा आला असेल तर तितकेच वेळा त्या ओवीचे क्रमांकास त्या शब्दाचा अर्थ पुनरुक्तीने दिलेला आहे.

(३) टिपणातील शब्दांची मांडणी कोणत्याही प्रकारे विषयवारी अकारविल्हे दिलेली नाही. ओवीक्रम देण्याच्या बाबतीत नियम कटाक्षाने पाळलेला आहे.

(४) शब्दांचे अर्थ देताना मूळ ओवीच्या अर्थात जिथे जशाचा तसा अर्थ दिलेला आहे. म्हणजे तृतीयान्त शब्द असेल तर त्यानुसार दिलेला आहे. ओवीत वापरलेल्या शब्दाचे मूळ रूप, त्याचा अर्थ देणे अशी पद्धत अवलंबिलेली नाही.

उदा० 'त्या व्याजे : त्या मिसे' (१०४)
'कृतांताचे दाढे : काळाचे दाढे' (१०२)

दोन दोन तीन तीन शब्दसमूहाचे मिळूनही अर्थ दिलेले दिसतात.

उदा० 'प्रौढ गहन मांडले : थोर कठीण मांडले' (१४२)
'सम्येक रोग राहिले : संपूर्ण रोग राहिले' (१४३)
'जिताणे राहो नेदी : ज्यालेपणे राहो नेदी' (१४५)

(५) मूळ एका ओवीवर एकापेक्षा अनेक शब्दांचे अर्थ दिलेले आढळतात.

(६) टिपणामध्ये आनुरागे, आर्तिने, दर्दुर, आछादिला, किंचित्, आप्लवे, रामस्य इत्यादी संस्कृत शब्दांचे अर्थ दिलेले आहेत, त्याप्रमाणेच किडाळ, आळुमाळ, धटें, चूळकि, अशा अनेक देशी शब्दांचे अर्थ दिलेले आहेत.

(७) प्रस्तुत ग्रंथात एकूण ८२३ शब्दसंख्या उपलब्ध आहे.

(८) टिपणात प्रारंभी पारंपरिक पद्धतीचे नमन आहे. ते असे—

॥ श्री गणेशाय नमः ॥

॥ टिपण भाषा भक्तराज ग्रंथ प्रारंभ क्रियते ॥

॥ श्रीगुरु ज्ञानेश्वर ॥ श्री येकनाथ ॥
॥ श्री दत्तात्रय गूरवे नमः ॥

टिपणात शब्दमांडणी अकारविल्हेवारीने नसण्याचे एक कारण असे संभवते
हे टिपण परभाषिकांसाठी तयार केलेले नसावे. साधारणतः परभाषिकांसाठी रचले
कोषातून अकारविल्हे मांडणी आवश्यक ठरते. त्या काळात ग्रंथ वाचणारा एक व श्र
अनेक असल्यामुळे ग्रंथ वाचणाराच्या सोयीसाठी ओवीनुसार अर्थ देणे निवेदका
दृष्टीने सोयीचे ठरत असावे. आजही आपण धड्याच्या शेवटी शब्दांचे अर्थ देतो
वेळी हीच पद्धती अवलंबितो.

उपलब्ध वहीत लिहिलेला भक्तराज-ग्रंथ व त्यावरील हे टिपण यात वारं
आलेले कित्येक शब्द ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांसारख्या ग्रंथांतूनही वारंवार आढळत
त्यावरून भक्तराज ग्रंथाच्या ज्ञानेश्वरकर्तृत्वाबाबत संदेह दूर होऊन तो ज्ञानेश्वर
निश्चितपणे ठरण्यास मदतच होते. या संदर्भात किडाळ, किर, अळुमाळ, भिंगुळवाण
सम्येक, लेसा, सैंघ, चुळुकि, निके, साच, सपूर, जिताणे, फुडे, नावेक, मोघ, दब
उमाणे, फाडोवाडी, बरवेपण, उपेग, आळुकेली, क्रिमि, पाटोळे, निरूति, राभस
मोटका, पडळ, टवाळ, पघळ असे अनेक शब्द उदाहरणादाखल देता येतील. कदाचि
ज्ञानेश्वरांचा परंपरेने चालत आलेला हा ग्रंथ 'येका'ने लिहिला असल्यामुळे य
ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा "ज्ञानदेवी भगवत्‌गीतेची सहअर्थ टीका, संस्कृताची पद्य
टीका ते ऐका" असा उल्लेख 'येक्या'ने केलेला दिसतो. म्हणजे हा ग्रंथ मूल
ज्ञानेश्वरांचा कसा आहे हे लक्षात येणे शक्य आहे.

अशा प्रकारे, 'टिपण–भाषा भक्तराज' ग्रंथ कालदृष्ट्या उपलब्ध टिपण ग्रंथ
कसा महत्त्वाचा आहे हे स्पष्ट होते व प्राचीन टिपण ग्रंथाचा शोध घेण्याच्या दृष्टी
महत्त्वाचे ठरते.

✦ ✦



डॉ. गंगाधर नारायण मोरजे, एम्. ए. पीएच्. डी.
मराठी विभागप्रमुख, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर

"**मराठी लावणी वाङ्मय**" प्रबंध – महाराष्ट्र शासनाचा १९७५–७६ सालचा समीक्षा व सौंदर्यशास्त्र विभागातील उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार; इचलकरंजी ग्रंथोत्तेजक पारितोषिक (१९७५–७६) प्राप्त ग्रंथ.

रामजोशीकृत लावण्या (डॉ. वि. म. कुलकर्णी यांच्या सहकार्याने) १९७३

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व विचारधारा १९७३

डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे : जीवनकार्य (संपादन) १९७३

शाहीर वरदी परशराम (संपादक) १९८०

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानाने
खिस्ती मराठी वाङ्मय (फादर स्टीफन्स ते १९६० अखेर) संदर्भ ग्रंथ सिद्ध (प्रकाशनाच्या वाटेवर)

तोचि साधु ओळखावा संत इग्नातीच्या आत्मचरित्राचा अनुवाद – १९८२

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या **वाङ्मयेतिहास खंड २ व ३** मधील एक लेखक.

महाराष्ट्रातील शाहिरी वाङ्मय व लोकसाहित्य यांचे एक चिकित्सक व जाणकार अभ्यासक

मराठी संशोधन पत्रिका, नवभारत, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, युगवाणी आदी नियतकालिकांतून संशोधनपर लिखाण. त्यापैकी निवृत्तिनाथ ते रामजोशी या काळातील साहित्यावर नवा प्रकाश टाकणाऱ्या लेखांचा संग्रह म्हणजेच
अक्षरवेध—१९८२